प्रकरण ३ रे

# सानिया यांच्या 'दिशा घराच्या' कथासंग्रहाचा परिचय व विशेष

पृष्ठ क्र. ७० ते १३४

# प्रकरण - ३ रे

## सानिया यांच्या 'दिशा घराच्या' कथासंग्रहाचा परिचय व विशेष

**प्रस्तावना :-**

मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात स्त्रीवादी कथालेखिकामध्ये सानिया यांचे मानाचे स्थान आहे. स्त्रियांचे जीवन त्यांनी चांगल्या रीतीने आपल्या कथा, कांदबऱ्यात रंगवले आहे. त्यांच्या कथेत स्त्रीला प्रमुख स्थान असते. या कथा विचार करायला प्रवृत्त करतात. लेखिकेच्या पराकोटीच्या आत्मनिष्ठ वृत्तीमुळे या कथा लक्षात राहतात. घटनांचा स्वीकार ज्या पद्धतीने केला असेल त्या पद्धतीला सानियांच्या कथेत महत्व आहे. या कथा चिंतनात्मक पातळीवर आकार घेतात. त्यामुळे त्यांच्या कथा अधिक सकसपणे चित्रित झाल्या आहेत. सानियांचे वास्तव्य सध्या बेंगलोर या ठिकाणी असून त्यांचे आतापर्यंत दहा कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांना एकूण १० वाङ्मय पुरस्कार प्राप्त झाले आहेत त्या मराठीतील एक नावाजलेल्या कथालेखिका आहेत.

"सानियांच्या कथेतील माणसे अत्यंत बुद्धिमान आणि संवेदनशील असतात. अनेकजण कोणत्या ना कोणत्या जनसंपर्क माध्यमांशी निगडीत असतात. स्त्रीपुरुषांचे स्वाभाविकपणे येणारे संबंध, व्यवसायामुळे निर्माण होणारी जवळीक, मोकळा वेळ व तो भाषेत मांडण्याची सवय यामुळे ही माणसे एकसूरी वाटतात. त्यांची जगण्याची शैली उच्च मध्यमवर्गाच्या सुखसोयींनी आणि अभिरुचीनिदर्शक प्रथा, वस्तूंनी भरलेली असतात. ती वागण्यापेक्षा अधिकतर बोलतच असतात. भौतिक पातळीवरचे कोणतेच प्रश्न त्यांच्यासमोर येत नाहीत. जे पेच त्यांच्यासमोर येतात ते स्त्रियांच्या विविध प्रकारच्या नात्यातून निर्माण झालेले असतात. हे पेच इतके सूक्ष्म आणि तीव्र असतात की ते सुटण्याची शक्यता दिसत नाही."[१]

स्त्री शिकली-सवरली, नोकरी करु लागली, पण पुढे तिला घर आणि समाज अशी दुहेरी लढत द्यावी लागली. ती पैसे कमावते आहे तरीही आतून दु:खी आहे. तिला काहीतरी नवीन, प्रवाहाच्या उलटे जाऊन मिळवायचे आहे. पण त्यात तिला यश येत नाही. त्यामुळे तिच्या मनाचा कोंडमारा चाललेला आहे. समोरच्या व्यक्तीला समजून घेण्याची

अफाट शक्ती या कथेतील स्त्रियांत आहे. त्यामुळे मनातून त्या कणखर होत जातात पण त्यांच्यात तितका हळुवारपणा दडलेला आहे. प्रेमात त्यांना आधार महत्वाचा वाटतो. म्हणूनच त्या प्रेमाचे बंध निर्माण करण्यासाठी आतूर असतात. पण शेवटी त्यांच्या पदरी निराशाच येते. या कथांमधील मनाशी चालणारे संवाद, स्त्रियांच्या मानसिक, भावनिक अवस्था, तिच्या वाटयाला आलेले एकाकीपणा आणि उदासीपणा यामधून ती कशी उभी राहिली या सगळयांचे चित्रण या कथासंग्रहात आलेले आहे.

'दिशा घराच्या' हा एक लोकप्रिय कथासंग्रह आहे. 'दिशा घराच्या' या सानियाच्या कथासंग्रहामध्ये फक्त चारच कथा आहेत. हा दीर्घ कथासंग्रह आहे. या कथेची प्रथमावृत्ती जानेवारी १९९१ मध्ये प्रकाशित झालेली आहे. मुखपृष्ठ चंद्रमोहन कुलकर्णी यांनी रंगवले आहे. या पुस्तकाचे प्रकाशन विमल प्रकाशन यांनी प्रकाशित केलेले आहे. हा कथासंग्रह २१५ पृष्ठांचा आहे. यातील कथा अनुक्रमे 'पुन्हा एकदा जन्म', त्यांनतर........', 'दारं उघडावीत......', 'दिशा घराच्या 'अशा आहेत. कथांचा परिचय पुढीलप्रमाणे –

**१ ) पुन्हा एकदा जन्म :-**

सानिया यांच्या 'दिशा घराच्या' कथासंग्रहातील ही पहिलीच कथा असून या कथेची नायिका मीरा आहे. ती एक हुशार डॉक्टर आहे. तिला एक जुळा भाऊ आहे- वृंदावन. पण तिच्यात आणि त्याच्यात काही साम्य नव्हते. तो साधा ग्रॅज्युएट झालेला मुलगा आहे. नोकरी करत करत तो पुढे लॉ चा अभ्यास करीत होता. रेखा वृंदावनची प्रेयसी आहे. तिची निवड त्याने न करता त्याच्या आईने केलेली आहे. सविता मीराची बहीण. मीरामुळे तिचे लग्न झाले नव्हते. कारण मीराने हरिहर नावाच्या खालच्या जातीतील मुलाशी लग्न केले होते. लग्न रजिस्टर ऑफिसमध्ये झाले होते. त्यावेळी तिथे फक्त मीरा, हरिहर, मालुताई आणि वृंदावन एवढेच जण हजर होते. मीराच म्हणाली होती की, तिनेच हरिहरला लग्न करायला भाग पाडले होते. हरिहरच्या जातीतील लोक वेगळया विचाराचे होते. हरिहरने लग्नाला असंख्य कारणानंतर होकार दिला होता. लग्न झाल्यावर फक्त एकदाच मीरा तिच्या सासरी गेली होती. तिकडे तिला कुणीच स्वीकारलेले नव्हते. अगदी हरिहरच्या आईवडिलांनी देखील नव्हते. त्यांना खात्री होती की, एक ना एक दिवस तो एकटा आपल्याकडे परतेल.

मीराच्या आईने बाबूजींशी दुसरे लग्न होते. त्यांची स्वत:ची कन्सल्टिंगची प्रॅक्टीस व्यवस्थित चालू होती. त्यांना घर नव्हते. ते मीराच्या आईमुळे त्यांना मिळाले. बाबूजी मीराचे सावत्र वडील. पण सगळी खरी माया. मीराला मेडिकलला पाठवण्याचा उत्साह त्यांचाच. पण तिची सख्खी आई वृंदावन आणि मीरात भेद करायची. तिला वाटायचे, खर तर वृंदावन डॉक्टर व्हायला पाहिजे होता आणि मीरा साधी ग्रॅज्युएट व्हायला हवी होती. ती मेडिकलसाठी मुंबईला आली तेव्हा खरा दुरावा जाणवत होता. वृंदावनची खरी आस तुटल्यासारखी झाली.

मीराने हरिहरबरोबर लग्न करुन, त्या मुंबईच्या दोन खोल्यात आपले आयुष्य, आपल्या हातांनी, एका विशिष्ट तऱ्हेने ठरवून आणि मुद्दाम कोंडून घेतले होते. डॉक्टर झाल्यावर मालूताईबरोबर एका छोटयाशा भागात क्लिनिक चालवायला घेतले. तिला हवे असते, तर पॉश भागात, हॉस्पिटल उघडून, जबरदस्त फी घेऊन गाडया उडवल्या असत्या. पण तिने ते मुद्दाम तसे केले नव्हते.

हरिहरला मीरा एक विक्षिप्त चमत्कारिक मनाची मुलगी वाटली होती. होस्टेलला असताना तिने त्याच्या खोलीवर जाऊन त्याच्या वस्तू वापरल्या होत्या. तेव्हा 'माझ घर बाटवू नकोस' असे तो म्हणालाही होता. पण तिने ते मनावर घेतले नव्हते. शेवटी त्याच्याशीच लग्न केले होते. तिने त्याला खूप समजून घेण्याचा प्रयत्न केला होता. दिवसामागून दिवस गेले.ती क्लिनिकमध्ये मिळालेल्या पैशाचा बराचसा हिस्सा त्याला द्यायाची. रात्री त्याला तरुन न्यायचा प्रयत्न करायची. सुट्टीच्या दिवशी बाहेर फिरायला न्यायची. पण शेवटी तो आपल्याच कोषात जाणार. आत्मिक अपयशाखेरीज तिच्या पदरात काहीच पडत नव्हते.

वृंदावन एके दिवशी मीराला न्यायला मुंबईला आला होता. आईनेच त्याला पाठवले होते. वृंदावनला वाटले की, एक ना एक दिवस तिची चूक समजेल. तर मीराला वाटत होते की, तिचे म्हणणे कसे बरोबर आहे हे तिच्या घरच्यांना पटेल. हरिहर आला पण त्याच्याशी बोलला नाही. वृंदावनला अवघडल्यासारखे झाले. तिने आईकडे जायला नकार दिला. वृंदावन दुसऱ्या दिवशी निघून गेला. आईने मीराची चौकशी केल्यावर, मीरा एक ना एक दिवस ताळयावर येईल असे ती म्हणाली. पण वृंदावन म्हणाला की, आई

मीरा परत येणार नाही. यावर सविता म्हणाली की, ती काय इतकी घसरलेली आहे? आईच्या म्हणण्याप्रमाणे, मीराने स्वत:च्या हाताने स्वत:च्या सत्यानाश करुन घेतला होता. नाही तर आत्तापर्यंत सुखात, पैशात लोळली असती. वृंदावनला देखील वाटले की एक ना एक दिवस तिला तिची चूक कळेल. तो दिवस लक्ष ठेवून पाहत राहिल्यासारखा मोजायचा.

पुढे एक दिवस मीरा आईला भेटायला गेली. वृंदावनने त्यावेळी तिला रेखाचे वडील लग्नात जी जागा देणार होते ती जागा दाखवली. वृंदावन हुंडा काहीच घेणार नव्हता. त्यांनीच ते त्याला देऊ केले होते. तो तिला म्हणाला की, तिला वाटत असेल मुंबईच्या त्या दोन रटाळ खोल्यात राहून तिने खूप काही मिळवले असेल. पण ती म्हणाली की, प्रश्न जागेचा नाही. प्रश्न आहे, आतील प्रवाहांचा. बाकी सर्व साधनेच आहेत. आपण आपले रस्ते शोधायचे. उगीच गुंतागुंत करुन घ्यायची नाही.

वृंदानच्या ऑफिसमध्ये चांगलाच वाद झाला. त्याने नोकरी सोडायची ठरवले. तो फक्त वेगवेगळी नात्यांची वाटणी, कामाची वाटणी केल्यासारखा जगत होता. त्यातील फोलपणा त्याच्या लक्षात आला. एक अधीर हुरहुर दाटून आली. कधीतरी चुकून, राहून गेल्याची खंत त्याला वाटली. त्याने मीराकडे जाण्याचे ठरवले.

मालुताईच्या क्लिनिकमध्ये मीरा देखील काम करीत होती. मालुताई कित्येक दिवसापासून त्यांच्या घरी मीराला रहायला बोलवत होत्या. पण ती हरिहरला सोडून जायला तयार नव्हती. मालुताईनी पूर्वी म्हणे त्याचा अपमान केला होता. त्यामुळे हरिहरचा त्यांच्यावर राग होता. त्यामुळे तो त्यांच्याकडे जाणार नव्हता. हरिहरच्या प्रत्येक जबाबदाऱ्या मीराने आपणहून स्विकारल्या होत्या. हरिहर नाही म्हणाला. शेवटी ती एकटीच त्यांच्याकडे गेली. हरिहरने एकटाच गावी जाणार असल्याचे सांगितले. हरिहरला तिच्या प्रयोगात रहायचे नव्हते. तिला वाटत होते की, जाताना तरी हरिहरने आपण घेतलेल्या कष्टाबद्दल काहीतरी म्हणावे. पण तो तिला म्हणतो की, तिला सरळ, साधं आयुष्य नकोचं आहे. जे नाही ते हट्टाने हवे आहे. त्याला तिने निवडले, प्रयोगात उंदीर उचलतात, तसे. वर्षभराने कदाचित तिच्यामुळेच त्याला जाग आली असेल.

वृंदावन मीराला तिच्या क्लिनिकमध्ये भेटायला गेला. कारण खोलीवर गेला तर हरिहर एकटाच होता. त्यानेच सगळी गोष्ट सांगितली. मीराने कसे काय ओळखले की, तो सर्व सोडून आला आहे. वृंदावनला तिचा हट्ट चुकीचा वाटला. पण मीराला वाटले की, तिने तिच्या पातळीवर, तिच्या परीने प्रयत्न केला. पण त्याला तरुन नेता नेता तिचा दम सुटला.

मीराला वृंदावनकडून खूप अपेक्षा होत्या. तो लॉ चा अभ्यास करीत होता. पण त्याला वकील व्हायचे नव्हते, असे तो कोणाला म्हणू शकत नव्हता. मीरा त्याला एका वकीलसाहेबांकडे घेऊन गेली. त्यांनी त्याला संध्याकाळी मदतनीस म्हणून यायला सांगितले. वृंदावनने घरी सविस्तर पत्र पाठवले, राजीनामा पाठवून दिला. रेखाचे दुसरीकडे लग्न करायला सांगितले. मुंबईमध्ये त्याच रुटीन ठरुन गेले. रात्री परतले की मीरा वाट बघत बसायची. तो लवकर येणार असेल तर, सरळ क्लिनिकमध्ये जायचा. सुट्टीचा मनसोक्त आनंद घ्यायचा. तरीही तो मनातून नाराज राहिला. एक प्रकारची विषण्ण उदासिनता भरुन आली.

एकदा तो मीराकडे न जाता भरकटत गेला. वेश्यावस्तीत तो कसा गेला त्याचे त्यालाच कळले नाही. मनात भय आणि कुतूहल. अनेकजण ये-जा करीत होते, कुजबुजत होते, उघड आमंत्रण देत होते, पण त्याचा धीर झाला नाही.

अचानक त्याला हरिहर दिसला. ज्याने मीराशी वर्षभर संग केला होता. एक विलक्षण रस्ता त्याला उलगडल्यासारखा झाला. वृंदावनची आणि त्याची नजरानजर झाली. हरिहरने अगदी जिवलग मित्राप्रमाणे हात टाकला. दोघे बाहेर पडले. हरिहरच्या बोलण्याला एक प्रकारची धार होती. पण त्याचे आणि वृंदावनचे संभाषण नसल्याने वृंदावनला आवाज अनोळखी वाटत होता. तो वृंदावनला सांगत होता की, मुंबई शहर आपल्यासारख्या लोकांसाठी नाही. हरिहर परीक्षा देऊन गावी जाणार होता. तिथे त्याची नोकरी पक्की होती. दोघांच्या बोलण्याचा विषय मीराभोवती फिरत होता. ती तिथ नसताना देखील. वृंदावन त्याला म्हणाला की, मीरावर त्याने अन्याय केला होता. पण हरिहरच त्याला परत जायला सांगत होता. मीरा त्याच्याबरोबर येणार असेल तरीही आणि नसेल तरीही. वृंदावनला हरिहरची ओळख लागेना. हरिहरला त्याचा रस्ता सापडला होता तो ही

मीरामुळेच. यासाठी तो मीराचा शतश: आभारी होता. कधीतरी येऊन तो तिची माफी मागणार होता.

मालुताईंचे फॅब्राईडचे ऑपरेशन झाले होते. मीरा नसती तर त्यांचे काय झाले असते. याची त्यांना कल्पना करता येत नव्हती. त्यांनी वृंदावनची चौकशी केली. तिला वाटले वृंदावनच्या येण्याने आपला आनंद नष्ट झालेला आहे. तो सगळ सोडून आपल्याकडे आला, पण तरीही तो निराळा आहे. रोजच्या आयुष्याच रुटीन यातच त्याने सुखी व्हायला हवे? पण मीराला वाटले आपण सुखी आहोत. वृंदावन आपला जुळा भाऊ असल्यामुळे, आपलाच जवळजवळ एक भाग आहे. त्याच्यात आणि आपल्यात कुणाला ही सांगता न येण्यासारख एक आंर्तबाह्य नात आहे. लहानपणापासून हे आपल अतूट नातं आहे. म्हणून तर आपण त्याची वाट बघत आहोत, असे मीराला वाटले. मीराला या मायावी जालातून बाहेर पडायचे होते. पण तिच्या मनातील आशावाद संपत नव्हता. हा आशावाद कुणीकडून मिळाला होता हे तिला कळेना? तो आनुवंशिक होता की, आईकडून मिळाला होता? की वडिलांकडून मिळाला होता? की स्वयंभू होता? की एकाच वेळी निर्माण झालेल्या दोन निरनिराळया बीजातून की एकाच? तिला काहीच समजेनासे झाले होते.

वृंदावन मुंबईला आल्यापासून मीराने आईला अनेक पत्रे पाठवली. पण उत्तर म्हणून आईने रागाने भरलेली पत्रे पाठवली. पण मीराचा सूर बदलला नाही. पुढे आईचा राग देखील निवळला. तिने पत्र लिहायला गेल्यावर तिला आंतरिक मनाने जाणींव झाली की, पत्राची काही जरुरी नाही. कारण वृंदावन निघून जाणार आहे. तिला काहीतरी हरवल्यासारखे वाटले आणि खूप दु:खही झाले. तोपर्यंत वृंदावन आलाच. ती त्याला म्हणाली की, मागे हरिहरच्या चाळीशी खाली जसा उभा होता, तसाच अचानक तो निघून जाणार आहे. मीराला वाटत होते की, एखादी संधी देऊन त्याने जायला हवे. तिला माहीत होते की, ज्यांच्यावर ती मनापासून प्रेम करीत होती ते कोणीच तिच्यापाशी राहणार नव्हते. वृंदावन म्हणाला की, तिकडे त्याचे घर आहे, सगळी आपली मंडळी आहेत.

मीराला वाटले की, अनेक वर्षापूर्वी आपण आणि वृंदावन आईच्या पोटात नऊ महिने असेच शेजारी आपापले जीव वाढवत, जन्मायची वाट बघत राहिले असलो पाहिजे.

खरंच 'पुन्हा एकदा जन्म' हे सानियांनी कथेला दिलेले शीर्षक किती योग्य आहे. मीरासारखा साध्याभोळया, पण तरीही हट्टी मुलीची कथा इथे सानियांनी सांगितली आहे.

**२ ) 'त्यानंतर ...' :-**

'दिशा घराच्या' कथासंग्रहातील ही दुसरी कथा आहे. एखादा माणूस घर सोडून जातो तेव्हा घरातील माणसांची स्थिती कशी होते. हे या कथेतून सानियांनी सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

ललित हा एक गंभीर, विचारी, एकलकोंडा, हुशार, बुद्धिमान कॉम्प्युटर इंजिनिअर झालेला एक चांगला माणूस आहे. एके दिवशी तो आपल्या बायकोला-राधिकाला सांगतो की, तो घर सोडून जाणार आहे, पुन्हा कधीही परत न येण्यासाठी. त्याने हा निर्णय डोक्यात काहीतरी सणक येऊन घेतलेला नाही. तर पूर्ण विचार करुन घेतलेला आहे. जाताना तिच्या नावावर तो घर, फर्निचर, बँकेतील पैसा सोडून जाणार होता. राधिकाला वाटले प्रत्येकजण किती आतल्या आत असतो. शेवटी दुसऱ्याला काहीच कळत नाही. विजय-ललितचा मित्र त्याच्याच ऑफिसमध्ये काम करत असतो. विजयने फोनवरुन ललित कामावर न येण्याचे कारण विचारल्यावर, तिने तो घर सोडून गेल्याचे सांगितले. विजयने प्रत्यक्षात भेटून काय घडल्याचे विचरायचे ठरवले. राधिकाला वाटले की ,आता जणू काय ज्या प्रश्नांना उत्तरं नाहीत, स्पष्टीकरणं नाहीत, अशांची एक न संपणारी साखळीच तयार झाली आहे.

नाशिक राधिकाच माहेर. तिच्या घरापलीकडील दोन घरे सोडून ललितच्या काकांचे घर होते. तो सुट्टीला तिथे यायचा. त्यानेच प्रथम त्याच्या काकूंना राधिका आवडत असल्याचे सांगितले. ललित तिला पत्रे लिहायचा पण ती प्रेमपत्रे नव्हती,तर फक्त चर्चा. अगदी रोजच्या जीवनापासून ते राजकारणापर्यंत. पण राधिकाचे ज्ञान मर्यादित होते. ललितला सगळयाच बाबतीत विशिष्ट तऱ्हेने विचार करणारी स्त्री हवी होती. मैत्रीण, बायको, आई अशा अनेक नात्याने त्याला समजून घेणारी स्त्री हवी होती, तरच तो सुखी होणार होता. ती पत्र लिहण्यापुरती वाचून तयार झाली होता. पण खोलचिंतनामुळे आणि अनुभवांनी बनलेले मत किंवा शहाणपण हे निराळे असते, हे नंतर तिला कळले. त्याचा सगळा वेळ वाद घालण्यात, चर्चा करण्यात जायचा. तो समाजवाद म्हणजे अमूक,

राजकारणाची तऱ्हा, धर्माचा उपयोग तमूक यासारख्या विषयात रमलेला असे. ज्या मुलीत काही समजण्याची कुवत आहे अशा मुलीशीच त्याला लग्न करायचे होते. त्यानंतर दोघांनी खूप काळ एकत्र घालवला. पुढे ललितची पत्रे यायची थांबली. तिच्या पत्रांना देखील त्याने फारसा प्रतिसाद दिला नाही. नाशिकला येऊन देखील भेटला नाही. राधिका भेटायला गेल्यावर तो तिला म्हणाला की, आतापर्यंतच्या दोघांच्या चर्चेतून त्याला एकत्र येणे समाधानकारक वाटत नव्हते. राधिकाने त्याच्यावर प्रेम असल्याचे सांगितल्यावर तो ताबडतोब नाही, पण बऱ्याच वेळाने लग्नाला तयार झाला. त्याला लग्न रजिस्टर्ड हवे होते. कारण त्याचा देवावर विश्वास नव्हता. राधिकाचा नकार नव्हता, पण तिच्या आईला आवडले नाही.

एक-दोन महिन्यातच तिला दिवस गेले. एका सुबक, सुखी, सुरक्षित, बंदिस्त आयुष्याची सुरवात झाली. मुलाचे नाव 'अमोल' ठेवले. वर्षामागून सोळा वर्षे गेली. त्याने स्वत: कधी सणवार केले नाहीत, तिलाही करुन दिले नाहीत. तो तिच्यासाठी बरीच पुस्तके खुणा घालून ठेवत असे. ललितचे वडील आर्मीत होते. ते नेहमी लांबच्या पोस्टिंगला असत. दीना त्याची बहीण. तिचा नवरा नेव्हीत होता. ललित आई, वडील, बहीण यांच्यापासून शरीराने आणि मनाने लांब राहिला होता. भावनिक पातळीवर कुणाशीच जवळ गेला नव्हता. शाळा, कॉलेजमध्ये रात्रंदिवस अभ्यास करुन, कष्ट करुन स्वत: यश मिळवले होते. त्याला माहीत होते की, त्याच्यासारखी विचार करणारी, फटकून वागणारी, बुद्धिमान, एकलकोंडी माणसं फार कमी आणि विखुरलेली असतात.

पुढे ललितच्या परिवर्तनाचा काळ होता. त्याची करिअर पहिल्यापासून उज्वल होती. त्याच्या ऑफिसमधील खालचे लोक कामचुकार, अप्रामाणिक होते. बरोबरच्यांशी सूर जुळत नव्हता,वरचे त्यांच्या जागी योग्य नव्हते निर्बुद्ध होते. ललितला त्याच्यासारखेच आजूबाजूचे लोक कष्टाळू आणि प्रामाणिक हवे होते. तो राधिकापुढे सगळे बोलून टाकत असे. तिला त्याचे खरे प्रश्न कळले, पण संवादाचे मार्ग सुचले नाहीत. रोजच्या पेपर, मासिकातल्या बातम्या, राजकारणांचे खेळ, गरिबांचे हाल, दलितांवरील अन्याय वाचून तो भडकून उठत असे. त्याचे नियम, तत्व तो निर्भीडपणे मांडे. कुणीतरी त्याला शुद्ध रुपात

मिळायला हवे होते. पुढे तो खूपच निराश होत गेला. त्यातून त्याला कसे वाचवायचे हे राधिकाला कळालेच नाही.

ललितने जेव्हा दक्षिणेकडची ट्रीप काढली तेव्हा त्याला खूप वाईट अनुभव आला. कारण जिकडे तिकडे गरिबी, अज्ञान, लोकसंख्या, रोगराई, अस्वच्छता होती. त्याला एकच मूल हवे होते कारण या जगात दुसर मूल आणणे म्हणजे सर्वथा अन्यायाची, दुर्देवाची गोष्ट होती. त्याला वाटायचे की, आपण त्या मुलाला कशा प्रकारच्या आयुष्याची हमी देणार आहोत? पोकळ शिक्षण, गलिच्छ राजकारण, लाचलुचपत, बेकारी, महागाई, भयंकर शहर, गरिबी, लोकसंख्या असले असंख्य प्रश्न त्या मुलाच्या वाटयाला येणार. म्हणून त्याने अमोल झाल्यावर स्वत: जाऊन नसबंदी करुन घेतली होती.

राधिकाच आयुष्य फक्त घरापुरते मर्यादित झाले होते. कारण तिने बाहेर पडायला ललितने कोणतेच कारण शिल्लक ठेवले नव्हते. राधिकाला वाटले ती जर वेगळी वागली असती तर ललित तिला सोडून गेला नसता. पण अशा प्रश्नांना, पर्यायांना अर्थ नसतो. असे पर्याय नेहमीच भुलवतात. यातून पळवाटा मिळतात, खोटं समर्थन करुन समाधान मिळते, पण ते तात्पुरते असते. विजयला वाटत होते की, ललितचे आणि राधिकाचे काहीतरी बिनसल्यामुळे तो घर सोडून गेला होता. ज्या रीतीने ती सहजपणे सांगत होती त्याअर्थी ती त्याच्यापासून काहीतरी लपवत होती असे विजयला वाटले. याचा अर्थ राधिकाने इतरांप्रमाणे ओरडून, रडून सगळयांना आपला नवरा सोडून गेला आहे हे सांगायला हवे होते.

अमोलने ललितची चौकशी केल्यावर राधिकाने त्याला उडवाडवीची उत्तरे दिली. शेवटी अमोलने तिच्याशी बोलणे कमी केले. अमोल दहावीला होता आणि कदाचित थोडया दिवसानी त्याला राधिकाची गरजही लागणार नव्हती. तिला वाटले की तिच्यात आणि अमोलमध्ये एक अनोळखी नातं निर्माण झाले आहे. ललितची बातमी राधिकाच्या आईला कळते. ती चौकशी करण्यासाठी राधिकाकडे आलेली असते. राधिकाच्या बहिणीची जबाबदारी तिच्या आईवर होती. मनू तिच्या बहिणीच नाव. तिला एक मुलगी आहे. मनूने एका रिप्रेझेंटेटिव्हशी लग्न केले होते. त्यावेळी ते प्रकरण खूप गाजले होते. पण अचानक तो अपघातात गेला, त्यावेळी मनू प्रेग्नंट होती. तिला दुसऱ्या लग्नाबद्दल

विचारताच तिने नकार दिला. कारण एकदा प्रेमात पडून लग्न केले होते. आता डोळे बांधून कुणाबरोबर आयुष्य काढण्यात काय अर्थ होता? राधिकाची जबाबदारी अंगावर घेणे तिच्या आईला शक्य नव्हते. म्हणून तिची आई म्हणते की, उद्या जर लोक बोलायला लागले तर तिला वाटेल की तिच्यामध्येच दोष आहे.

याच दरम्यान राधिकाला पैशाची काळजी वाटू लागली, म्हणून तिने नोकरी करायची ठरवले. राधिकाची मैत्रीण शालिनी हिला ललित घर सोडून गेला आहे कळते. तेव्हा ती तिच्या नवऱ्याला, चैतन्यला तिच्यासाठी काम बघायला सांगते. त्याच्या ओळखीचे दळवी म्हणून जे सज्जन गृहस्थ होते, त्यांच्या अनुपम वर्क्समध्ये मदतनीस म्हणून राधिकाचे नाव सुचवले होते. तिला फक्त हिशोब ठेवायचा किंवा देखरेख करायचे काम करायचे होते. पण तिला त्या वातावरणात उभे राहणे देखील शक्य नव्हते. म्हणून तिने नोकरी न करता घरीच राहण्याचे ठरवले. ती घरी जात असताना तिची नाशिकची मैत्रीण रेणू भेटते. ती खूप गडबडीत असते. कारण ट्रेन वेळेवर पकडून तिला लवकरात लवकर घरी जायचे असते. रेणू ऑफिसमध्ये टाईपरायटरची नोकरी करत असते. परत त्या दोघींची भेट होत नाही, कारण राधिका कामच सोडून देते.

राधिकाच्या आईने तिला आणि अमोलला सुट्टीला बोलावले होते, पण तो जायला तयार नव्हता, कारण ती माणस त्याला कधी आपली वाटलीच नाहीत. दीनाला अमोलने घरची अगळी परिस्थिती कळवली होती. ती सध्या विशाखापट्टणमला होती. अमोल तिकडेच ॲडमिशन घेणार होता. हे जेव्हा त्याने राधिकाला सांगितले तेव्हा तिला आश्चर्याचा धक्का बसला, कारण त्या दोघींच्या भेटी जितक्या कमी, तितकच संभाषण कमी. राधिकाचा अमोलने तिकडे ॲडमिशन घेण्याला नकार होता तर विजयचा त्याला पाठिंबा होता. तिला वाटले की, खरचं कुणीतरी जर आपल्याला निर्माण केलेले असेल, तर कितीतरी प्रकारची माणसं, एकमेकांना आवडणारी, न आवडणारी असे एकत्र ढीगच्या ढीग जमिनीवर टाकून दिले असतील, त्यांचे काय वाटेल ते होवो.

अमोलने विशाखापट्टणमला ॲडमिशन घेतली. याच काळात दीनाचा आणि तिचा पत्रव्यवहार झाला. ललित निघून गेला याची कारणे प्रत्येकाला वेगवेगळी वाटणार होती. दीनाच्या पहिल्या पत्राच्या शेवटी तो एक ना एक दिवस परत येईलच असे लिहले होते.

पण सर्वांच्या दृष्टीने राधिकाने नवऱ्याला हाकलून देऊन, मुलालादेखील लांब पाठवले होते. कारण तिला स्वैराचार हवा होता.

या काळात तिला मानसिक एकटेपणा जाणवत होता. अचानक एके दिवशी दळवी तिच्या घरी आले. ती बीचवर गेली असताना तिची ओळख पार्थ बॅनर्जीशी झाली. पार्थबरोबर विजय तिथे होता. विजयनेच त्या दोघांची ओळख करुन दिली. तो फोटोग्राफर होता. त्याच्या पत्नीचे नाव शिखा आणि त्याला एक मुलगी होती. पण ते एकत्र रहात नव्हते. पार्थचे आणि तिचे संबंध वाढतच गेले. त्या दिवशीही पार्थ घरीच होता. राधिकाने त्या दोघांची ओळख करुन दिली. दळवींना राधिकाची परिस्थिती माहीत नव्हती. तिने सगळे सांगितले. ती त्यांच्याकडे गेली असताना त्यांनीही आपली घरची सगळी परिस्थिती तिला सांगितली होती. त्यांना देखील माहीत होते की, राधिका आपल्याकडे काम करणार नाही. राधिकाने दळवींना सांगितले की ते गुरुदत्तासारखे दिसतात. पण ते म्हणाले की, ती एक प्रतिमा आहे. सगळयांच्या दु:खी निराश, एकटेपणाची.

दळवींना तीन मुली आणि एक मुलगा असतो. तीनही मुली कर्तृत्ववान असतात. पण मुलगा मात्र मतिमंद असतो. दळवींची तीन नंबरची मुलगी काविळीने मरते. दळवींना खूप दु:ख होते. पण दळवींना असंख्य मित्र असून देखील ते राधिकाकडेच का आले होते हे त्यांनाच माहीत नव्हते. अंतर देखील खूप होत. पण ते गाडीने न येता विचाराच्या तंद्रीत चालतच तिच्याकडे आले होते. त्यांना बघून तिला आनंद झाला होता, तो त्यांनी वाचला. त्यांना तो खूप काळ धैर्य देणारा होता. पण ते तिच्याशी मुलीचे नाते जोडायला तयार नव्हते. तिला वाटले की, दोन माणसांमध्ये इतकी अंतर असतात तर मग संबंध तरी कशाला जुळवायचे? पण तिथेच तर राधिकाला वेदनेची उत्तरे मिळाली होती.

दळवी जाताना म्हणाले की, ते परत त्रास द्यायला कधीच येणार नव्हते. ते जेव्हा रडायला लागले तेव्हा त्यांच्या सांत्वनाची देखील तिला भीती वाटू लागली. दळवींना वाटले की, मुलगी मेली त्यापेक्षा त्यांचा मतिमंद मुलगा मेला असता तर बरे झाले असते. असे म्हणून ते निघून गेले.

पार्थ नेहमीच राधिकाच्या घरी येऊ लागला, राहू लागला. त्या बातमीची कुणकुण तिची मैत्रीण शालिनीला लागली. तिने राधिकाच्या घरी येऊन तिला विचारले. राधिकाने

सद्धा पार्थचे आणि तिचे संबंध आहेत कबूल केल्यावर शालिनीने तिच्या बरोबरचे संबंध तोडून टाकले. विजय देखील तिच्या घरी फारसा फिरकला नाही. त्याने देखील अप्रत्यक्षपणे तिला विचारले. राधिकाने ते दोघे चांगले मित्र असल्याचे सांगितले. शिवाय तो तिला पैशाची मदत करत होता. विजय गरम झाला, कारण त्याने यापूर्वी पैशाबद्दल विचारले होते. पण ती विजयला म्हणाली की, उपकार नेहमी रिस्पेक्टेबल नसलेल्या माणसाकडून स्वीकारावेत. ती फेडली नाहीत की मग दु:ख होत नाही. पण विजयची गोष्ट वेगळी होती.

अमोल ख्रिसमसला न येता ट्रीपला जाणार होता. त्यात आईचे पत्र आल्याने राधिका नाशिकला जाणार होती. पण पार्थला सोडून जाताना तिचे डोळे भरुन येत होते. तिथे गेल्यावर राधिकाला वाटले की पार्थबद्दल सांगावे, पण ते शक्य नव्हते. तिने मुंबईला परत येण्याबद्दल जेव्हा आईला सांगितले, तेव्हा आई तिला म्हणाली की, ललितची चौकशी करण्याकरिता पोलिसांत कळव. पण राधिकाला वाटले की, आपण आई-बहिणीपासून खूप दूर आलो आहोत आणि ललित तिकडे आपल्यापासून दूर गेला आहे. राधिकाला त्याच्या आणि तिच्या नात्यातील पदर उलगडत गेले. इतके दिवस ललितने जे बाहेरच्या लोकांचे जग दूर ठेवले, ते त्याला सामोरे येणार होते. पण तिला एकदम जाणवले की ललित परतणार आहे. राधिकाला परत जाण्याची ओढ लागली होती ती फक्त पार्थसाठी. पार्थने राधिकाला 'माझ्याबरोबर राहशील का' विचारले? तो कायमचा तिला सांभाळायला तयार होता, पण तीच नाही म्हणाली. त्याच्या 'का' ला उत्तर द्यायला ती बांधील नव्हती.

अमोल घरी आल्यावर तिला जाणवले, की त्याचे मूलपण संपून तो पुरुष बनायला लागल्यासारखा दिसत होता. तो दिसायला राधिकासारखाच होता. पण होणार होता ललितच, त्याच्यासारखाच-कॉम्प्युटर इंजिनिअर. अमोल होता तोपर्यंत एकदाही ती पार्थला भेटली नाही. एक दिवस त्याला फिरायला घेऊन गेली. तिला जाणवले की, ती जितका त्याला पकडायचा प्रयत्न करीत होती तितका तो तिच्या हातून सुटत चालला होता.

प्लॅटफॉर्मवर ती त्याला सोडायला गेली असताना अमोल तिला म्हणाला, "आय लव्ह यू... मोअर दॅन हिम ... " तिला जाणवले की तिचा मुलगा वाटत होता, तितका दूरचा न राहता तिच्यावर प्रेम करण्याइतका जवळचा होता. 'लव्ह' या शब्दाला दुसरा

पर्याय नाही. त्याच्या मनातील ओलावा तिला कधी कळालाच नव्हता. राधिकाला वाटले असे का झाले? इतके दिवस अमोलला जे सांगता आले नव्हते, ते त्याने आता सांगितले होते. तिला आता ललित का व कुठे गेला हे प्रश्न संदर्भहीन वाटत होते. आता फक्त राधिकातील आई उरली होती. लांब असणाऱ्या मुलाला पत्र लिहिणारी, त्याच त्या हकिकती कळविणारी, व्यर्थ सूचना देणारी, पैसे पाठवणारी फक्त 'आई'.

जुलैला शेवटचा आठवडा होता. ती सकाळी दूध येण्याची वाट बघत होती. तिला वाटले,आपल्याला किती गोष्टीची सवय होते. चांगल्या, वाईट, सहवास, घर, पैसा असणं-नसणं, विशिष्ट गोष्टींची कमतरता, नवीन गोष्टीचे अस्तित्व याची सवय होऊन जाते. आयुष्य म्हणजे एक प्रकारचे रुटीनच. सकाळ, संध्याकाळ, रात्र आणि सवयी. क्षणामागून क्षण, दिवस, रात्र, महिने, वर्ष, ऋतू या सगळयाचेच आयुष्य. दार वाजले म्हणून तिने उघडले तर दारात प्रत्यक्ष ललितच उभा होता. तिला आश्चर्य वाटले की, तिच हृदय बंद कसे पडले नाही. तो किंचित वयस्कर, पण चांगला दिसत होता. तो गेले तीन-चार महिने लॉजवर रहात होता. पण राधिकाला त्याचा पत्ता नव्हता. सामान काही नव्हतेच. तिच्या लक्षात आले की, मनातून कुठेतरी ललितच परतून येण खात्रीसारख वाटत होते.

ललित तिच्याशी बोलत असताना बेडरुमकडे जाऊ लागला. तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर ओशाळा भाव दाटून आला. कारण आतमध्ये पार्थ झोपलेला होता. ललित पावसात भिजला होता. त्याला कपडे हवे होते. पार्थला ललित आल्याचे कळाल्यावर तो नाराज झाला. राधिकाला तिच्या स्थानाची आयुष्यात प्रथम जाणीव झाली. ती इतकी मोठी व महत्वाची होती की विजेच्या प्रवाहासारखी ती डोक्यापासून पायापर्यंत तिला धक्का देत, जागी करत गेली. तिने आतापर्यंत एकटेपणाने सगळयाला तोंड दिले होते. दोन्हीही तिचीच माणसे होती. पार्थ रागावून खूर्चीची दिशा वेगळीकडे करुन बसला होता. तिला खरोखर आनंद झाला होता. तिला ती जाणीव खूपच व्यापक, खोल आणि निरपेक्ष वाटत होती.

पार्थ आणि ललित दोघेही जाणार होते. पण ते दोघेही एकमेकांच्या सहवासात, तिच्यामुळे अस्वस्थ आणि ओशाळे होते. राधिकाने विचारताच पार्थने रात्री घरी येण्याचे कबूल केले.

पार्थ गेल्यावर ललितने अमोलची चौकशी केली. तो आपला प्रवास सांगू लागला. तो खूप फिरला होता. कामे शिकवण्यापासून ते हमालीसुद्धा केली होती. सगळा प्रवास फक्त विनाकारण आणि विनाउद्दिष्ट. त्याला बघायचे होते की, त्याची सगळी तत्व शाबूत ठेवून जगता येतं का ? त्याच्या चेहऱ्यावर तेज होत. ते 'का' होते हे सांगायची आवश्यकता नव्हती. पण त्याचा प्रामाणिकपणा हरवलेला नव्हता. बुद्धिमत्तेचा अहंकार तार्किकता, बुद्धिप्रामाण्यावाद यामुळे जो 'ललित' बनला होता, त्या गोष्टी त्याने उडवून लावल्या होत्या. एकदा त्याच सामान कुणीतरी पळवले होते, पैशाची अडचण सुद्धा आली. ललित पूर्वीसारखा सुखवस्तू न वाटता सडसडीत झाला होता. पार्थच्या वस्तू सफाईने टाळून ललित पाहुण्यासारखा वावरला. त्याने राधिकाची चौकशी केली नाही. राधिकाने त्याला पुढे काय करणार विचारल्यावर, त्याने पूर्वी हिंडलेल्या ठिकाणी कुठेतरी जाऊन वानप्रस्था चालू ठेवायची असे सांगितले. कारण दोघांनी परत आयुष्याची सुरवात करण्यात काहीच अर्थ नव्हता.

तो एक गोष्टी आयुष्याकडून शिकला होता की स्वत:कडे काही असत नाही. पूर्वी तो ज्या मार्गावरुन चालत होता, तिथे काही गोष्टी अशक्य होत्या असा त्याचा ठाम विश्वास होता. जेव्हा त्याला तडा जावू लागला, तेव्हा त्याने ते स्वीकारण्याऐवजी हा मार्ग अवलंबला. तो पूर्वी जितका सुखी (होता) तितका आताही होता. पण पूर्वी जे त्रास व्हायचे, कष्ट व्हायचे, ते त्रास त्याला आता चुकवता येत होते. कारण त्याने त्यातील छोटया, छोटया दडलेल्या आशा गोळा करायला सुरवात केली होती. पूर्वीच्या दिवसात हे मिळाले नसते, कारण त्याने स्वत:च्या हाताने ते बंदिस्त करुन ठेवले होते. ललितला हे देखील माहीत होते की, राधिका या परिस्थितीतून तरुन गेली असेल. ललितला राधिकाची किंमत माहीत होती, नाही तर तो तिला असा सोडून गेलाच नसता. ललितला जशी अपेक्षा होती तशीच ती वागली होती. एकत्र राहणे वेगळे आणि प्रेम करणे वेगळे. पण ती दोघे याच्या पलीकडे गेले होते.

ललितसारख्या राधिकाने काही तडजोडी केल्या असतील, हे त्याला अपेक्षित होते. तो देखील कुणाच्या तरी प्रेमात पडला होता. पण ललितला त्या दोघांच नाते चांगलेच समजले होते कारण त्या दोघांनी सोळा वर्षे एकत्र घालवली होती. राधिकाला वाटले ती

दोघ निराळी पण सर्वस्वी अनोळखी जोडप आहे. त्यांच्यात परस्पर समजूत असून देखील त्यांच्यात दरी देखील आहे. ललितने तिला डायऱ्या जळाल्याचे सांगितले. ललित निघून गेला होता आणि आयुष्याला उलटे पालटे करुन विखुरलेला आशावाद स्वत: गोळा करुन घेऊन परतला होता. तो जेव्हा बाहेर पडला तेव्हा कदाचित त्याला आत्महत्येचा मार्ग देखील दिसला असेल, पण ललित आता जगण्याचा धागा घेऊन परतला होता. राधिका त्याला 'परत एकत्र राहू या' म्हणाली. पण परत आयुष्य सवयीचे झाले असते. त्याच्या दृष्टीने काही गोष्टी महत्वाच्या नसल्या तरी खऱ्या होत्या. ती जर पार्थशी लग्न करणार असेल तर ललित राधिकाला घटस्फोट द्यायला तयार होता. दोघांनी एकमेकांकडे पाहिले, आठवणींचा पटच उलगडत गेला. काहीही न बोलता, सांगता दोघांना एकमेकांची खात्री पटली. विलक्षण शांतता पसरली. तो सहजच तिला 'ये' म्हणाला आणि राधिका त्याच्या मिठीत विसावली.

"ललितशी असलेले राधिकाचे नातं काय? याचाच तर ही दीर्घकथा संपूर्ण शोध आहे. शेवटी ललित जेव्हा परत येतो तेव्हा तिला जाणवतात त्या दोन गोष्टी. एक तर तिचं स्वत:च स्थान, तिची जागं, तिचं स्वत्व आणि दुसरं तिच्या ललितच्या नात्यांची उंची. ती इतकी वेगळी आहे. तिच्या, पार्थच्या नात्यातील द्वेषाच्या, मालकी भावनेचा जराही थारा नसलेली, एकमेकांना अत्यंत पूरक संपूर्णपणे समजून घेतलेली अशी आहे की त्या दोघांनी एकत्र राहणं काय, दूर जाणं कायं? सगळच नेहमीच्या अर्थापलीकडे गेलं आहे. ललितला जर राधिका आधीपासून समजली होती तर ललित गेल्या दीड वर्षात फारच समजून आला. ती प्रगल्भ झाली."[२] तात्पुरती ताटातूट झालेली माणसे एकत्र आल्यावरच खऱ्या आयुष्याची किंमत कळते हे 'त्यानंतर.....' या कथेवरुन कळते.

**३ ) दारं उघडावीत....**

प्रेमासाठी माणूस वाट्टेल ते करण्यास तयार होतो हे 'दारं उघडावीत.....' या कथेवरुन दिसून येते. कथेची नायिका करुणा ही बी.ए. झालेली एक गर्भश्रीमंत मुलगी आहे. एकुलती एक मुलगी आणि तिला एकच भाऊ आहे. तिचे वडील पी.एन. प्रसाद, फार कल्पक आणि धडपडे गृहस्थ आहेत. ते औषधांचे वितरण करीत होते. तिची आई तारका समाजकार्यात नेहमी मग्न असायची. त्या दोघांनी आंतरजातीय विवाह केला होता.

घरी प्रत्येकाला स्वातंत्र्य होत. करुणावर मुलगी आहे म्हणून कोणत्याही प्रकारचे बंधन नव्हते. तिला वाचनाची फार आवड होती. ती पुढे शिकली असती पण तिला त्यात रस नव्हता. तिने काही वाचलं की तिला त्याच्यावर काहीतरी लिहल्याशिवाय रहावत नसे. तिने जे काही वाचले होते. त्यावर तिने निबंध, परीक्षण, समीक्षा लिहली होती. तिचे वडील ते लिखाण छापण्यासाठी सांगत होते. पण करुणाचा त्याला नकार होता. ते तिला अमेरिकन युनिव्हर्सिटीत जाऊन एम.बी.ए. कारण्यासाठी सांगत होते पण तिची इच्छा नव्हती. त्यांनी तिला दुसर काही करण्याचा विचार तिचा आहे का? विचारल्यावर, या ठराविक अभ्यास-क्रमात तिला काही अर्थ वाटत नव्हता, कोंडल्यासारखे व्हायचे. शिकण्यासारखे त्यातून पुष्कळ असते, हे ती नाकारत नव्हती. तारका ही एक सर्व सामान्य गृहिणी नव्हती म्हणून तर तिला आणि तिच्या भावाला हवं ते देऊन ते वाढवू शकले. तिचा निर्णय तिलाच घ्यायचा होता. त्यांना फक्त एवढेच वाटत होते की माणसाने चुका कराव्यात, पण पुढे पस्तावू नये. एखादया गोष्टीसाठी अडून न राहता पुढे जावे. तिच्या भावाची बायको जयवंती, भाचा राजीव आणि जयवंतीचा भाऊ प्रशांत तिला आवडायचा. कुणाला माहीत नव्हते, पण करूणाचे आणि प्रशांतचे संबंध होते.

करुणा आणि तिचा कंपू एका हॉटेलमध्ये जमा झाला होता. मित्री, सनोबार, कबीर, अजय ही तिची मित्रमंडळी. मित्रीने हॉटेलमध्ये गेल्यावर तिला नवीन नोकरी मिळणार असल्याची बातमी दिली. त्यासाठी ती पार्टी होती. चहा, कॉफी होत असताना बरोबर पलीकडच्या टेबलावर शाळेत सहज भेट घेऊन लक्षात राहिलेला भरत दिसला. आणि ती सगळया शक्याशक्यतेचा विचार करुन ती भरतच्या टेबलापाशी गेली. तो सेंट जोसेफ कॉन्व्हेन्टमध्ये शिकत होता. गणित आणि भूगोल हे त्याचे विषय होते. पूर्वी शाळेच्या सायन्स एक्झिबिशनमध्ये त्याची ओळख झालेली होती. राजीव त्याच्या वर्गात शिकत होता. करुणा तिच्या मित्रमंडळीची ओळख करुन देणार होती. पण तो लगेच त्याला तयार नव्हता.

पुढे त्या दोघांची भेट एका पुस्तकाच्या दुकानात झाली. दुकानातील पुस्तकाच्या निम्म्याने घरी तिच्याकडे पुस्तके होती. भरतला प्रवासाची आवड होती. तिने एक पुस्तक निवडायला सांगितले. 'लास्ट ऑफ द डे' हे पुस्तक तिने त्यालाच भेट म्हणून दिले.

त्याला आई-वडिलांचा फारसा अनुभव नव्हताच. त्याने बहुतेक आयुष्य बोर्डिंग स्कूलमध्येच काढले होते. आईला स्मृतिभ्रंश झाला होता आणि वडील सुट्टीपुरतेच त्याच्या वाटयाला येत. त्याने परत तिला फोन करुन ते पुस्तक आवडल्याचे सांगितले. तिने त्याला भेटायचे ठरवले आणि गेलीसुध्दा. त्याच्या घरी शांतता होती. करुणाला त्याचे घर आवडले. भरतने तिला त्याच्या बायकोचा, गीताचा फोटो दाखवला. अजूनही त्याचे तिच्यावर प्रेम होते. पण दोघे वेगळे रहात होते. करुणाने कारण विचारल्यावर तो म्हणाला की, व्यक्ती आवडण्यात आणि एकत्र राहण्यात खूप फरक असतो. भरतला लहान मुलांची खूप हौस होती. त्याला विशेषत: नऊ ते तेरा वर्षातील मुले फार आवडायची.

प्रशांत करुणाच्या घरी आला होता. तो आर्किटेक्ट होता. करुणाला भरतची आणि त्याची ओळख करुन द्यायची होती. भरत प्रशांतला म्हणाला की, त्याच्यासारखे लोक देशाचे तरुण शिल्पकार आहेत. त्याच्यासारख्या लोकांनी सगळयांसाठी स्वस्त आणि टिकावू घरे बांधायला हवीत. ते दोघे भरतला शाळेत भेटायला गेले होते. भरतने त्याचे भूगोलाचे तास कमी झाल्याचे सांगितले. तिथून निघतानाच प्रशांतने त्याला भरत आवडला नसल्याचे सांगितले. तो करुणाला सांगू लागला की, तो मुंबईमध्ये घर मिळवण्यासाठी खूप खटपटीत होता पण तेच खूप कठीण झाले होते. त्याचे आयुष्य त्याला वैराण वाटत होते. तो ऑफिसमध्ये सुंदर ड्रॉइंग्ज काढायचा. पण त्याला स्वत:ला रहायला दोन खोल्या नव्हत्या. चहासाठी सुद्धा चार मजले उतरुन खाली यायला लागायचे कारण स्टोव्ह पेटवायलासुद्धा बंदी होती. पेइंग गेस्टची पहिल्यासारखी सोय नव्हती.

एकदा करुणा पेपर चाळत असताना तिच्या मैत्रिणीचा जयाचा तिला फोटो दिसला होता. तिला जाऊन एक वर्ष झाले होते, म्हणून तिच्या अम्माने पेपरमध्ये फोटो दिला होता. करुणाला आजचा दिवस आपण विसरलो म्हणून खूप वाईट वाटले. त्या दोघी चालत असताना करुणाला तिचा मित्र दिसला म्हणून ती रोड क्रॉस करुन गेली. जया तिथेच आभाळ बघण्यात हरवून गेली. तेवढयात एक वेडीवाकडी रिक्षा येऊन धडकली. वरुन तिला काहीच झाले नव्हते. पण ब्रेन हॅमरेजमुळे ती रात्रीपर्यंत बेशुद्ध अवस्थेतच गेली. तिच्या मरणाला करुणा स्वत:लाच दोष देत होती.

करुणा, जयवंती राजीवच्या शाळेत काही स्पर्धा होत्या म्हणून त्या पहायला गेल्या होत्या, पण भरत दिसला नाही. म्हणून करुणा त्याच्या घरी गेली. तो घरी देखील नव्हता. करुणाला त्याने फोन केला. तो संध्याकाळी भेटायची शक्यता कमी, कारण त्याला शिकवण्या मिळाल्या होत्या. प्रिन्सिपॉलचे आणि त्याचे मतभेद झाल्यामुळे तो तिथ गेलेला त्यांना आवडले नसते. तो शाळेच्या ख्रिश्चन शिस्तीत बसत नाही, म्हणून प्रिन्सिपॉलने त्याला काढून टाकले होते. भरत सांगू लागला की, त्याच्याकडे बायको, नोकरी, पैसा काहीच टिकत नाही. प्रशांतच्या मते करुणावर भरतचा खूप प्रभाव होता. पण भरतमध्ये आत्मविश्वास नाही असे तो म्हणाला. एकदा हॉटेलमध्ये गेल्यावर तिने सूपची चव न पाहताच त्यावर मीठ शिंपडले. प्रशांत तिला म्हणाला की, या प्रत्येक कणाने ती स्वत:चे आयुष्य कमी करुन घेत आहे. पण ती म्हणाली की, तिला तरुणपणीच मरायला आवडेल. तिच्या हातून काही करण्याजोगे तिला दिसतच नव्हते. ज्यामुळे जगाला तिची गरज लागेल असे ती काही करणार नव्हती. निदान स्वत:च अस्तित्व सिद्ध करण्यापुरते जे काही आयुष्यात करतात त्यांनी पुष्कळ जगायला हरकत नाही.

मित्रीला दिल्लीमध्ये मस्तपैकी नोकरी मिळणार होती. तर अजय टेनिस खेळायचा. पण त्याच्या बापाला वाटे की, त्याने मोठा भांडवलदार व्हावे. त्याने एकदा करुणाला रात्री त्याच्या बरोबर येशील का? म्हणून विचारले होते. तिने काहीच न म्हणता फक्त नकारार्थी मान हलवली. सनोबारचेही लग्न झाले. सनोबारचे लग्न पार पडून करुणा घरी आली, तर भरत येऊन बसलेला होता. तारकाने त्याला नवीन आश्रमशाळेत शिकवण्यासाठी राजी करुन घेतले होते. करुणाच्या खोलीत आल्यावर भरतला एखाद्या पुस्तकाच्या दुकानात आल्यासारखे वाटत होते. त्याला त्याच्या गरिबीचा गंड व्यापून उरला आहे असे करुणाला वाटले. जयवंतीबरोबर राजीव देखील करुणाच्या खोलीत आला. राजीवला भरतला बघून आनंद झाला होता. करुणाला जयवंतीचा खूप राग यायचा पण वाटायचे की, ती एक स्त्रीचं रुप आहे. एका सर्वसामान्य व साध्या स्त्रीचे. त्यामुळे तिला ती किंवा दुसरी स्त्री यात फरक दिसत नव्हता. सगळया आयुष्याच्याच मग हुबेहूब रेषा दिसतात.

एकदा करुणाला भेटायला गीता आली होती. करुणाने अधिक सावध रहायला हव असे तिला वाटत होते. ती भरतचा नाद सोडून द्यायला सांगत होती. अशा नात्यात काही

अर्थ नसतो. जगात यशस्वी होण्यासाठी रुप, पैसा, नशीब या गोष्टी लागतात आणि करुणाजवळ त्या गोष्टी होत्या. गीताचे लहानपण फार सुखाचे नव्हते. पुष्कळ कष्ट व जबाबदाऱ्या होत्या म्हणून ती शिकवत गेली व इतरांना शिकवत गेली. करुणा ज्या समाजात रहात होती, तिथे अजून काही चांगल सापडण्याची शक्यता होती. गीताला भरतची दया येत होती, पण दयेवर आयुष्य घालवता येत नाही म्हणून तिने हा मार्ग पत्करला होता. गीताला करुणाची भरतवरची छाया पुसून टाकायची होती. भरतची दार गीताला फक्त स्वत:साठी उघडी हवी होती. गीताला तिच्या खेळात रस नव्हता. तिने भरत बरोबर रात्रीच्या रात्री अपयश वाटून घेतलेले होते. करुणाचे नकळत भरतवर प्रेम बसले होते. करुणा नाही म्हणाली, पण गीताचा त्याच्यावर विश्वास नव्हता. करुणा म्हणाली की, तिला जे काही सांगायचे आहे त्याला फार उशीर झालेला आहे.

गीता करुणाकडे येणार आहे हे भरतला माहीतच नव्हते. नाही तर त्याने गीताला करुणाकडे येऊच दिले नसते. भरतचे तिच्याबरोबर लग्न झाले होते आणि भरत लग्न या जुन्या पुराण्या संस्थेला मानत होता. त्याची प्राथमिक समजूत होती की, त्याशिवाय कुठल्याही दोन व्यक्ती एकत्र राहू शकणार नाहीत. चांगल्या समाजाला चांगल्या मुलांची गरज असते आणि चांगली मुले निर्माण करायला घरं पाहिजेत. घर बनविण्यासाठी, टिकवण्यासाठी लग्न करायला पाहिजे. त्याने हे सुद्धा सांगितल की, त्याची दारे नेहमी गीतासाठी उघडी राहणार आहेत.

करुणाने निर्णय घेतला. ती आपली पुस्तके लायब्ररीला देणार होती. जयवंतीला त्याचेच आश्चर्य वाटत होते. तिने गाडी स्टेशनकडे घ्यायला सांगितली. 'क्यू' मध्ये आठ – दहा माणसे होती. तो सगळा तिच्यासाठी नवा अनुभव होता. तिने मुंबईचे सेकंड क्लासच तिकीट काढले. घरी आल्यावर तिने जयवंतीला सांगितल्यावर ती भीतीने थरथरल्यासारखी झाली. ती प्रशांतकडे राहणार होती पण त्याला अजून घर मिळाले नव्हते आणि तिथे कोणतीच सोय नव्हती. ते दोघे कसे रहणार होते? पण करुणा म्हणाली की, आपोआप सगळयातून मार्ग निघतो. जर प्रयत्नच केला नाही, तर शक्यता कशा निर्माण होणार?

करुणाने बॅग भरली तिच्या वडिलांनी तिला बोलावले होते. त्यांना फक्त करूणाने जाणूनबुजून सगळा निर्णय घेतला आहे की नाही? एवढीच खात्री करुन घ्यायची होती.

कारण बाप म्हणून तेवढ कर्तव्य राहू नये. तिला पुन्हा परत यायला जागा नव्हती. तारकाचा चेहरा अनिश्चित होता. जयवंती दाराआड लपून होती. तारकाने तिकीट रद्द करायला सांगताच, करुणाने आपला निर्णय बदलणार नसल्याचे सांगितले. ती स्वत: सगळ निभावून नेणार होती. सगळे वातावरण निवळल्यासारखे झाले. प्रत्येकजण कामात रमून गेला. झालेली घटना करुणाने तारीख घालून डायरीत लिहण्यास सुरवात केली.

एकीकडे प्रशांतच्या प्रेमात आकंठ बुडालेली करुणा तिकडे भरतमध्ये देखील गुंतली. शेवटी त्याची दारे फक्त त्याच्या बायकोसाठी, गीतासाठी उघडी आहेत. हे कळाल्यावर सगळं सोडून ती प्रशांतकडे कायमची राहण्यासाठी निघून गेली.

**४ ) दिशा घराच्या :-**

'दिशा घराच्या' कथासंग्रहातील ही चौथी आणि शेवटची कथा आहे. मनाने जी कमकुवत माणसे असतात त्यांची अवस्था कशी होते हे सानियांनी अरुंधतीच्या माध्यमातून दाखवून दिले आहे.

अरुंधतीने एम.कॉम. केलेले आहे. कॉलेजमध्ये ती शिकवत होती. दिसायला देखील छान, चटपटीत आणि प्रसन्न पद्मनाभ हे अरुंधतीच्या वडिलांचे सिनीअर. ते तिच्या घरी सारखे यायचे, तिचे लाड करायचे. अरुंधतीला पहिली मुलगी आणि आपली मुलगी सुचित्रा हिला गमतीने दुसरी मुलगी म्हणायचे. ते तिच्या प्रत्येक निर्णयात आवर्जून मत द्यायचे. तिने लेक्चरशीप करावी, यासाठी त्यांनीच प्रोत्साहित केले. दिनेशबरोबर लग्न करायचा निर्णय बरोबर की चूक? आणि नंतर अंजन बरोबर लग्न करण्यासाठीचा निर्णय त्यांनीच दिला. त्यांनी तिला स्वत:च्या हाताखाली मदत करायला घेतले होते. त्यामुळे काहीही जरी झाले तरी अरुंधती प्रथम पद्मनाभलाच सांगणार.

दिनेश अरुंधतीचा पहिला नवरा, खूप उत्साही आणि मित्रमंडळींची आवड असणारा माणूस होता. त्याला लवकर मूल हवे होते. पण अरुंधती नको म्हणताच खट्टू झाला. पुढे होत नाही म्हणाल्यावर हवालदील व्हायचा. काहीतरी उपाय करायचे ठरवल्यावर, तो न सांगताच कायमचा निघून गेला-परत कधीही न येण्यासाठी. त्यावेळी त्या दु:खातून पद्मनाभनीच अरुंधतीला सावरले होते. जगण्याची उमेद तिच्या मनात निर्माण केली. घर, घरातील दिनेशच्या वस्तू बघून तिला कुठेतरी पळून जावे वाटायचे पण

पद्मनाभच तिला म्हणायचे की, पळून गेलं की दुप्पट वेगानं ज्याच्यापासून पळायच ते मागे लागते. एकदा सवय झाली की मग कशाची भीती उरत नाही. ती स्वत: विचार करायला समर्थ नव्हती. प्रत्येक वेळी तिला वाटे, की पद्मनाभशिवाय आपल्याला कोणी समजून घेऊच शकणार नाही. तसे पाहिले तर तिच्याभोवती पद्मनाभच एक वर्तुळ तयार झाले होते आणि त्या वर्तुळातून अरुंधती बाहेर पडायला तयार नव्हती.

अंजन हा अरुंधतीचा दुसरा नवरा. त्या दोघांचे लग्न होऊन दोन वर्षे झाली होती. अंजनची पहिली बायको शारदा जिवंत होती. त्याला विनी नावाची एक मुलगी होती. ती कॉलेजला होती. शारदाचे आणि अंजनचे पटत नव्हते, म्हणून एके दिवशी अंजन घर सोडून मित्राच्या रुमवर राहण्यासाठी गेला आणि नंतर त्याने अरुंधतीशी लग्न केले होते. एखाद्या गोष्टीसाठी अरुंधतीबरोबर वाद घालण्यात अर्थ नाही हे त्याने ओळखले होते.वादासाठी वाद घालायचा ही तिची प्रचंड हौस. बाजू पटली तरी केवळ स्वत: हरायचे नाही, एवढयासाठी ती वाद घालायची. हा तिचा गुण अंजनने बरोबर हेरला होता. त्याला तिच्या जितक्या चांगल्या गोष्टी जाणवल्या, त्या त्याला बऱ्याच आवडल्या. ज्या आवडल्या नाहीत, त्या सहन करुन घेता येतील इतपत समजून घेतल्या, बाकी सोडून दिल्या. त्याला निसर्गाचे खूप आकर्षण होते. त्यामुळे ट्रीपला गेल्यानंतर बोटिंग करण्यापेक्षा त्याने डोंगर, तळी बघायचे पसंत केले.

ट्रीपवरुन आल्या आल्या तिने पद्मनाभला फोन केला. अंजनने कारण विचारताच ती म्हणाली की पद्मनाभना कुणी बाहेरगावी जाऊन येईपर्यंत त्यांच्या जीवात जीव नसतो. उद्यापासून तिचे रुटीन सुरु होणार होते, पण ती आपल्या कामावर खूष होती. शिकवण्याची सवय होती आणि त्यात हातखंडा असेल तर प्रश्नच नव्हता. अंजनबरोबरच्या आयुष्यात तक्रार करण्यासारखे काही नव्हते. पद्मनाभ त्याच्याबरोबरच्या एक-दोन भेटीनंतरच अरुंधतीला म्हणाले होते की, माणूस चांगला, हुशार आणि मऊ हृदयाचा आहे. त्यांना अशी माणसे आवडतात. त्याच दिवशी विनीचा फोन येतो. ती त्याच्या ऑफिसमध्ये भेटायची, असे अंजनच तिला म्हणाला होता. ती शेजारच्या कॉलेजमध्ये पोस्ट ग्रॅज्युएशनच्या संध्याकाळच्या क्लाससाठी यायची. तेव्हा तिला घरी बोलवायला अरुंधतीची काहीच हरकत नव्हती, पण अंजन फारशी उत्सुकता दाखवायचा नाही. शारदाचे युटेरसचे

ऑपरेशन झाले होते, पण अंजन भेटायला तयार नव्हता. कारण एकदा संबंध ठेवायचे नाकारल्यावर हा प्रश्नच येत नव्हता. अरुंधतीच्या मनात नसूनदेखील, वरच्या मनाने त्याला भेटायला जायला सांगितले. तिला तिच्या म्हणण्यातील पोकळपणा जाणवला.

अरुंधतीने पद्मनाभना विनीचा फोन आल्याचा सांगितले. पद्मनाभ प्रथम गप्पच बसले. अंजनने तिला विनीबाबत परत काहीच सांगितले नव्हते. त्याने का सांगितले नसेल याचे उत्तर ती पद्मनाभकडे मागत होती. शेवटी ते तिला म्हणाले की,इतकी वर्ष त्याने त्या दोघींबरोबर काढल्यामुळे कुठेतरी धागे दोरे असतातच. त्याच्या भूतकाळावर स्वत:चा हक्क तिने सांगू नये असे त्यांना वाटत होते. त्याला कदाचित आपले प्रश्न आपण सोडवावेत असे वाटत असेल. पद्मनाभने असे तिला सांगितल्यावर तिला जरा बरे वाटू लागले.

अंजन शारदाला भेटायला दवाखान्यात गेला. अंजनने शारदाला काही पैशाची गरज आहे का? विचारताच ती रडू लागली. अंजनला ते आवडले नाही म्हणून तो बाहेर पडला. विनी त्याच्या पाठोपाठ आली. तिने सांगितले की ब्लॉकचा मालक शेट्टीचे पत्र आल्यापासून ती वेडयासारखी वागत होती. भाडयाचे घर देखील दयायला कुणी तयार नव्हते. त्यातूनच शारदाला हा त्रास उद्‌भवला. जागेसारख्या क्षुल्लक बाबीकरिता तिने अंजनकडे जायच नाही असे ठरवले होते, पण शेवटी जावेच लागले. कारण शेट्टी अंजनच्या कंपनीत होता आणि ते दोघे एकमेकांना चांगले ओळखत होते. शारदाला वाटत होते की, हे काम अंजनचे असणार हे तिचे मत अंजनने बरोबर ओळखले होते.

अरुंधती पद्मनाभला भेटायला त्यांच्या घरी गेली. दोघीही नव्हत्या. थोडया वेळाने सुचित्रा आणि पमा त्यांची बायकोही आली. पद्मनाभला सुचित्रा लग्न करुन, कुठेही बाहेर पडली असती तर ते त्यांना चालले असते. पण सुचित्राला लग्नच करायचे नव्हते कारण ती खूपच स्वतंत्र वातावरणात राहिलेली मुलगी होती. तिचे वागणे पद्मनाभला आवडत नव्हते. ती एकटी रहायला समर्थ आहे असे तिला वाटत होते. सुचित्रा घर सोडायला तयार होती. तिला तिच्या मित्राबरोबर सुट्टीचे चार-पाच दिवस बाहेरगावी घालवायचे होते. याला पद्मनाभचा विरोध होता. कारण तिने त्या मित्राशी लग्न केलेले नव्हते. एखाद्याबरोबर आयुष्यभर पटणार नाही याची खात्री झाल्यावर लग्नाचा प्रश्नच येत नाही, असे तिचे

म्हणणे होते. यावरुन पद्मनाभचे आणि तिचे भांडण झाले. सुचित्राला एकटे रहायचे होते, कुणाचेही बंधन नको होते. पद्मनाभना खर तर चांगल्या गोष्टींची आवड होती. केवढा तरी संग्रह त्यांनी पोटाला चिमटा घेऊन जमा केला होता. सुचित्रा त्याला हसायची, पमाने तर कधीच त्याला दाद दिली नव्हती. पद्मनाभसारख्या रसिक माणसाने, तिच्यासारख्या बाईबरोबर कसा संसार केला असेल याचे तिला आश्चर्य वाटे.

ते दोघे बाहेर बरेच दिवस झाले नाटक, सिनेमा बघायला गेले नव्हते. पण अंजनच्या मते कलेचा कोणताही प्रकार केवळ करमणुकीसाठी असू शकत नाही. चांगल जर अनुभवायच असेल तर गंभीर, खरं आयुष्याला हात घालणार हवं. अरुंधतीकडे बघून ती किती वयाची आहे ? बाहेर नोकरी करणारी आहे, आयुष्यात कोणत्याही कठीण प्रसंगाला तोड देणारी असेल असे वाटत नव्हते. तिने गंभीरपणे, खोलात जाऊन काही अनुभवलच नव्हते. तिला सगळयाची सोपी, रेडिमेड उत्तरे हवी असतात. अरुंधती रडायला लागली. एकमेकांवर रागवण्यासाठी त्या दोघांनी लग्न केले नव्हते. अंजनला जाणवले की, प्रत्येकाच्या वाटा आणि अर्थ निरनिराळे असतात.

पुढे एकदा अंजन विनीला भेटायला गेला शारदाची चौकशी केली. त्याला पहिले दिवस आठवले. विनी पहिल्यापासून त्याची लाडकी होती. तो जास्तीत जास्त कामात असायचा. त्या काळात शारदाने बरोबर तिला आपल्या पाठीशी घातले. विनीला खूप काम असल्याने साधे मित्रच काय, मैत्रिणीदेखील नव्हत्या. लग्न करुन देखील तिची सूटका होणार नव्हती. कारण तिची आई अशा मुलाच्या शोधात होती की, जो तिला त्याच्या घरातून हाकलणार नाही. आईला सोडून ती सुखी होणार नव्हती. तिने सुखी व्हायला काय करायला हवे होते? विनी इतकी भित्री, संशयी बनली होती की, एकटीने आयुष्य जगायचे राहोच, पण साधे निर्णयसुध्दा होता घेत नव्हते. अंजनाला वाटले, यात आपली जबाबदारी काय? तिने कबूल केले की आईचे आतार्यंत खूप चुकले, त्याला समजून घेतले नाही, त्याला त्रास दिला. पण जितकी ती त्याला प्रतिकूल, तितकाच तो ही प्रतिकूल होता. त्याने सरळ घर सोडले होते. पण शारदाला मुलीचे लग्न, घराचा प्रश्न, पैशाची चणचण, एकटेपणा, आजारपण आणि भीती होती. शारदा म्हणाली होती म्हणून ती अंजनला भेटली होती. अंजन जे म्हणेल ते त्याला हवच असते हेच विनीला नको वाटत होते. विनीला

सगळं थांबवायचे होते. तिला अंजनबरोबर परत संबंध ठेवायचे नव्हते. कदाचित पुढे पाच दहा वर्षांनी काही निराळ शिकता आले तर ती वेगळी गोष्ट होती.

पद्मनाभचा वाढदिवस आपल्या घरी साजरा करायचा ही कल्पना अरुंधतीची होती. शब्दांच्या पलीकडे काही नाती असतात अस त्यांचे नाते होते. पद्मनाभचे ऋण शब्दांनी पुरे होणार नव्हते. पद्मनाभला सोडून येईपर्यंत तिला जाणवले की, काहीतरी राहून गेल आहे किंवा संपण्याच्या मार्गावर आहे. अंजन तिला ऑफिसमधील काही गंमत सांगणार होता. पण तिचा मूड नव्हता. त्याला राग आला. तो म्हणाला की स्वत:च आयुष्य स्वत: जगायच असते आणि जगायला हवे. दुसऱ्यांच्याही वर्तुळाच्या मर्यादा असतात. सगळया गोष्टी ताणल्या जाऊन विचका होईपर्यंत वाट बघायची नसते. पद्मनाभनी तिच्यासाठी खूप काही केल होते, हे त्याला माहीत होते. पण अंजनचा त्यावर राग नव्हता. अंजनला अरुंधती एक स्वत: निराळी व्यक्ती म्हणून हवी होती. तिने पद्मनाभएवढेच छोटे जग समजून आयुष्य थांबवायला नको होते. अंजन म्हणाला, पद्मनाभने तिला एका चौकोनात बंद करुन ठेवले आहे आणि तिला वाटत होते की त्याशिवाय ती जगू शकली नसती. अरुंधतीला वाटले, आपल्याला साधे, सरळ आयुष्य वाटयाला येतच नाही. दिनेशबरोबर सुखी संसार केला असता. पण तो ही निघून गेला. आता अंजनबरोबर नवीन संसार आनंदाने जगायला काय हरकत होती? पद्मनाभला जर आयुष्यातून काढून टाकले तर जगण्यासारखे काहीच शिल्लक नाही असे तिला वाटले.

पुढे अंजन रोजच उशीरा येऊ लागला. नकळत त्याने अरुंधतीची आणि शारदाची तुलना केली. अरुंधतीमुळे त्याला रहायला फ्लॅट, संसार नावाची वस्तू, झोपायला हक्काची स्त्री मिळाली होती. पण तरीही त्याला वाटले की, एका स्त्रीहून दुसऱ्या स्त्रीत काय फरक असतो?

अरुंधतीने विनीचा फोन येऊन गेल्याचे सांगितले. दोन-तीन दिवसापूर्वी फोन आला होता. पण अंजनला वाटले की, अरुंधतीने मुद्दामच सांगितले नव्हते. पण त्या दोघांची भेट शांतपणे झालीच नव्हती. अंजनला वाटले की, ते क्षण मुद्दाम फसवून गेले होते. परत कधीही न येण्यासाठी. तिला वाटत होते की अंजनने तिला काहीतरी सांगाव, ते ती वाटून घ्यायला तयार होती. पण अंजन तिला म्हणाला की, आपल्या गोष्टी आपण सोडवाव्यात,

तिच्यासारखी त्याचा कुणाच्या आधाराची गरज नव्हती. तिला हे सगळ पद्मनाभना सांगायचे होते, पण ते गावाला गेले होते. अंजनला विनीचा फोन येऊन गेल्यापासून तिला भेटायची खूप ओढ लागली होती. म्हणून तो तिच्या कॉलेजवर गेला, पण विनी कॉलेजला येत नव्हती. तो घरी न जाता हॉटेलमध्ये गेला. तिथे त्याला सुचित्रा दिसली. ती एका मध्यमवयीन माणसाबरोबर आली होती. अरुंधती अलीकडे पद्मनाभकडे आली नव्हती म्हणून तिने सांगितले. जाताना अंजनला तिने वाटेत सोडायला सांगितले. तो नाखुषीने उठला. त्याला विनीची आठवण येत होती.

सुचित्रा सांगू लागली की दिनेश वारल्यानंतर अरुंधती एकदम कोसळली. पण पपांनी तिला सावरले, तिला उभी केली, पण स्वत:च उभे राहणे वेगळे. मग पद्मनाभ आणि ती दोघेही कोसळले. अंजनशी लग्न केल्यावर पद्मनाभना वाटले की ते वाचतील पण अरुंधतीने ते कधी समजून घेतले नाही. हे सगळे सांगण्याचे कारण म्हणजे यात तिची सगळी आवडती माणसं गुंतलेली होती. पद्मनाभचे आणि तिचे होणारे संवाद अरुंधतीला कधीच कळणार नव्हते. कितीही भांडले तरी ते दोघे मित्र-मैत्रिणीच जास्त होते. पण एवढे केले तरी सुचित्राचा अरुंधतीवर राग नव्हता. अंजन नाही म्हणाला तरी लग्न केल्यापासून अरुंधती त्याच्या प्रेमात पडली होती.

अंजन भेटला नसता तर तिने मुद्दाम भेट घडवून आणली असती. पद्मनाभ आता म्हातारा व्हायला झाले होते. राहिलेल्या आयुष्यावर तरी त्यांचा हक्क असावा असे त्यांना वाटत होते. म्हणून त्यांनीच सुचित्राला अंजनची भेट घ्यायला सांगितली होती. अंजनचा विश्वासच बसत नव्हता. जाताना ती म्हणाली की, जी माणसे आतून समर्थ असतात, त्यांना कुणी वाचवण्याची गरज नसते. ती कायम एकेकटी असतात. पण अरुंधतीसारख्या लोकांना नेहमी आधाराची गरज असते. असे म्हणून ती निघून गेली.

अजूनही समाजात काही अरुंधतीसारखी माणसे आहेत. की ज्यांना स्वत:चे निर्णय स्वत: घेता येत नाहीत. त्यांना नेहमी दुसऱ्यांच्या आधाराची कुबडी घ्यावी लागते. त्यामुळे ते दयेचे पात्र होतात. एकाचवेळी दूर गेलेली विनी आणि अरुंधतीविषयी वाटणारे प्रेम याची अंजनला जाणीव होते आणि तो घरी जातो. पण असे वाटते की खरंच अरुंधती पद्मनाभशिवाय जगू शकेल?

**''दिशा घराच्या'' कथासंग्रहाचे विशेष :-**

सानियांनी विशेष करुन आजच्या स्त्रीजीवनावर लिहलेले आहे. पण स्त्रीजीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोण अगदी भिन्न आहे. आजपर्यंत स्त्रियांचे वर्णन एक प्रेम पात्र, किंवा आदर्श भारतीय नारी या स्वरुपात झालेले दिसते. पण सानियांनी स्त्रियांचे चित्रण नव्या जीवनाच्या संदर्भात केले आहे. स्त्रीमनाचा घेतलेला वेध अधिक खोल आहे. मानवी नात्याचा शोध हे त्यांच्या लेखनाचे सूत्र आहे. प्रत्येक व्यक्तीला दुसऱ्याचा आधार महत्वाचा असतो. कितीही एकटे राहण्याचा प्रयत्न केला तरी सुद्धा आपल्याला दुसऱ्याच्या आधाराची गरज भासते हे सानियांनी दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**१ ) ''दिशा घराच्या'' कथासंग्रहामधील स्त्रीचित्रण :-**

'दिशा घराच्या' या कथा संग्रहात सानियांनी शहरी भागात वास्तव्य करणाऱ्या स्त्रियांची विविध रुपे चित्रीत केलेली आहेत. स्त्रिया कितीही शिकल्या, कितीही कामे केली तरी त्यांना दुय्यमच वागणूक दिली जाते. मग ती डॉक्टर असो, गृहिणी असो अगर दुसऱ्या कोणत्या क्षेत्रातील असो. उच्चशिक्षित स्त्रियांची चित्रणे येथे केलेली दिसून येतात. मीरा, राधिका, करुणा, गीता, अरुंधती, विनी या सारख्या स्त्रियांची चित्रणे सानियांनी रंगवली आहेत.

'पुन्हा एकदा जन्म' मधील मीरा हुशार डॉक्टर आहे. तिचा जुळा भाऊ वृंदावन हा साधा ग्रॅज्युएट आहे. ती प्रयोग म्हणून हरिहरच्या प्रेमात पडते. पण शेवटी तो तिला सोडून जातो. वृंदावन देखील घर सोडून तिच्याकडे रहायला आलेला असतो. पण त्याला आपली कर्तव्ये, जीवन वेगळे आहे याची जाणीव होते. आणि तो देखील तिला सोडून जातो.

'त्यानंतर ...' कथेतील राधिका ही बी.ए. झालेली आहे. तिचा नवरा ललित याने तिला घराबाहेर पडायला कोणतेच कारण शिल्लक ठेवले नव्हते. ती आणि तिचा मुलगा अमोल, घर यातच ती गुरफटते. पण अचानक ललित तिला घर सोडून जाणार असल्याचे सांगतो. सोळा वर्षे त्याने राधिकाबरोबर संसार केलेला असतो. ललित गेल्यानंतर तिला पार्थ भेटतो. ती त्याच्याशी संबंध ठेवते. पण अचानक दीड वर्षांनी ललित परततो. राधिकाच्या म्हणण्याप्रमाणे परत ते दोघे संसार करु लागतात.

'दारं उघडावीत ...' मधील करुणा ही बी. ए. झालेली, श्रीमंत घरातील एकुलती एक मुलगी आहे. तिने मनात आणले असते तर पुढे शिकली असती. पण तिला त्या ठराविक साच्यातून जायचे नव्हते. त्यापेक्षा तिने घरी केवढा तरी पुस्तकांचा संग्रह केला होता. तिचे आपल्या वहिनीच्या भावावर प्रेम आहे, प्रशांत त्याचे नाव. पण तो स्वत: आर्किटेक्ट असून त्याला मुंबई मध्ये रहायला घर नाही. तरी सुद्धा ती आपले घर सोडून त्याच्याकडे रहायला जाते.

'दिशा घराच्या' मधील अरुंधती ही शिक्षिका आहे. पण आपले निर्णय कधीच स्वत: घेत नसे. तिचा पहिला नवरा वारल्यानंतर, तिच्या वडिलांचे सिनीअर पद्मनाभ म्हणून होते. त्यांनीच तिला सावरले होते. लहानपणापासून ती त्यांची लाडकी होती. तिने दुसरे लग्न अंजनबरोबर केले. ते देखील त्यांना विचारुनच. ती विसरुन गेली होती की दुसऱ्याला देखील आयुष्य असत. ते स्वत: तिच्यापासून दूर जायला बघत होते. पण ते तिला समजत नव्हते. त्यांच्या विषयावरुन अंजन आणि अरुंधतीमध्ये खटका देखील उडत असे. शेवटी पद्मनाभची मुलगी सुचित्रा या सगळयाची कल्पना अंजनला देते. अंजन परत तिच्या प्रेमासाठी घराकडे वळतो.

**२ ) प्रेमविवाहाकडे कल :-**

कथेच्या नायिका उच्चशिक्षित असल्याने वैदिक विवाहापेक्षा, प्रेमविवाह करण्याकडे त्यांचा कल दिसून येतो. त्या विलक्षण हट्टी व जिद्दी असल्यामुळे मनात भरलेल्या तरुणाला प्रेम करायला व विवाह करायला भाग पाडताना दिसून येतात.

'पुन्हा एकदा जन्म' कथेतील मीरा प्रयोग म्हणून हरिहरच्या प्रेमात पडते. जबरदस्तीने त्याला लग्न करायला भाग पाडते. तो तिचा उपभोग घेऊन वेळ येताच तिला सोडून देतो. तसे पाहिले तर 'त्यानंतर...' कथेतील राधिकाचे आणि ललितचे लग्नाअगोदर भेटीगाठी, एकमेकांना पत्र पाठवणे असे चालले होते. पण ललितचे विचार खूप वेगळे होते. राधिकाची कुवत त्याला समजण्याची नव्हती. त्याला कळले होते की, राधिका ही आपल्या विचारात बसणारी नाही. म्हणून तो राधिकाला सांगतो. पण राधिकाने त्याच्यावर प्रेम असल्याचे सांगितल्यावर लगेच नाही पण बऱ्याच वेळांने तो तिला लग्नासाठी होकार देतो.

'दारं उघडावीत...' मधील करुणाचे प्रशांतवर खूप प्रेम आहे. पण त्याला रहायला मुंबईत घर नाही. तो तिच्या वहिनीचा भाऊ. त्यामुळे तो अधूनमधून घरी यायचा. त्यातून त्या दोघांचे संबंध वाढत गेले. लग्नाअगोदर देखील त्या दोघांचे शारिरीक संबंध आलेले असतात. ती जेव्हा आपला निर्णय घरी सांगते, त्यावेळी तिचे वडील तिला सांगतात की, परत घरी यायला जांगा नाही. तरी देखील ती आपला निर्णय बदलत नाही.

अशा तऱ्हेने प्रत्येक नायिका प्रेमासाठी आसुसलेली आहे. ती पुढच्या व्यक्तीला देखील प्रेम करायला भाग पाडते. पण ते फारसे टिकत नाही. कधी मधूनच तुटून जाते पण नायिकांचा आशावाद जबरदस्त आहे. 'पुन्हा एकदा जन्म', 'त्यानंतर...'या कथेतील नायिकेचे एकतर्फी प्रेम आहे. पण जबरदस्तीने ती लग्न करायला भाग पाडताना दिसून येते.

**३ ) विवाहबाह्य संबंध :-**

माणसाला अन्न, वस्त्र, निवारा या बरोबर आणखी एक गरज असते, ती म्हणजे शरीराची. वासना प्रत्येकाच्या मनात असतेच. त्यासाठी विवाह ही संस्था अस्तित्वात आहे. जर 'विवाह' ही संस्थाच नसती, तर माणूस हा नीतिहीन झाला असता. साहजिकच समाजात चांगले काय आणि वाईट काय यात भेदच राहिला नसता. चांगला समाज, चांगली मुले, चांगला देश कधी निर्माणच झाला नसता. त्यासाठी विवाह ही संस्था चिरकाल टिकायला हवी.

'दिशा घराच्या' कथासंग्रहातील नायिकांचे लग्नाअगोदर किंवा लग्नानंतर देखील दुसऱ्या पुरुषाबरोबर संबंध दाखवले आहेत. त्यांना पुरुषाचा आधार महत्वाचा वाटतो. म्हणून इंदुमती शेवडे म्हणतात की "स्वमुक्तीचा ध्यास असूनही पुरुषांशिवाय त्यांचे भागत नाही. म्हणून एक किंवा अनेक पुरुषांशी त्यांचा संबंध येतो. बहुतांशी तो शारिरीक पातळीवर राहतो. त्याबद्दल त्या बिनदिक्कतपणे व न संकोचता सांगतात पण लेखनात अपरिपुर्णतेची वेदना आहे."[३]

'पुन्हा एकदा जन्म' मधील मीरा प्रयोग म्हणून मीरा हरिहराच्या प्रेमात पडते. जबरदस्तीने त्याला लग्न करायना भाग पाडते. लग्नाअगोदर त्याच्या खोलीवर जाऊन त्यालाच आडवे करते. शेवटी तो तिचा उपभोग घेतो आणि सोडून देतो.

'त्यानंतर...' कथेतील राधिकाचे लग्न ललितबरोबर झालेले असते. पण अचानक एके दिवशी तो तिला सांगतो की, तो घर सोडून जाणार आहे. कुणीकडे जाणार हे त्याचे त्यालाच माहीत नव्हते. ललित निघून गेल्यानंतर एके दिवशी तिची भेट पार्थ बॅनर्जीबरोबर होते. त्याला देखील बायको आणि एक मुलगी आहे. पण ते वेगळे रहात असतात. ललित घर सोडून जातो. तिचा मुलगा अमोल शिक्षणासाठी घराबाहेर पडतो. त्यामुळे घरी कुणीच नसते.

ही कथा जेव्हा प्रकाशित झाली. त्यावेळी त्यांना चांगला प्रतिसाद मिळाला. उलट सुलट चर्चा झाली. लेखिकेकडे बरीच वाचक पत्रे आली. सानिया म्हणतात, "त्यातल्या बहुतेकांना मला कथेद्वारे काय म्हणायचे आहे हे आणि त्याच्या शेवटाची अपरिहार्यता समजलेली होती. घर या संकल्पनेबाबत मला पडणारे प्रश्न मी मांडायचा प्रयत्न केला आहे. हे ही त्यांच्यापर्यंत पाहोचलेले दिसते. सनातनी प्रतिक्रिया विशेषत: विवाहबाह्य संबंधावर मात्र थेट प्रतिक्रिया संपादिकेकडे पोहोचल्या."[४]

'दारं उघडावीत...' मधील करुणाचे प्रशांतवर प्रेम आहे आणि लग्नाअगोदर त्या दोघांचे शारिरीक संबंध आलेले दिसतात.'दिशा घराच्या' मधिल सुचित्राला लग्न नकोच आहे. पण लग्नाआगोदर परपुरुषाबरोबर संबंध ठेवायला तिची 'ना' नाही.

'पुन्हा एकदा जन्म' कथेतील मीरा मालुताईचे क्लिनिक चालवायला घेते. तेथे सगळी गोर-गरीब लोक यायचे. मालुताई या एकटयाच होत्या. जबाबदारी पार पाडताना लग्नाचे तेवढे राहून गेले होते. त्यांना मरणाची फार भीती वाटत होती. कारण त्यांना फॅब्रॉईड झाले होते. हरिहर मालुताईकडे यायला नकार देतो. पण इतके दिवस त्यांनी एकटेच काढलेले असतात. शेवटी मीरा त्यांच्याकडे रहायला जाते.

अशा प्रकारे सानियाच्या कथेतून विवाहसंस्थेच्या माध्यमातून दू:खी असलेली स्त्री भेटत नाही. उलट तिने घेतलेले काही धाडसी निर्णय तिच्या दु:खाला जबाबदार असतात. विवाहसंस्था सारख्या बाबीवर त्या भाष्य करीत नाहीत. त्यातील अपप्रवृत्तीवर त्या बोलत नाहीत. अथवा विवाह संस्थेविरुद्ध बंड करणाऱ्या नायिका त्यांच्या कथेत आढळत नाहीत.

**४ ) एकटेपणाची समस्या :-**

सानियाच्या प्रत्येक कथेतील स्त्री वेगळी आहे. पण ती शिकलेली आहे. तिच्याकडे सर्व सुख समृद्धी आहे. पण तरीही ती आतून दुखावलेली आहे. त्यामुळे त्यांच्या वाटयाला एकटेपणा आलेला असतो.

'पुन्हा एकदा जन्म' कथेतील मीरा डॉक्टर आहे.पण तरीही ती दु:खी आहे. तिला पाहिजे असते असते तर तिने किती तरी पैसा कमावला असता. पण तिचे हरिहरवर प्रेम असते, तो खालच्या जातीचा असतो. पण त्याच्यासाठी ती मुंबईच्या एका छोटया, दोन रुमच्या खोलीत राहते. कारण तिला हरिहरबरोबर संसार करायचा असतो. हरिहरच्या आई-वडिलांनी मात्र तिला स्वीकारलेले नसते आणि कधी ना कधी तो एकटा परत येईल हे त्यांना माहीत असते. आणि हरिहर तिला सोडून जातो. तिचा जुळाभाऊ वृंदावन तिच्याकडे रहायला येतो. त्याची आणि हरिहरची एकदा भेट होते. हरिहर त्याला सांगतो की, मुंबई शहर आपल्यासारख्या लोकांसाठी नाही. 'शहाणा आसशील तर तुझा तू परत जा. हवं तर तिला परत घेऊन जा. नाही आली तर एकटा ...' (पृ. ३८) वृंदावन देखील तिला सोडून जातो. त्यामुळे ती एकटी राहते.

'त्यानंतर ...' कथेतील ललितने राधिकाबरोबर सोळा वर्षे संसार केलेला असतो. पण अचानक तो तिला सांगतो की तो घर सोडून जाणार आहे. आणि तो जातो देखील. त्यावेळी ती म्हणते की 'मला सोडून गेलेला नवरा म्हणून मी इतके दिवस स्वत:चा छाळ करुन घेतला. सगळयांना तोंड दिल. प्रसंगी एकटीनं, भीतीन घरात बसून दिवसच्या दिवस काढले. सगळया 'माझ्या' माझ्या माणसांना आई-सकट, मैत्रिणीपर्यत भयंकर दुखावलं आणि तो एकटेपणा पुन्हा पुन्हा विकत घेतला.' (पृ. ११७) ललित जरी दोन वर्षानंतर परत आला असला तरी मधल्या काळात बरेच काही घडून गेलेले असते. तो अनुभव राधिकाला नवा होता पण ती बरेच काही त्यातून शिकली होती.

'दिशा घराच्या' कथेतील अरुंधती अंजनशी दुसरे लग्न करते. पण तरीही ती एकटेपणा अनुभवते.कारण तिला वाटते की पद्मनाभशी असणारे संबंध तो समजून घेऊच शकत नाही. खरं पाहिल तर दोघांचे एकमेकांवर खूप प्रेम असते. पण अरुंधती एखादी साधी गोष्टही पद्मनाभला सांगत असते. त्यामुळे अंजन तिच्यावर चिडतो. दोघांमध्ये अबोला

निर्माण होतो. अंजनला अरुंधती एक स्वतंत्र व्यक्तिमत्वाची हवी असते. एक निराळी व्यक्ती म्हणून हवी असते. ती पद्मनाभच्या ऋणात होती. हे त्याला मान्य होते. त्याबद्दल त्याला आकसही नव्हता. पण तेवढेच आयुष्य मर्यादित असावे हे त्याला मान्य नव्हते. स्वत:च आयुष्य स्वत: जगायला हव असे त्याचे म्हणणे होते. म्हणून पद्मनाभची मुलगी सुचित्रा अंजनला सांगते की, पद्मनाभ आता म्हातारे व्हायला लागले. त्यांच्या उरलेल्या आयुष्यावर थोडातरी त्यांचा हक्क असावा. म्हणून अरुंधतीची काळजी घ्या. 'जी माणसं स्वत:हून, आतून समर्थ असतात त्यांना कुणी वाचवत नाही. गरजच नसते. ती कायम एकेकटीच राहतात. तुमच्या माझ्यासारखी. पण अरुंधती ...' (पृ. २१५)

अंजनची पहिली बायको शारदा आणि मुलगी विनी हिला अंजन सोडून देऊन त्याच्या मित्राकडे  जातो. आणि अचानक एके दिवशी शारदाला ब्लॉकचा मालक शेट्टीचे पत्र येते की घर खाली करुन द्या. त्यामुळे ती खूप भीती खाते. तिला अगोदरच मुलीच लग्न,घराचा प्रश्न, पैशाची चणचण, शिवाय आजारपण एकटेपणा वाटत असतो. ती लग्न करताना अशा मुलाच्या शोधात होते की  जो तिला लग्न झाल्यानंतर घरातून हाकलणार नव्हता. यातून तिला युटेरसचा त्रास उद्‌भवतो. शेवटी काय विनी आणि शारदा या दोघींच्याही वाटयाला एकटेपणा येतो.

'दारं उघडावीत...' कथेमध्ये गीता भरतची पत्नी आहे. ती त्याच्यापासून वेगळी रहात असते. पण भरतचे तिच्यावर प्रेम असते. त्याची दारे फक्त तिला आपल्यासाठी उघडी हवी असतात. करुणाबरोबरच्या खेळात तिला काही रस नसतो.पण भरत बरोबरच्या असतो. कारण भरतबरोबर रात्रीच्या रात्री अपयश तिने वाटून घेतलेले होते. पण तरीही ती शिकत गेली. लग्न होऊनसुद्धा भरतपासून वेगळी राहिली. यातूनच तिच्या वाटयाला देखील एकटेपणा येतो. "या कथांतून आढळणारी एकाकीपणाची अभिव्यक्ती भडक 'सेंटिमेंटल' नसते, ती नेमकेपणी, प्रामाणिकपणे मांडलेली असते. तो एकाकीपणा सर्वसामान्य मानवी मनाऐवजी खास स्त्रीमनाचा एकाकीपणा असतो.'"[५] अशी मार्मिक निरीक्षणे डॉ. अंबिका सरकार यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केली आहेत.

### ५ ) 'दिशा घराच्या' कथासंग्रहातील पुरुषचित्रण :-

सानिया यांच्या 'दिशा घराच्या' या कथासंग्रहात ज्याप्रमाणे स्त्रीचित्रणाने कथा भरलेल्या आहेत, त्याप्रमाणे पुरुषांचे वावरणे तितक्या सहजपणे मांडलेले दिसून येते. यांच्याही व्यथा,वेदना मांडण्याचा सानियांनी प्रयत्न केलेला आहे. ही मंडळी काही शिकत आहेत, तर काही शिकलेली आहेत. पण तरीही ते अर्थार्जन करीत आहेत.त्यांना जबाबदारीची जाणीव देखील आहे. त्यामुळे ते विचार करुनच वागतात. त्यातील एक पुरुष पात्र म्हणजे 'वृंदावन.' 'पुन्हा एकदा जन्म' या कथेत वृंदावन हा मीराचा जुळा भाऊ. पण मीरा आणि त्याच्यात काही एक साम्य नाही. मीरा डॉक्टर तर हा साधा बी.ए. झालेला. लॉचा अभ्यास करीत तो एका ऑफिसमध्ये कामाला आहे. मीराने हरिहरशी, एक खालच्या जातीतील मुलाशी लग्न केल्यामुळे आपल्या मुलाला मुलगी मिळेल की नाही म्हणून त्याच्या आईने तिच्या मैत्रिणीची मुलगी रेखा हिला त्याच्या गळयात बांधते. पण सविताचे लग्न झाल्या खेरीज त्याचे लग्न करायचे नव्हते. म्हणून ते तोपर्यंत लांबणीवर ठेवलेले असते. मीरामुळे सविताचे लग्नदेखील ठरत नसते. त्यांची आई या दोघात भेद करायची की, मीरा साधी ग्रॅज्युएट व्हायला हवी होती आणि वृंदावन डॉक्टर व्हायला हवा होता. ती मेडिकलला मुंबईला आल्यानंतर तिला वृंदावनची खरी आस तुटल्यासारखी वाटली. सुरवातीला तोच पत्रे पाठवत होता. मग मीराच थांबली. तो मुलगा, भाऊ, प्रियकर, अशा भूमिका घेऊन जगत होता. त्याला त्याचा कंटाळा आला होता. शेवटी तो मीराकडे मुंबईला निघून जातो. तिला त्याने न सांगता ही कळाले की तो सगळं सोडून निघून आलेला आहे. वृंदावनने घरी पत्र पाठवून सगळी परिस्थिती कळवली. तरीही वृंदावन मनातून नाराज राहिला. एकदा तो भटकत वेश्यावस्तीत गेला. त्याचे त्यालाच आश्चर्य वाटले की तो तिथे कसा गेला? तिथे त्याला हरिहर भेटला. त्यानेच सांगितले की, मुंबई शहर आपल्या सारख्या लोकांसाठी नाही. तो परत घरी जायचे ठरवतो. मीराला हे आंतरिक मनाने कळते.

याच कथेतील मीराचा नवरा हरिहर याचे देखील चित्रण आलेले आहे. मीरा मेडिकलला होस्टेलला होती, तेव्हा तिने हरिहरच्या खोलीवर जाऊन त्याच्या वस्तू वापरल्या होत्या. तो खालच्या जातीचा असतो. त्यालाच आडवे केले होते पण त्याने कधीच तिच्याकडे काहीही मागितले नव्हते. त्याने तिच्यावर प्रेमदेखील केलेले नव्हते. पण

मीराने त्याला लग्नाला तयार केल्यानंतर असंख्य कारणानंतर त्याने होकार दिला होता. लग्नानंतर ती एकदाच हरिहर बरोबर त्याच्या गावी गेली होती. तेव्हा सर्वजण तिच्याकडे कौतुक, प्रेम, मत्सर, अविश्वास, आश्चर्य या सगळया रीतीने पाहात होते. तिकडे तिला कुणीही स्वीकारले नव्हते. तरीही ते गप्प राहिले होते. ते त्यांचे नाटक होते. कारण त्यांना माहीत होते एक ना एक दिवस तो परत एकटाच येईल. तरीही मीराने उमेद सोडलेली नव्हती. क्लिनिकमधील पैशाचा बराचसा वाटा ती त्याला द्यायची. घरी पाठवायला किंवा त्याने स्वत:चे एम.कॉम. चे शेवटचे वर्ष अर्धवट सोडू नये. तरीही तो आपल्या कोषात परत जायचा. मालुताईंनी त्याला रहायला येण्याचे आमंत्रण दिल्यावर तो मीराला एकटीलाच जायला सांगतो. मीरा जाते देखील. हरिहर शिक्षण पूर्ण झाल्यानंतर गावी जाणार होता कारण त्याच्या गावी कॉलेज निघणार होते. तो शिकवण्यासाठी जाणार होता. तो मीराला सरळ सांगतो की, तिने यायची काहीही गरज नाही. वेश्यावस्तीत जाऊन तो आपले काम करुन येताना त्याला वृंदावन भेटतो. तो वृंदानला परत जायला सांगतो. आणि मीराला निरोप द्यायला सांगतो की तो तिचा शतश: आभारी आहे. तिच्याशिवाय तो इथपर्यंत पोहचलाच नसता.

मीराच्या वडिलांचे मीरावर खूप प्रेम होते. तस पाहिले तर बाबूजी हे तिचे सावत्र वडील. पण सगळी खरी माया. कारण तीन मुलं दिलेल्या नवऱ्याशी तिच्या आईचा संसार अर्धाच राहिला होता. बाबूजींची स्वत:ची कंन्सल्टिंगची प्रॅक्टीस चालू होती, पण त्यांना घर नव्हते. ते त्यांना इथ मिळालं. ते सदा दयाळू व सदा हसतमुख असत. कुणात कधी भेद केला नाही. मीराला मेडिकलला पाठवण्याचा उत्साह त्यांचाच. उलट सख्खे वडील वागतील असेच ते वागत आले होते.

'त्यानंतर ...' कथेमध्ये ललित प्रमुख पुरुष पात्र आहे. तो राधिकेचा नवरा होता. लग्नापूर्वी ते दोघे भेटले होते. तो अतिशय बुद्धिमान होता. त्याला सगळयाच बाबतीत विशिष्ट तऱ्हेने विचार करणारी स्त्री हवी होती तरच तो सुखी झाला असता. ललितने पत्रात कधीही प्रेमाची भाषा वापरली नाही. त्याच्या पत्रात सगळया चर्चा होत्या. त्या कोणत्याही विषयावर होत्या. राधिकेला एवढे ज्ञान नसल्यामुळे ती पुस्तके वाचून उत्तर देण्यापुरती तयार झालेली होती. पण पुढे त्याने पत्रे थांबवली. त्याला वाटले की, दोघांच्या चर्चेतून

एकत्र येणे त्याला समाधानकारक वाटत नव्हते. पण तिने जेव्हा त्याच्यावर प्रेम असल्याचे सांगितले त्यावेळी तो लग्नाला तयार झाला. ललितचे वडील आर्मीत होते आणि बहीण दीना तिच्या नेव्हीतल्या नवऱ्याबरोबर दोन मुलांना घेऊन किनाऱ्यालगतच्या प्रदेशात रहात होती. वडील वारल्यानंतर आई आश्चर्यकारकपणे दीनाकडे गेली.

तो फार प्रामाणिक, सिन्सीअर होता. शाळा, कॉलेजमध्ये कष्ट करुन, रात्रंदिवस अभ्यास करुन त्याने यश मिळवले होते. कधी पैशाची हाव धरली नव्हती. आई, वडील, बहिणीपासून तो शरीराने व मनाने सतत दूर राहिला. नाशिकच्या काका, काकूबद्दल त्याला ममत्व वाटायच. पण इतर कुणाशी त्याचे फारसे संबंध नव्हते. विजय सोडला तर दुसरा कोणी त्याला मित्रही नव्हता. तो कॉम्प्युटर टेक्नॉलॉजीत होता. त्याची करिअर पहिल्यापासून उज्वल होती. चांगली प्रमोशन मिळत होती. पण त्याच कुणाशी पटत नव्हते. खालचे बहुतेक कामचुकार, अप्रामाणिक होते. बरोबरच्याशी सूर जुळत नव्हता. वरचे निर्बुद्ध होते त्याला त्याच्यासारखे कष्टाळू, स्वाभिमानी, प्रामाणिक लोक हवे होते. आपली कंपनी कशी उभी आहे याचे त्याला आश्चर्य वाटत होते. कारण लोक काम चुकवत होते, लाच खात होते. रोजच्या पेपर, मासिकातल्या बातम्या, राजकारणाचे खेळ, गरिबांचे हाल, दलितांवरचे अत्याचार सगळे वाचून तो भडकून उठायचा. त्याची स्वतःची तत्व, नियम न ढळता तो अतिशय निर्भीडपणे बोलायचा. तो लोकप्रिय नव्हता, पण तो इतका बुद्धिमान होता की त्याला हरवून टाकणे कुणालाच फायद्याचे नव्हते. त्याला कुणीतरी शुद्ध स्वरुपात भेटायला हवे होते. अशी व्यक्ती असू शकते किंवा असायला हवी या विचारांनी तो झपाटून गेला होता. त्यामुळेच तो भराभर निराश होत गेला, तो चिडत देखील असे. घरी आल्यावर फक्त वाचतच राही. रात्री तो राधिकाजवळ बोलून दाखवायचा. ललितला नक्की काय हव आहे हे राधिकाला न कळल्यामुळे उलट ती त्याला पटवून सांगायचा प्रयत्न करायची.

दक्षिणेकडच्या ट्रीपला गेल्यावर तिथल्या उटकमंडची गर्दी बघून तो विलक्षण अपसेट झाला. मधुराईचे लोक घाणेरडे होते. आणि देवळाच्या भिंतीकडेला असंख्य बिचाऱ्या गरीब, भिकाऱ्यांची न संपणारी रांग होती. ललितला कशामध्ये सौंदर्य जाणवले नाही. ललितला फक्त एकच मूल हवे होत कारण या जगात दूसरे मुल आणणे म्हणजे

त्याला सर्वथा अन्यायाची, दुर्दैवाची गोष्ट वाटत होती. कारण येणाऱ्या मुलाला आपण कोणत्याही चांगल्या प्रकारच्या आयुष्याची हमी देऊ याची त्याला खात्री वाटत नव्हती.

त्याचा मुलगा अमोल हा मोठा होत असल्यामुळे राधिकाला दुसर काही करण्यासारखे नव्हते. ललितने तिला बाहेर पडायला कोणतंच कारण शिल्लक ठेवलेले नव्हते. राधिकाला मुलगी आवडली असती. पण ललित इतका ठाम होता की, त्याने स्वत: जाऊन ऑपरेशन करुन टाकले. सभोवतालच्या परिस्थितीमुळे ललित एकटा निराशावादी होत गेला. आणि राधिका घरात अधिकच बुडाली. एके दिवशी तो शांतपणे राधिकाला सांगतो की तो सगळ सोडून जाणार आहे. सोळा वर्षे जिच्याबरोबर संसार केलेला असतो, तिला तो सोडून निघून जातो. तिच्यासाठी घर, काही पैसे ठेवून निघून जातो आणि अचानक दीड वर्षानंतर घरी येतो. पण या दीड वर्षात बरेच काही घडून गेलेले असते. इकडे राधिकाचे पार्थशी संबंध जुळलेले असतात.

या दीड वर्षात त्याने शिकवण्यापासून अगदी हमालीपर्यंत कामे केलेली होती. ज्यामुळे तो 'ललित' बनला होता त्या गोष्टी त्याने गुंडाळून ठेवल्या होत्या. त्याला पैशाचे देखील प्रश्न पडले होते. तो आयुष्यभर ज्या विशिष्ट मार्गावरुन चालत आला होता, तिथे काही गोष्टी अशक्यच आहेत असा त्याला ठाम विश्वास होता. त्याला तडा जाऊ लागला, तेव्हा त्याला असह्य त्रास व्हायचे. स्वत:ची तत्व मोडीत निघाली म्हणून कष्ट व्हायचे. ते आताही होतातच.पण ते त्रास आता त्याने चुकवता येत होते. कारण त्याने आता साध्या-साध्या, छोटया-छोटया दडलेल्या आशा गोळा करायला सुरवात केली होती. त्याने प्रेमात आपटी खाण्याचादेखील अनुभव घेतला होता. तो जेव्हा गेला कदाचित तेव्हा त्याला आत्महत्येचा मार्गदेखील दिसला असेल. पण तो जगण्याचा धागा घेऊन परतला होता. आयुष्याला उलटंपालटं करुन विखुरलेला आशावाद त्याने गोळा केलेला होता. ललितला राधिकाची किंमत माहीत होती म्हणूनच तो तिला सोडून जाऊ शकला. त्याला जशी कल्पना होती तशीच ती वागली होती. एकत्र राहण्यातून प्रेम तर निर्माण होतेच पण या सगळयाच्या पलीकडे राधिका आणि ललित दोघेही गेले होते. ते एक निराळ जोडपं होतं. दोघांमध्ये कमालीची परस्पर समजूत होती आणि तरीही दोघात दरी होती. राधिकाला पार्थबद्दल प्रेम वाटत होते पण तरीही तिला ललितबरोबर परत एकत्र रहायचे होते. ललितला दोघेही

एकमेकांना रिस्पेक्टेबल वाटत नव्हते. ललितने पूर्वीच्या नोकरीचा राजीनामा दिला होता. राधिकाने पार्थशी लग्न करायला ललितने काहीच हरकत घेतली नाही. घर तिचेच राहणार होते. पूर्वी हिंडलेल्या ठिकाणी कुठेतरी जाऊन ललित वानप्रस्था चालू करणार होता. कारण आता पुन्हा दोघांनी आयुष्य सुरु करण्यात काहीच अर्थ नव्हता असे त्याला वाटत होते. पण राधिका त्याला एकत्र राहू म्हणत होती. ललितला वाटत होते की, परत तेच सवयीच, रुटीन आयुष्य सुरु होईल. पण राधिकाला वाटत नव्हते की आयुष्य याहून वेगळे असेल. दोघांना एकदुसऱ्याची खात्री पटली होती. शेवटी ललित तिला ये म्हणताच ती त्याच्या मिठीत जाते.

या कथेत दुसरे आलेले पात्र म्हणजे पार्थ बॅनर्जी हे होय. पार्थ हा फोटोग्राफर असतो. राधिका बीचवर गेली असताना विजयनेच पार्थची ओळख करुन दिलेली असते. शिखा त्याची बायको. त्याला एक मुलगीही आहे. पण त्या दोघांचे पटत नव्हते. एके दिवशी तो अचानकपणे राधिकाकडे येतो आणि तिथून पुढे त्या दोघांचे संबंध वाढत जातात. तो तिला पैशाची मदत करतो अणि शारिरीक जवळीक देखील वाढवतो. पुढे राधिकाला तू माझ्या बरोबर राहशील का? म्हणून विचारतो, ललित परत येईपर्यंत आणि नाही आला तर तो आयुष्यभर, म्हातारपणी सोबत करायला देखील तयार होता. पण राधिकाच 'नाही' म्हणते. तो राधिकाच्या घरीच रहायला असतो आणि अचानक एके दिवशी ललित परत येतो. ललित परत आल्यामुळे पार्थला वाईट वाटत होते. कारण आता त्याला राधिकाबरोबर राहता येणार नव्हते. ललित घरी आल्यानंतर देखील राधिका त्याला बजावते की, तो परत घरी येणार आहे. त्याला सगळे चमत्कारीक वाटत असते. तरीही तो रात्री परत यायचे कबूल करतो.

याच दरम्यान तिची ओळख दळवींशी होते. त्यांचे चिंचपोकळीला 'अनुपम वर्क्स' होते. शालिनीचा नवरा चैतन्य याने राधिकाच्या कामासाठी तिथे शब्द टाकला होता. तिथे तिला फक्त देखरेख किंवा हिशेब ठेवायला लागणार होता. पण राधिकाला तिथे उभे राहणे देखील अशक्य होते. दळवी आपुलकीने बोलत होते. ती तिथे काम करणार नव्हती. दळवींना तीन मुली व एक मुलगा होता. मुलगा वयात आला होता. पण मेंदु मात्र जनावरासारखा लहान. त्यांची बायको मुलासाठी काहीही करायला तयार होती. दळवींनी

त्यांच्या अनुपम वर्क्समध्ये अनेक पीडीत बायकांना कामाला लावून आयुष्यात मार्ग दाखवले होते. मुलींना देखील काहीना काही करायला लावले होते. म्हणजे मोठी मुलगी शिल्पकार,दुसरी मार्केट रिसर्च मध्ये, तिसरी फिल्म इन्स्टिट्यूट मध्ये तांत्रिक कोर्स करायला गेली होती आणि हा मुलगा मात्र असा. ते गुरुदत्तसारखे दिसत होते. पण ती एक प्रतिमा होती. सगळयांच्या दु:खी निराश, एकटेपणाची.त्यांची तीन नंबरची मुलगी वारल्यानंतर ते राधिकाला भेटायला जातात. ते रडायला लागतात, पण या क्षणी त्यांना राधिका आठवते. त्यांना असंख्य मित्र होते पण त्यांच्या सांत्वनाची भीती वाटत होती म्हणून ते राधिकाकडे आले होते. तिच्या चेहऱ्यावरचा आनंद त्यांनी वाचला होता. तो त्यांना खूप काळ धैर्य देणारा होता. ते तिच्याशी मुलीचे नाते जोडायला तयार नव्हते. तिच्याशी मुलीचे नाते जोडायला, कृत्रिम खोटेपणा करणे अशक्य होते. त्यांना वाटत होते की, त्यांच्या मुली ऐवजी त्यांचा मुलगा का नाही गेला? 'वाटतं, आयुष्याचं सहज उत्तर द्यावं आणि शेवटच्या पानावरच्या उत्तराशी ताडून पाहता यावं तसं...' (पृ. १०४)

अमोल राधिकाचा मुलगा. तो जेव्हा पंधरा वर्षाचा असतो. तेव्हा ललित त्या दोघांना सोडून निघून जातो. पहिल्यांदा राधिका त्याला सांगते की ते गावाला गेले आहेत. पण काही दिवसानंतर खरी परिस्थिती कळल्यानंतर त्याला खूप दु:ख होते. तो कॉलेजसाठी त्याची आत्या दीनाकडे विशाखापट्टणमला जायचे ठरवतो. अर्थात राधिकाला ते आवडलेले नव्हते. पण तरीही तो जातो. तो ललितसारखाच कॉम्प्युटर इंजिनिअर होणर होता. अमोल सुट्टीत आल्यानंतर राधिकाला खूप आनंद होतो. पण तो ललित सारखाच अबोल होता. ललित गेल्यापासून तो कमी आणि तुसडयासारखा तिच्याशी बोलायचा. पण परत जाताना ती जेव्हा त्याला स्टेशनवर सोडायला जाते तेव्हा तो तिला म्हणतो 'आय लव्ह यू ... मोअर दॅन हिम...' (पृ. १०५) अमोलच्या मनातील ओलावा तिला कळलाच नव्हता.

विजय हा ललितचा मित्र असतो. पण त्याचे फारसे चित्रण आलेले दिसत नाही. ते दोघे एकाच ऑफिसमध्ये कामाला होते. त्याला ललित घर सोडून गेला आहे हे ऐकल्यावर धक्का बसतो. तो राधिकाला पैशाची मदत हवी असल्यास करणार असतो. पण तीच नाही म्हणते. एकदा बीचवर गेल्यावर विजयने राधिकाची ओळख पार्थशी करुन

दिल्ली होती. नंतर त्या दोघांचे संबंध वाढत जातात. त्यामुळे विजयला वाटत होते की आपण आपल्या मित्रावर अन्याय केला आहे. विजयने तिला पार्थ चांगला माणूस नाही हे सांगण्याचा प्रयत्न केला. पण तिने तो उडवून लावले. तो परत कधीही तिच्याकडे जाणार नव्हता.

'दारं उघडावीत ...' कथेमध्ये भरतचे चित्रण आलेले आहे. भरत हा सेंट जोसेफ कॉन्व्हेंटमध्ये शिकवत होता. शाळेच्या सायन्स एक्झिबिशनमध्ये करुणाची आणि त्याची भेट झाली होती. तिचा भाचा राजीव त्याच्या वर्गात होता. त्याने बहुतेक आयुष्य बोर्डींग स्कूलमध्ये काढले होते. सुट्टीत फक्त वडील त्यांच्या वाटयाला येत होते. आई दोन वर्षापूर्वीच वारली होती. भरत गणित आणि भूगोल हे दोन विषय शिकवत होता. त्याला मुल फार आवडतात. विशेषत: नऊ ते तेरा वयोगटातील. त्याचे लग्न झाले होते. गीता त्याची बायको. पण ती त्याच्यापासून वेगळी रहात होती. अजून देखील ती त्याला आवडत होती. पुढे भरतचे भूगोलाचे तास कमी झाले आणि नोकरीही गेली. तो शाळेच्या उनाड मुलात खूप प्रिय होता. एकदा राजीवच्या शाळेत स्पर्धा होत्या म्हणून करुणा आणि जयवंती दोघीजणी शाळेत गेल्या होत्या. पण तिला भरत दिसला नाही म्हणून ती भेटायला त्याच्या घरी  गेली. तर तो घरीही नव्हता. शाळेच्या ख्रिश्चन शिस्तीत बसत नाही म्हणून त्याला काढून टाकले होते. त्याने गणित आणि भूगोल विषय निवडण्याचे कारण म्हणजे, दोन्हीत काही सत्य मांडलेले असतात आणि आकडयांची किंमत कधी बदलत नाही. भरताचा करुणावर खूप प्रभाव आहे असे करुणाचा प्रियकर प्रशांतचे मत होते. करुणाचे अणि भरतचे भेटणे वरचेवर चालूच असते. ही गोष्ट जेव्हा गीताला कळते, तेव्हा ती करुणाला भेटायला येते. भरतची दारे फक्त गीताला स्वत:साठी उघडी हवी होती. भरत बरोबरच्या खेळात तिला रस होता. पण खरच करुणाचे भरतवर देखील प्रेम होते. गीता करुणाला भेटाल्याचे कळाल्यावर भरत करुणाकडे गेला. त्याने देखील करुणाला तेच सांगितले की, त्याचे गीतावर प्रेम आहे आणि त्याची दारे नेहमी तिच्यासाठी उघडी आहेत पण यामुळे करुणा दुखावली होती. ती भरतकडे ओढली गेली होती. पण भरतचे फक्त

करुणावर प्रेम होते. करुणा खूप विचार करते आणि सगळं सोडून प्रशांतकडे निघून जायचे ठरवते.

करुणाबरोबर तिचा प्रियकर प्रशांतचे देखील चित्रण आलेले आहे. तो आर्किटेक्ट होता आणि मुंबईमध्ये रहात होता. करुणाची वहिनी जयवंती हिचा तो भाऊ आहे. तो मुंबईमध्ये घर घेण्याच्या खटपटीत होता. पण ते त्याला मिळत नव्हते. तो ऑफिसमध्ये दिवसभर सुंदर सुंदर ड्रॉइंग्ज काढायचा. पण त्याला रहायला साध्या दोन खोल्या नव्हत्या. हे बघून तो वैतागत होता. तो पेइंग गेस्ट म्हणून रहात होता. करुणाने प्रशांतची आणि भरतची गाठ घालून दिली. पण पहिल्याच भेटीत प्रशांतने त्याला नापसंत करुन टाकले. त्याला भरतचा करुणावर खूप प्रभाव आहे असे वाटायचे. एके दिवशी तो जसा येतो तसाच निघूनही जातो.

त्याचबरोबर करुणाचे मित्र अजय, कबीर यांचे ही उल्लेख आलेले आहेत. पण त्यांचे फारसे तपशील नाहीत. अजयचा बाप भांडवलदार होता. पण त्याला कारखान्यात जाण्यापेक्षा टेनिस खेळण्यात खूप रस होता. अजय प्रॅक्टीस देखील करत होता. पण तो सेमीफायनल मध्ये हरतो अजय तिला रात्री माझ्या बरोबर येशील का? म्हणून विचारतो पण करुणा त्याला नाही म्हणते. यापेक्षा जास्त उल्लेख आलेला नाहीत. त्याचप्रमाणे करुणाचे वडील पी. एन. प्रसाद यांचेही फारसे उल्लेख आलेले नाहीत. एकदा ते तिला शिक्षणासाठी विचारतात आणि दुसऱ्यांदा जेव्हा ती प्रशांतकडे घर सोडून निघालेली असते, तेव्हा ते तिला बजावतात की, घरी परत यायला तिला जागा नाही. ते औषधाचे वितरण करीत असतात. त्यामुळे ते सदैव बाहेरच असतात.

'दिशा घराच्या' कथेमध्ये अंजन हा एका ऑफिसमध्ये कामाला आहे. शारदा ही त्याची पहिली बायको. त्याला एक मुलगी आहे विनी. पुढे शारदाचे आणि त्याचे पटेनासे होते. म्हणून तो घर सोडून निघून जातो आणि एका मित्राच्या खोलीवर राहू लागतो. परत त्याची ओळख अरुंधतीशी होते. अरुंधतीचा पहिला नवरा दिनेश मेलेला आहे. दोघांचे पुढे सुर जुळतात आणि दोघे लग्न करतात. अचानक एके दिवशी विनीचा फोन येतो आणि चित्रच पालटते. दोघात खटके उडू लागतात. अरुंधतीला वाटत होते की, ती देखील अंजनचे दु:ख वाटून घ्यायला तयार होती. पण अंजन तिला फारसे काही सांगायला तयार

नव्हता. दिनेश मेल्यानंतर अरुंधतीच्या वडिलांचे सिनीअर पद्मनाभ यांनी तिला फार सावरले होते. अरुंधती प्रत्येक गोष्टीसाठी पद्मनाभकडे धाव घ्यायची. ती स्वत: कधीच स्वतंत्रपणे विचार करु शकत नव्हती. तिला प्रश्नांची उत्तरे नेहमी दुसऱ्याकडून हवी असत, सोपी आणि रेडीमेड. अंजनला हेच नको होते. त्याला ती एक वेगळी आणि स्वतंत्र व्यक्तिमत्वाची व्यक्ती म्हणून हवी होती. ती पद्मनाभच्या कितीही उपकारात, ऋणात असली तरी, तिने ते तेवढेच जग म्हणून थांबून रहायला नको होते असे त्याचे मत होते. विनीच्या फोनवरुन त्या दोघांत वाद निर्माण होतो. जागेच्या कारणावरुन विनीने त्याला फोन केलेला असतो. पुढे ब्लॉकचा मालक एक वर्ष थांबायला तयार होतो. तेव्हा विनी त्याला म्हणते, आपण ऐकमेकांच्यामध्ये यायला थांबवायला हवं. तसे पाहिले तर विनीनेच सुरवात केलेली होती, पण अंजनला मात्र खूप वाईट वाटते. अंजन जेव्हा कामात जास्तीत जास्त मग्न होऊ लागला तेव्हा शारदाने तिला बरोबर आपल्या पाठीशी घातले होते. विनी त्याची स्वत:ची मुलगी असून देखील त्यालाच संबंध तोडायला सांगत होती. पद्मनाभची मुलगी सुचित्रा एकदा अंजनची भेट घेते आणि त्याला सगळे सविस्तरपणे सांगते. पद्मनाभना उरलेल्या आयुष्यावर तरी हक्क हवा होता. पण त्यांना अरुंधतीपासून सुटका कशी करुन घ्यायची हे कळत नव्हते म्हणून त्यांनी स्वत: सुचित्रातर्फे अंजनला हे सांगायला लावले होते. अंजनवर अरुंधतीचे प्रेम होते. अंजनला जाणवले की, विनी दूर गेली होती आणि सुचित्रा जवळ आली होती.

पद्मनाभ नेहमी अरुंधतीला साथ करणारे. त्यांनी अरुंधतीचा नवरा दिनेश वारल्यानंतर तिला खूप सावरले होते. अरुंधतीच्या वडिलांचे ते सिनीअर होते. लहानपणापासून ती त्यांची खूप लाडकी होती. अरुंधतीला लाडाने आपली पहिली मुलगी म्हणत. ते प्रत्येक बाबतीत सल्ले देत. अगदी शिक्षणापासून, लग्नापर्यंत. दिनेश वारल्यानंतर त्याचे घर विकून ती कुठेतरी जाणार होती. पण पळून गेलं की दुप्पट वेगानं ज्याच्यापासून पळून जायचं ते मागं लागतं. हे त्यांनी सांगितले होते. पद्मनाभनी तिला हताशपणापासून जगायच कसं? ते त्यांनी शिकवले होते. अंजनबरोबर दुसरे लग्न कर म्हणून सांगण्याचा सल्ला त्यांचाच पण अंजनबरोबर लग्न झाल्यावरदेखील प्रत्येक गोष्ट पद्मनाभना सांगण्याची सवय अरुंधतीची गेली नाही.

पद्मनाभचा वाढदिवस आपल्या घरी साजरा करावा ही कल्पना अरुंधतीची. अंजन देखील काही म्हणाला नाही. पद्मनाभ देखील खूप भारावल्यासारखे झाले होते. कारण अरुंधतीने त्या दिवशी घर सजवले होते. अनेक पदार्थ केलेले होते. असा थाट अरुंधतीने आपल्यासाठी करावा याचे त्यांना आश्चर्य वाटत होते. पद्मनाभ गावाला गेल्यानंतर ती त्यांना पत्र पाठवते पण पद्मनाभ आपल्याला टाळत आहेत हे तिच्या लक्षात आले नाही. त्यांनाही स्वतंत्र आयुष्य आहे याची जाणीव ती विसरली होती. पद्मनाभ आणि सुचित्रा यांच्यात वाद जरी झाले तरी ते मित्रमैत्रीणच जास्त होते. पण त्या दोघात होणारा संवाद अरुंधतीला आयुष्यात कळणे शक्य नव्हते. शेवटी पद्मनाभनी सुचित्रातर्फे अंजनला सगळी परिस्थिती सांगायला सांगितले. पण अंजनला ते पटत नव्हते. पण तरीही ते खरे होते. अंजनला मग अरुंधतीबद्दल खरीखुरी करुणा वाटली. आपण तिच्यासाठी काही करु शकत नाही म्हणून तो अस्वस्थ झाला.

**६ ) 'दिशा घराच्या' कथासंग्रहा मधील निसर्गचित्रण :-**

'दिशा घराच्या' कथासंग्रहा मध्ये काही काही ठिकाणी निसर्ग चित्रण आले आहे. पण ते विखुरलेल्या स्वरुपात आहे. काही वेळा एका वाक्यानेच त्या निसर्गातील एखादे रुप वाचकासमोर मांडतात. उदा. 'रस्ता पुढे वळणावळणांनी गेलेला. लांबवर टेकडयांची रांग आणि सूर्य त्याही मागे.' (पृ. १३) 'माती भिजलेली होती आणि हवेत आर्द्रता.' (पृ. २३) 'थंडसं वार आणि नेहमीपेक्षा अंधारुन आलेलं.' (पृ. २३) 'पुन्हा एकदा जन्म' या कथेत फारसे निसर्ग वर्णन आलेले नाही. जे आलेले आहे ते एखाद्या ओळीतच पूर्ण केलेले आहे.

'ऑगस्टचा शेवट होता. पावसाळयाचे दिवस. पण हवा तशीच ओली, चिकचिकीत आणि गरम.' (पृ. ८६) 'करडया रंगाच आकाश, मंद वारा आणि संथपणे पसरत जाणारा वेळ.'(पृ. ९६) परिस्थितीबरोबर निसर्गाचे चित्रण आलेले आहे. 'बाहेर पाऊस सुरु झाला होता. कंटाळवाणा रिपरिप पडणारा पाऊस. जिकडेतिकडे ओलसर वास. चहाचा उग्र वास.'(पृ. ८२) अशा प्रकारे पावसाचे वर्णन आलेले आहे. 'जुलैचा शेवटचा आठवडा होता आणि खूप म्हणजे खूपच पाऊस पडत होता दिवसरात्र सारखा गळत असलेला.'(पृ. ११५) अशा एक-दोन प्रसंगाद्वारे त्यांनी निसर्गाचे चित्रण केलेले दिसते.

'दिशा घराच्या' कथेत पहाटेचे वर्णन आलेले दिसते. 'काही दिसतच नव्हतं, दाट धुक्यात सगळा परिसर गच्च होता. आतल्यापेक्षा बाहेर निळा, राखी उजेड मात्र होता.' (पृ. १७३) पुढे त्याच कथेत 'रस्ते शांत, निर्मनुष्य, ओलसर वातावरणात धुकं, थंडी आणि नुकत्याच जाग्या होणाऱ्या पक्षांचा नाद. अंजनने वेग हळूहळू वाढवला आणि मग तो पळायला लागला.कितीतरी नागमोडी, लहान रस्ते.' (पृ.१७४)

'आजुबाजूला कोणी नव्हतं. नुसतं हिरवगार ओलसर गवत, रंगीत फुलांच्या झुडपांची पाठीमागची रांग. कुणाच्या पाऊलखुणा देखील नाहीत. अंजनने हळूहळू पाय पसरले...मग शरीर. वर डोळे उघडून पाहिलं की आकाश. गवताचा हिरवा वास सगळीकडे.' (पृ. १७४) अशा प्रकारे फुलांचे, थंडीचे वर्णन येथे आले आहे.

अंजनला समुद्राचे रुप दिसते ते पुढील प्रमाणे, 'थोडया अंतरावर समुद्र होता... अंधार अंगावर झेलणारा थोडा गार, खारा वारा. पलीकडे उभ्या केलेल्या गाडया. प्रणय करायला मिळावा या उद्देशाने आलेली जोडपी आणि त्यांच्या अस्पष्ट हालचाली होत्या.' (पृ. १८५)

अशा प्रकारे कधी पावसाळा तर कधी थंडीचे वर्णन आलेले आहे. पण ते फारच थोडे आलेले आहे, तरी वेधक आणि उत्कट आहे.

**७ ) 'दिशा घराच्या' कथासंग्रहा मधील व्यक्तिचित्रण :-**

'दिशा घराच्या' कथासंग्रहामध्ये निसर्गचित्रणाप्रमाणे व्यक्तिचित्रण देखील असेच थोडयाफार रीतीने आलेले आहे. व्यक्तीचे वर्णन करताना त्यांची लिहण्याची हातोटी चांगलीच आपल्या लेखनात उतरली आहे. 'पुन्हा एकदा जन्म' कथेत वृंदावन मुंबईला गेला असताना मीरा त्याला एका वकील साहेबाकडे घेऊन जाते. तेव्हा त्याचे वर्णन पुढील प्रमाणे आलेले आहे., "जाड भिंगाचा चष्मा. पसरु लागलेलं टक्कल, सतत धूम्रपान केल्यामुळे काळे कुळकुळीत ओठ." (पृ. ३६)'त्यानंतर ...' कथेत दळवी यांचे वर्णन आलेले आहे. "लहान कुरळेसे केस, मागे गेलेले मोकळ कपाळ, जाड फ्रेमचा चष्मा आणि ओठ वर उचलणार किंचित हसू!" (पृ.६७) त्याच कथेत जेव्हा राधिका पार्थला

घरी आल्यानंतर बघते तेव्हा तिला तो पुढीलप्रमाणे जाणवला, "त्याचा चेहरा उभट होता. धारदार म्हणतात, तसं नाक, दाट केस, हाताची बोटंही लांब"(पृ.७८)

'दिशा घराच्या' कथेमध्ये पद्मनाभचे आणि पमाचे अरुंधतीला विजोड रुप जाणवते, "किती विजोड दिसतो हा जोडा! उंच, हसतमूख पद्मनाभ, स्थूल बुटकीशी पमा आणि चेहऱ्यावरचे गोंधळलेले, विरुप भाव. उलट, बघता क्षणी आपलंसं करुन टाकणारं पद्मनाभच हसू."(पृ. २०३)

अशा प्रकारे 'व्यक्ती आणि तितक्या प्रवृत्ती.' त्यामुळे कथेत येणाऱ्या व्यक्तींचे रुप काही ठिकाणी दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे व्यक्तीचे रुप आपल्या डोळयासमोर साकार होते.

**८ ) 'दिशा घराच्या' कथासंग्रहातील घरांची चित्रणे :-**

माणसांच्या प्रमुख तीन गरजा असतात. अन्न, वस्त्र, निवारा. निवारा मग तो कशाचाही असो, झोपडी असो अगर इमारत असो. त्याची गरज प्रत्येकाला असतेच. अशा निवाऱ्याचे म्हणजे घरांची चित्रणे प्रत्येक कथेत सानियांनी चितारली आहेत. 'घर असावे घरासारखे' प्रत्येक माणसाचे घर एकसारखे कधीच नसते. घरात वेगवेगळी माणसे राहतात. जसे सानियांनी जितक्या सहजपणे व्यक्ती चित्रण केलेले आहे. तितक्याच सहजपणे घरांची चित्रणे देखील केलेली आहेत.

'पुन्हा एकदा जन्म' कथेमध्ये मुंबईतील मीराचे घर वृंदावनला असे जाणवले, "ती राहात होती ती बिल्डींग जुनी, कळकट, रंग उडालेली होती. ... बिल्डींगच्या गेटमधून आत शिरलं की घाण, अरुंद, अंधारा बोळ होता. वर जायचा जिना. तोही अंधारा आणि अस्वच्छ ... दोनच खोल्या होत्या. त्यातूनं एक स्वयंपाकघर, त्यातच चौकोनी मोरी. मागे अरुंद उघडी गॅलरी." (पृ. ५)

वृंदावनमुळे मीराला आपले घर आठवते, "आपलं पाच-सहा खोल्याचं घर आठवलं. प्रशस्त स्वयंपाकघर, भरपूर प्रकाश. मागे बाग. भाज्यांचा वाफा. रोज येणारा माळी. पोळयांची बाई, आईच्या खोलीतले उंच पडदे. वृंदावनच्या खेलीतली पुस्तकांची शेल्फस्." (पृ. ६) वृंदावनला अमूक एक प्रकारच जेवण आवडायच. यावरुन तिला आपल्या घरातील जेवण देखील आठवते."तिला डायनिंग टेबल आठवलं.सहा खुर्च्यांचं.

मोठी ताटं. त्यात तीन तीन वाटया. दोन प्रकारच्या भाज्या. तोंडीलावणी. गरम गरम पोळया करुन बाई वाढताहेत. आईच चौफेरं लक्ष. दह्याच्या वाटया. बाबूजींच्या ताटापाशी पाण्याचा मोठा तांब्या.'' (पृ. ८)

वृंदावन परत आपल्या घरी आल्यानंतर त्याला मीराच घर आठवले. त्याचबरोबर इतर माणसे देखील आठवली. ''तिचा हट्ट आणि मुंबईच्या ऐन गर्दीतली ती अंधारी कळकट इमारत. कोल्हापुरी चप्पला घालून त्या फरफटल्यासारख्या चालत येणारा, झब्बेवाला, खांद्यावर झोळी अडकवून फिरणारा हरिहर. मीराचं गर्दीतलं क्लिनिक आणि बाकावर ताटकळत बसणारी गरीब बायामाणसं, मुलं, मीरा, ज्यांच्याबरोबर ते चालवते त्या दुसऱ्या डॉक्टरबाई लठ्ठ आणि उदास. कुरुप चेहऱ्याच्या.'' (पृ. १५)

मालुताईच्या घराचे वर्णन, ''मालुताईच्या घरात तीन खोल्या होत्या. स्वयंपाकघर धरुन. उजेड होता. पाणी, बाथरुम वगैरे होतच.'' (पृ. ३४)

'त्यानंतर ...' कथेतील राधिकाला जेव्हा तिची मैत्रीण रेणू मुंबईत भेटते तेव्हा तिला रेणूचे नाशिकचे घर आठवते. 'रेणू टिळकवाडीत रहायची. त्यावेळी तर तिच्या घरामागे प्रचंड मोठंच्या मोठ शेत होतं. दुपारी तिथे शांत, थंड, हिरवंगार वाटायचं. तिच्या घरी आम्ही तिघीचौघींनी कधीतरी अभ्यास केलेला आहे. मागच्या अंगणात हिरव्या चाफ्याच झाड होतं.'' (पृ. ७३)

दळवींचे ऑफिसचे वर्णन पुढीलप्रमाणे आले आहे. ''मी त्यांच्या टेबलामागे ठेवलेल्या शेल्फकडे पाहिलं. त्यावर खूप फायली होत्या. त्यातून कागद वेडेवाकडे बाहेर आले होते. कोंबलेले होते. धुळ होती. चहाचे कप ठेवल्याचे वर्तुळाकार डाग इथेतिथे होते. मागे कुठल्यातरी(मला माहीत नसलेल्या) साधूबुवाचा अर्धनग्न फोटो होता. त्याला घातलेला सुकलेला हार आणि कडेला खोचलेली अर्धी विझट उदबत्ती, भिंतीच्या करुण, पिवळया रंगावर उदासपणे शोभत होती.'' (पृ. ८२)

पार्थ राधिकाला एकदा तिच्या स्टुडिओत नेणार असतो. पण अगोदर तिला त्याच्या मित्राकडे घेऊन जातो. ती जागा म्हणजे एकप्रकारची चाळच असते. ''ती जुनी इमारत. दोनदोन खोल्याची कोंदट घाणेरडी घरं. सामाईक गॅलरी, माणसं, मुलं, बायका त्यांचे चेहेरे आणि या माणसाचं पार्थला मारणं ...'' (पृ. ११३)

'दारं उघडावीत ...' कथेतील करुणाच्या घराचे वर्णन. "त्या उघडया गच्चीच्या तिन्ही बाजूंनी भोवती विविध कुंडया होत्या. अनेक तऱ्हेची फुलं आणि शोभेची पानं असलेली झुडपं. चौथ्या बाजूला खोल्या होत्या.' (पृ. १२५) अशा प्रकारे आले आहे. करुणाचे वडील श्रीमंत असल्याने प्रत्येकाला वेगवेगळी खोली होती. तिची खोली म्हणजे एकप्रकारे लायब्ररीच होती. "खोलीच्या दोन बाजू शेल्फांनी भरलेल्या होत्या आणि त्यावर आडवीउभी असंख्य पुस्तकं होती. एक कॉट खोलीच्या मधोमध होती. त्याला लागून टेबल-खुर्ची, टेबलावर एक दिवा वरुन सोडलेला आणि पसरलेले कागद, पेन-पेन्सिली, पाकिटं, मासिकं. खाली प्लॅस्टिकची कचरा टाकायची बास्केट. चौथ्या बाजूला भिंतीतली कपाटं होती. ज्यात करुणाचे अनेक तऱ्हांचे कपडे होते. एका बाजूला पुस्तकांच्या शेल्फमध्ये खिडकीपुरती मोकळी जागा तेवढी होती. तिथून घरापाठीमागची बाजू आणि पलीकडचं घर दिसे." (पृ. १३३)

करुणाचे घर देखील खूप छान होते. "करुणा हॉलमध्ये आली. तिथे मोठा सुंदर लाल गालिचा होता. भिंतीवर सुंदर पेंटिंग्ज होती. एका बाजूला आधुनिक स्टीरिओ-सिस्टीम, अनेक रेकॉर्डस, टेप-कॅसेटस्, टीव्ही, सगळं होतं. पण पुस्तकांची खूण नव्हती. ती सगळी करुणानं स्वत:च्या खोलीत हलवली होती." (पृ. १३४)

भरतला भेटायला जेव्हा करुणा त्याच्याकडे जाते तेव्हा भरतचे जाणवलेले घर म्हणजे, "खाली पदव्यांची ओळ आणि कंस गेट उघडून ती आत शिरली. लहान बाग होती आणि पायवाटेवरचे फरशांचे त्रिकोणी, चौकोनी तुकडे जमिनीत बसवले होते. घर दुमजली होतं. वरच्या गॅलरीत दिवा चालू होता. पण खाली अंधार होता." (पृ.१३६) भरत ज्या शाळेत शिकवायला होता. तिथे करुणा भेटायला गेली तेव्हा, "मधल्या सुट्टीमुळे मुलं जिकडे तिकडे विखुरलेली होती. पलीकडच्या मैदानावर अनेक मुले खेळत होती. कितीतरी घोळक्यानं इकडंतिकडं हिंडत उभी, बसलेली होती." (पृ.१४२)

प्रशांतला मुंबईत घर हवे होते. पण ते त्याला मिळत नव्हते. "मुंबई शहर, शहरच राहिलेलं नाही. रोज ऑफिसमधून माझ्या एकटया पॅडकडे दमून परत येताना संध्याकाळी वाटतं, 'काय हे वैराण आयुष्य! तिथं दिवसभर सुंदर सुंदर ड्रॉइंग्ज करायची, आणि स्वत:ला रहायला साध्या दोन खोल्या नाहीत! ... परतलो की साध्या चहासाठी पुन्हा चार

मजले उतरुन खाली. साधा स्टोव्ह पेटवायला बंदी आहे खोलीत. आधी होतं की मारे चहा-ब्रेकफास्टसह पेइंग गेस्ट. आता ते सगळं गेलं. चहासुद्धा नाही. पाणी प्यायचं ते बेसिनच्या नळातून." (पृ. १४५)

करुणाची मैत्रीण जया ही वारली होती. पण तिच्या मृत्यूला आपणच जबाबदार आहोत असे करुणाला वाटत होते. जयाला जाऊन एक वर्ष झाले होते. अम्माने तिचा फोटो पेपरमध्ये दिला होता. करुणा पेपरमध्ये जयाचा फोटो बघते. ती अम्माला भेटायला जाते तेव्हा "खोलीत जयाचा मोठा फोटो फ्रेम करुन टांगलेला होता. त्यावर ताज्या फुलांचा हार होता. खाली उदबत्ती लावलेली होती, ती आता विझायला आलेली होती. खिडकीला, जन्या साडीचा पडदा होता. समोरच्या टेबलावर पुस्तकं व्यवस्थित रचलेली होती. कॉटवर एकही सुरकुती नसलेली चादर होती. कुठेही धुळीच्या खुणा नव्हत्या." (पृ. १४८)

अशी ही मुंबईतील घरे. यातून जाणवते की माणूस कितीही मोठा असो पण ज्याचे मुंबईमध्ये स्वत:चे घर नाही त्याची अवस्था कशी असेल याचे दर्शनही घडते.

**९ ) मुंबई नगरीचे चित्रण :-**

माणसे 'जिवाची मुंबई' करण्यासाठी मुंबईकडे धाव घेतात. मुंबई ही एक अजब नगरी आहे. लेखिकेच्या चारही कथेमध्ये मुंबई शहराचे वर्णन आलेले आहे. कधी त्यांचा स्पष्ट उल्लेख आहे तर कधी अस्पष्ट. पण तरीही कथेवर त्यांच्या प्रभाव जाणवतो. 'पुन्हा एकदा जन्म' मधील मीरा सगळ सोडून हरिहरबरोबर येते. त्याअगोदर ती मेडिकलसाठी मुंबईला आलेलीच असते. त्यानंतर त्या दोघांची भेट होते. तिला हव असत, तर ती मोठा दवाखाना उघडून, एखाद्या मोठया अलिशान घरात राहिली असती. पण तिच्या दवाखान्यात गोर-गरीबांची खूप गर्दी होती. त्यामुळे ती सर्वसामान्य कुटूंबाप्रमाणे दोन खोल्याच्या घरात रहात होती.

'त्यानंतर ...' कथेविषयी स्वत: सानियाच सांगतात की, "कथा मुंबईत घडते आणि तिला नाशिकचे संदर्भ आहेत. स्थळांचे संदर्भ माझ्या आयुष्यातले आहेत."[६] राधिकाचा नवरा ललित तिला सोडून गेल्यामुळे पैशासाठी तिला नोकरीची आवश्यकता वाटू लागली. म्हणून ती नोकरी करायची ठरवते,"नऊदहाच्या वेळेला ऑफिसला जाणाऱ्यांची तुफान गर्दी गाडीला असते हे मला माहीत होतं. सांताक्रुझ ते दादर तरी

उभ्यानंच प्रवास केला. गाडीला पुष्कळच गर्दी होती. मी ट्रेननं कधी कुठं गेले नव्हते. (तशी वेळच कधी येणार होती?) दादरला वेस्टर्नहून सेंट्रलला कस जायच तेही माहीत नव्हते.'' (पृ. ६५) ''.... सांताक्रुझ हून थेट चिंचपोकळीच तिकीट काढता येत हेही मला माहीत नव्हतं. मी दादरला निराळं, सेंट्रलला निराळं तिकीट काढलं.'' (पृ. ६६)

''मग मी रोज उठून सकाळी अगदी ऑफिसच्या गर्दीच्या वेळी चर्चगेट-व्ही.टी. चं परतीचं तिकीट गाडीनं काढून जाऊ लागले .... इरॉसवरुन सचिवालयाकडे किंवा क्रॉस मैदानाकडून काळया घोडयावरुन पुढे बॅलार्ड पिअरकडे किंवा मरीन लाइन्सच्या दिशेनं किंवा रिगलवरुन कुलाबा ... मार्ग खूप होते. अनेक रस्ते आणि ठिकाणं. (पृ. ७१) थिएटर्स, दुकानं, फुटपाथ, बसस्टॉप, गर्दी, युनिव्हर्सिटी, ऑफिसेस, बसचे असंख्य रुट्स नंबर, हॉटेल्स, आर्ट गॅलरीज, रेकॉर्डची दुकानं, घरं मोठ्या मोठ्या इमारती, वाहनं आणि लोक .... प्रत्येकाला काहीतरी उद्दिष्ट होत... तरुण मुलं किंवा वृद्ध, एकटया बायका, अशिक्षित, निराश किंवा फसलेले ... पण एकमेकांना काही माहीत नव्हतं. आणि स्वत:ला तेवढ वाटत होतं की आपणच असे ...आपणच असे ...'' (पृ. ७२)

'दारं उघडावीत...' मधील प्रशांत आर्किटेक्ट आहे. दिवसभर ऑफिसमध्ये सुंदर सुंदर ड्रॉइंग्ज काढून देखील त्याला रहायला साध्या दोन खोल्या मिळत नव्हत्या. भरत म्हणतो, ''पण घरांची गरज फार मोठी आहे मुंबईत. मी मुंबई पाहूनही बराच काळ झाला. पण हृदय गदगदून यावं अशी ती नगरी आहे. पावलोपावली ठेचाळायला होतं. मुलं रस्त्याकडेला पीक यावं तशी बजबजलेली असतातं.'' (पृ.१५८)

'दिशा घराच्या' कथेमध्ये अरुंधती देखील मुंबईचीच राहणारी होती. अंजनला आपलं पूर्वीचे घर आठवते, ''पूर्वी त्यांच घर नेपियन सी रोडच्या टोकाला होतं.. तेव्हा घरातून समुद्ररेषा दिसायची. खूप शांततेत आवाजदेखील ऐकू यायचा. मग शेट्टीचं मन वळवून त्यानं शारदाला माहीमचा लहान प्लॅट घ्यायला लावला आणि तो मित्राबरोबर दुसरं घर शेअर करुन घेत चर्चगेटच्याच बाजूला राहायला आला. तेव्हा ती सगळी मजा गेली.''(पृ.१९३)

अशा प्रकारे सानियांनी 'दिशा घराच्या' या कथासंग्रहातून व्यक्तिचित्रण, घरांची चित्रणे, निसर्ग चित्रणे, मुंबई नगरीचे चित्रण करुन कथेला अधिक उठावदारपणा देण्याचा

प्रयत्न केला आहे. या कथासंग्रहात शहरी भागात वावरणाऱ्या लोकांचे, विशेषत: तरुण वर्गातील हरिहर, करुणा, मीरा, वृंदावन यांचे चित्रण फारच समरसतेने रंगवलेले आहे. त्यांच्या मनात दु:ख आहे. पण तरीही ते त्यातून मार्ग काढताना दिसतात. कथानकाची मांडणी, आशय संपन्नता, इंग्रजी भाषेचा वापर आणि पात्रामधील संवाद, विशेषत: स्वत:शीच नायिकांनी साधलेला संवाद, आधुनिक राहणीमान, घरातील आधुनिक वस्तू यामुळे शहरी संस्कृतीचे आपल्याला दर्शन घडते.

**१० ) 'दिशा घराच्या' कथासंग्रहातील संवाद / स्वगते :-**

सानिया यांच्या भाषेतील सहज, सुंदर संवाद वाचताना त्यांतून निवेदनाचा प्रत्यय येतो. पण ते संवाद स्वत:शीच, कधी दुसऱ्याशी असल्याने फारच महत्वाचे ठरले. 'दिशा घराच्या' या दीर्घ कथासंग्रहात स्त्रियांना भेडसावणाऱ्या वेगवेगळया समस्यावर दीर्घ चारही कथा अवलंबून आहेत. स्वत:शी चालणारा संभाषणात्मक संवाद हे फार महत्वाचे आहेत.एखाद्या चित्रकाराने चित्र काढण्यासाठी कुंचला एके ठिकाणी ठेवून तो चित्र पूर्ण झाल्यावरच उचलावा असे आल्याला सानियांची कथा वाचताना वाटते.

'त्यानंतर...' कथेविषयी सानिया म्हणतात, "कथा आत्मनिवेदन पद्धतीने लिहायची हे ही आपोआप आलं. अनेक वेळा काही विशिष्ट तऱ्हेनंच लिहलेली कथा विकसित होत जाते. 'त्यानंतर...' ही दुसऱ्या कुठल्या तऱ्हेनं मला लिहिता आली नसती. हा कथेचा घाट आपोआप आला आणि तो संभाषणात्मक असल्याने तिचे स्वत:शीच चाललेले संवाद फारच महत्वाचे ठरले. राधिका स्वत: निवेदन करत जाते, स्वत:शीच बोलते, प्रश्न विचारते आणि वारंवार ठेचाळते. स्वत:शीच असा घाट लिहू लागल्यावर विचारलेले प्रश्न कंसात येत गेलं."[३] राधिका प्रत्येक घटना आपल्या मनात मांडत असते. ललित निघून गेल्यावर तिला पैशांची आवश्यकता वाटत असते. म्हणून ती नोकरी करायची ठरवते पण मनाशी म्हणते,"मी नोकरी खरच करणार आहे का? मला स्वत:लाच ती शक्यता वाटली नाही. कारण आता वय उलटून गेलेलं (नोकरीचं) बाकी काही खास अनुभव, शिक्षण, पात्रताच नाही मला निराश वाटलं. मग मी करणार काय होते? ललितने बँकेत पैसा ठेवला होता आणि थोडी गुंतवणूक होती. पण त्यावर आयुष्य जाणार आहे का? ललितने या गोष्टीचा विचार केला का? पण त्यानं अशा कुठल्या गोष्टीचा विचार केला की यावरच

मी बोट ठेवावं? अमोलचं शिक्षण, त्याला वडिलांची गरज, माझं एकटं पडणं, सगळयांना तोंड देणं, माझ्या गरजा...मला कडवट वाटलं. कदाचित हे अजूनही चालू असलेलं, विचित्र, प्रदीर्घ स्वप्न असू शकेल मी मनाशी म्हटलं.'' (पृ.५६)

'पुन्हा एकदा जन्म' कथेमध्ये पुढील संवाद महत्वाचा आहे. मीराने हरिहरसाठी खूप कष्ट घेतलेले असतात. पण हरिहरला तिच्याबरोबर संसार करायचा नसतो. ते पुढील संवादावरुन कळते.

ती म्हणाली 'इथे किंवा तिथे क्लिनिक नाही!'

'नाही म्हणजे?'

'म्हणजे तुला यायला हवंच असं नाही.'

'का? तू जाणार आणि ... ?'

'तू इथेच रहा. मालुताईंनी तुला आमंत्रण दिलेलंच आहे. तुला घर आहे. तुझं काम आहे. माणसं आहेत. मिळतील.'

'हरिहर...'

'तरच आईबाप्पा तयार आहेत.'

'पण आपल लग्न झालेलं आहे.'

'कसं? रजिस्ट्रारच्या ऑफिसमध्ये. फक्त तू, मी, तुझा भाऊ. ती डॉक्टरीण... आपण एकमेकांच्या संमतीनं वेगळे होऊ शकतो, घाई नाही.'

मीराला तोल गेल्याप्रमाणे वाटलं. ती म्हणाली, 'का पण?'

हरिहरनं उत्तर दिलं नाही.

पण तिला ते माहीत होतं. ती म्हणाली, 'अजून संधी यायच्या आहेत.'

'पुष्कळ झाल्या. मला तुझ्या प्रयोगात राहायचं नाही आता.' (पृ. २९)

अशा प्रकारच्या संवादामुळे कथा अधिक रोचक बनलेली आहे. पुढे काय घडेल याची उत्सुकता अशा संवादामुळेच ताणली जाते. यातच लेखिकेचे कौशल्य आहे. भरतची नोकरी सुटलेली होती तरीही त्याला काळजी नव्हती. तेव्हा करूणा त्याला म्हणते,

'काय करणार आहेस?'

'काही नाही तूर्त तरी.'

'बाकी चिंता नाही.'

'पोटापाण्याची? आहेत थोडेसे पैसे गाठीला. असेच पूर्वीचे. काहीतरी सोय होते. नाही झाली तर तीही सवय करायची.'

'आणि मग?'

'तो विचारच नाही. तू भेटलीस असा विश्वास बाळगून आलो. भेटलीस की नाही?' (पृ. १५१)

**११ ) ''दिशा घराच्या'' कथासंग्रहातील प्रतिमांचा वापर :-**

'दिशा घराच्या' या कथासंग्रहात सानियांनी काही ठिकाणी प्रतिमांचा वापर केलेला दिसून येतो. त्यामुळे पात्रे जिवंत वाटतात. ''पण त्या जुळेपणाची जाण कधीही पुसली गेली नाही. झिरपणाऱ्या प्रवाहासारखी आर्द्र, कायम राहिली.'' (पृ. ७, पुन्हा एकदा जन्म) ''मग त्याचा आवाज फाटल्यासारखा झाला.''(पृ.७), ''वृंदावन इतका अवघडल्यासारखा झाला की आपली नजर लपवून बसून राहिला.'' (पृ. ९), ''सगळया खोटया, जड कल्पना पापुद्र्यासाख्या गळून पडल्या असं वाटलं.'' (पृ. २०), ''मीरा अवघडून गप्प राहिली जणू सण आला होता अचानक.''(पृ.२३), ''लग्नानंतर ती एकदाच फक्त हरिहरबरोबर तिकडे गेली तेव्हा नवी शोभेची काचवस्तू हाताळावी किंवा हाताळू नयेच.'' (पृ.२९), ''तुला सरळ, साधं आयुष्य नकोच आहे. जे नाही ते हट्टान हवं आहे. मला आपल निवडलंस, प्रयोगात उंदीर उचलतात तसं.'' (पृ.३०), ''आपल्या सुरक्षिततेच्या भावना किती तकलादू असतात! केवळ एखादी रेषा पुसट आणि हलकी.'' (पृ.४५), ''आता सरू एक न संपणारी साखळीच. प्रश्नांना उत्तरं नाहीत आणि स्पष्टीकरणं नाहीत.'' (पृ.४७), ''तिच्या स्वस्त, डेकोरेशनसारख्या दिसणाऱ्या आनंदाची मला फार मौज वाटली.'' (पृ.५१), ''एखाद्या भडक चित्रासारखा अविश्वास तो चेहेऱ्यावर रंगवत होती.'' (पृ.५२), ''शालिनी काही सांगण्यापलीकडेच गेली होती. हातात सगळे दोर खेचणाऱ्या सारथ्याची आठवण आली.''(पृ.५३), ''त्याचा चेहरा कुणीतरी मातीचा गोळा जमिनीवर आपटावा तसा विदीर्ण झाला.''(पृ.६२), ''एकदम सगळं आजुबाजूचं बेगडी जग, दुसऱ्या बाजूला रेषेपलीकडे शत्रूप्रमाणे दबा धरुन हल्ला चढवण्याच्या प्रतीक्षेत बसलेलं होतं.''(पृ.६३), ''सगळ जग विहिरीच्या तोंडासारखं लहान झालं.'' (पृ.६४), ''तरीही

ललितने मला एक बंदिस्त सुरेख सुरक्षिततेत ठेवलेल होतं, थंडीच्या दिवसात रग गुरफटून बसावं तसं." (पृ.६६), "दळवी येताच आपापसातलं बोलणं त्यांनी रेडिओ बंद करवा तसं थांबवल."(पृ.६७), "निर्विकार चेहेऱ्याचं ते रुटिन जग. मी आपणहून पाऊल पुढे टाकलं असतं तर त्यानं मला त्यात सामावून घेतलं असतं. पारंपारिक दाखवून पाहून केलेल्या लग्नासारखं." (पृ.६८), "सगळयांच्या चेहेऱ्यावर मला ते अगदी स्पष्ट पुस्तकात लिहिल्याप्रमाणे वाचता आलं."(पृ.६८), "एकमेकांना आवडणारी, पटणारी माणसं गवताच्या पात्यासारखी कशीही एकत्र बांधून, गठ्ठे गठ्ठे करुन, पृथ्वीवर, या जगाात आपली फेकून द्यायची. त्यांचं ते वाटेल ते होवो. सगळा लडबडणारा चिखल. ढीगच्या ढीग." (पृ.७०), "आमच्या दोन बेडरुम्सचा चांगल्या वस्तीतला मुंबईच्या भाषेतला 'सुरेख फ्लॅट' मला एकदम प्रशस्त आणि पुस्तकी दिसू लागला." (पृ.७४), "वेळ भराभरा सुसाटणाऱ्या वाऱ्यासारखा झपाटयानं निघून जात होता." (पृ.७७), "तो चेहेरा लांब करुन वावरला."(पृ.८०), "एखाद्या पडद्यात रहावं तशी मी सुखी, समाधानी होते." (पृ. ८१), "पुन्हा सगळं एका नव्या, तरीही ओळखीच्या घरासारखं झालं."(पृ.८६), "पण नंतरचे क्षण फसवे, कागदी झाले" (पृ. ९१), "माझा दिवसभराचा कंटाळा, एकटेपणा डोक्यात भरुन मी उशिरा रात्री त्याच्या पुढ्यात एखाद्या रिच्युअलच्या साधनासारखी बसलेली असायची."(पृ.९२), "आता लढाई संपून सगळं मोकळं व्हावं तसं दिसतं आहे." (पृ.९४), "सगळे चांगले, तरुण दिवस फसवून सोडून गेले होते. आता एक वयस्कर आयुष्य आणि निराशा. आशेचे किरण हळूहळू संपत गेलेले." (पृ.९४), "उलट सगळा प्रवास, सगळया वाटा पुरेपूर माहीत असल्यामुळेच मी दु:ख अगोदर विकत घेतली होती." (पृ.९५), "आता मी अनुभवत असलेला अप्रगल्भ, खऱ्या, नव्या वेदना. प्रेमाच्या निरनिराळया रंगाप्रमाणे उलगडून आलेल्या." (पृ.९६), "तिच्या माझ्यातलं न सांधता येणार अंतर मला चिडवत मधोमध उभं राहिलं." (पृ.९७), "... मी खूप दिवस त्या संतापाला बाहेरच्या बाहेर ठेवलं होत, पण आता तो पुरासारखा धावत आला." (पृ.१००), "पण संताप बिअरची बाटली ओतल्यावर फसफसून ती बाहेर यावी तसा ओसांडून चालला होता. एखाद्या शॉवरसारखं मी त्यात नहात होते." (पृ.१००), "तो सहज दुकानात खरेदी वगैरे करावीशी वाटते या थाटात म्हणाला, तुझा नवरा परत येईपर्यंत

....'' (पृ.१०१), ''माझ्या सगळया वेदना त्याने विकत घेतल्या होत्या.'' (पृ.१०१), ''त्या वेदना आतवर प्रचंड होत्या. पहाटेच्या काळोखात एकटीनं मुद्दाम आकारलेल्या.'' (पृ.११०), ''एखाद्या पुस्तकात जपून बंद करुन ठेवलेल्या जाळीदार पानासारखं. बाहेरची हवा लागली तर त्याची शकलं होतील.'' (पृ.१११), ''चित्राच्या तुटलेल्या चौकटीसारखं मला वाटलं.'' (पृ.११२), ''सभोवार अनोळखी लोकांचा समुद्रच उसळलेला.'' (पृ.११५), ''लहान मुलासारख ललितनं हात उचलून त्याचा भिजलेला शर्ट दाखवला.'' (पृ.११७), ''पण चेहेरा वर उचलल्यासारखा चकचकीत दिसत होता.'' (पृ.११९), ''लहान लहान घोटांसारखे स्वत:त जिरत गेलेले अर्थ.'' (पृ.१२१), ''त्या राखेकडे पाहून वाटलं मात्र, की तो फिनिक्स पक्षी म्हणतात ते खरं म्हणजे केवळ 'आशा' या गोष्टीचं नाव असावं.'' (पृ. १२३), ''मुलगी तिच्यामागे हातात टॉवेल घेऊन नमस्कार केल्यासारखी उभी होती.'' (पृ.१३५), ''पण तो स्वत: घुटके घेत अमृत प्यायल्यासारखा तृप्त झाला.'' (पृ.१३८), ''पुन्हा ट्रक धडपडत जावा तसं वाटलं. बाकीची शांतता एकमेकात वाटून घेतल्यासारखी ती दोघंही शांतपणे बसून राहिली.'' (पृ.१३९), ''पण कुठेतरी अशी घट्ट कळ बसलेली असते. ती सोडली की सगळं हृदयच फाटून वहायला लागेल असं वाटतं.'' (पृ. १५१), ''पण त्याची नजर रिकामी होऊन पलीकडे विस्तारल्यासारखी दिसत होती.'' (पृ.१५३), ''मुलं रस्त्याकडेला पीक यावं तस बजबजलेली असतात.'' (पृ.१५८), ''आरशासमोर उभं राहून तिने केसातल्या क्लिप्स काढल्या. ते खांद्यावर पावसासारखे कोसळले.'' (पृ.१६२), ''बाकी सगळे नवीन अपरिचित चेहरे फेर धरल्यासारखे ओथंबून आले.'' (पृ.१६३), ''या राजवाडयात युगानुयुगं झोपून राहिलेली एखादी राजकन्या... तुझ्यासारखी. कल्पना वाईट नाही.'' (पृ.१६३), ''वापरलेला सुगंध लोटासारखा बंद कपाटातून बाहेर उठला.'' (पृ.१६४), ''करुणाच्या डोळयांत आतून आग धगधगल्यासारखी झाली.'' (पृ.१६८), ''त्याचा चेहरा थकल्यासारखा दिसत होता.''(पृ.१७९), ''-आणि जुन्या आजारी, जगातील शारदा एकदम तिच्या पुढयात येऊन उभी राहिल्यासारखी झाली.'' (पृ.१८०), ''अरुंधतीच्या तोंडात कडवट चव पसरुन आल्यासारखं वाटलं.'' (पृ.१८८), ''फुलांच्या ताटव्यात बसल्यासारखं विनीचं आजचं रुप आवडलं.'' (पृ.१९९), ''अंजनच हृदय भरुन

वाहिल्यासारखं झालं.''(पृ. २००), ''लाटेवर फेकले गेल्यासारखे तिनं पुढं होऊन पद्मनाभच्या कमरेभोवती हात टाकले आणि घट्ट बिलगली.'' (पृ.२०४), ''की आपण ज्या लाटेवर आरुढ झाल्यासारखं वाटतं आहे. ती लाट सगळे किनारे सोडून धावते आहे. उंच कुठेतरी?''(पृ.२०५),''अंजन एकदम चटका लागल्यासारखा शुद्धीवर आला.''(पृ.२०७), ''जुन्या जखमेसारखी वेदना त्यांच्या मनात पसरत गेली.'' (पृ.२०८), ''एखाद्या समुद्रात थेंब हरवून जावा तशी सगळी संधीच तृप्त होऊन जावी.'' (पृ.२०८), ''एखादी उंच लाट क्षणभर खाली आपटून फुटावी तशी झाली.''(पृ.२०९), ''त्याला शेजारी बसलेली सुचित्राही लांब,लहान, एखाद्या अचल पुतळयासारखी दिसू लागली.'' (पृ.२१५),

अशा प्रकारे सानियांच्या 'दिशा घराच्या' या कथासंग्रहात बऱ्याच प्रतिमा आल्या आहेत. त्यामुळे कथेला अधिक जिवंतपणा आलेला जाणवतो. या प्रतिमा कधी नायिकेच्या भोवतालच्या परिस्थितीचे, मनस्थितीचे, एखाद्या वस्तूचे, निसर्गाचे चित्रण देखील करतात.

**१२ ) ''दिशा घराच्या'' कथासंग्रहातील अभ्यस्त शब्द :-**

'दिशा घराच्या' हा कथासंग्रह एकूण २१५ पृष्ठांचा असून त्यात फक्त चारच कथा आहेत. अनेक वाक्प्रचार,अभ्यस्त शब्द, हिंदी, इंग्रजी शब्दांचा, वापर, छोटी छोटी वाक्ये यांचा वापर केल्यामूळे कथा अधिक उठावदार बनलेल्या आहेत.

अशा या कथासंग्रहातील अभ्यस्त शब्द पुढीलप्रमाणे आहेत:-

इकडेतिकडे (पृ.५), आवडीनिवडी (पृ. ७), बाडबिस्तारा (पृ.१६), इमानेइतबारे (पृ.१८), तडकाफडकी (पृ.१९), वेडबीड (पृ.३३),नोकरीधंदा (पृ.३४), आजूबाजू (पृ.३५), जाडजूड, अमूकतमूक, छोटयामोठया (पृ.३६), बारीकसारीक (पृ.३९), गमतीजमती (पृ.४५), सांगुनसवरुन, (पृ.४९), जायलायायला (पृ.५१), ठावठिकाणा (पृ.५४), आकांडतांडव, आरडाओरडा (पृ.५४), लहानसहान (पृ.५५), सरळसाधे, तिरपागडे (पृ.५७), थोडेफार (पृ.६०), तडकाफडकी (पृ.६४), अमुकतमूक (पृ.७०), शिव्याशाप (पृ.७५), हालहवाल (पृ.७३), धावाधाव (पृ.७३), शेजारापाजारी (पृ.७५), एकाएकी,अवतीभोवती(पृ.७७), चालत्याबोलत्या (पृ.७९), सणवार (पृ.८१), वेडेवाकडे (पृ.८२), इथेतिथे (पृ.८२), जिकडेतिकडे (पृ.८२), हुबेहूब (पृ.८३), खाऊनपिऊन (पृ.८५), सहजसाधे (पृ.८७), अधुनमधून (पृ.९२), चढउतार (पृ.९६), चारचौघी

(पृ.९७), उडवाउडवी (पृ.९८), बरंवाईट,लहानमोठे (पृ.९८), सहजासहजी (पृ.९९), नासधूस (पृ.१००),पथ्यपाणी, कपबशी(पृ.१०२),उंचखोल(पृ.१०३), हिंडायलाफिरायला, उलटसुलट (पृ.१०४), कशीबशी (पृ.१०६), पावलोपावली (पृ.१०७), लाचलुचपत (पृ.१०८), हातपाय, देवाणघेवाण (पृ.१०९), वादावादी (पृ.११२), मारामारी (पृ.११३), दातओठ (पृ.११३), ठिकठिकाणी (पृ.११४), उलटपालटं, आवराआवर (पृ. ११७), देणीघेणी (पृ.११८), सहजासहजी (पृ.११९), हालहवाल, जेमतेम, इच्छाअनिच्छा (पृ.१२०), थोडीथोडकी (पृ.१२२), लहानमोठे (पृ.१२४), खराखुरा (पृ.१२६), कुजबुजू (पृ.१२७), हास्यविनोद (पृ.१२५), आडवीउभी (पृ.१३३), मधोमध (पृ.१३३), ताट-वाटया, वेडीवाकडी, इथंतिथ (पृ.१३६), धक्काबुक्की (पृ.१४३), घाईगर्दी (पृ.१४८), पत्रंबित्रं (पृ.१५३), नोकरचाकर (पृ.१६०), आगेमागे (पृ.१६०), देवाणघेवाण (पृ.१६३), वेडबीड(पृ.१७१), जाणुनबुजून (पृ.१७१), हसणेखिदळनं (पृ.१७४), मातीबिती (पृ.१७५), खरखोटं (पृ.१७९), जाणुनबुजून (पृ.१७९), खऱ्याखुऱ्या (पृ.१८०), इकडेतिकडे (पृ.१८१), दीडदमडी (पृ.१८५), अंगाखांद्यावर (पृ.१८६), वादविवाद (पृ.१८८), आगेमागे (पृ.१८९), एखाददुसरा (पृ.१९४), रुसण्यारागवण्याइतके (पृ.१९५), पुढेमागे (पृ.१९७), एकाएकी (पृ.१९८), अधुनमधून, शेजारीपाजारी (पृ.२००), बोलुनचालून (पृ.२०२), फिटंफाट (पृ.२०४), घासूनपुसून (पृ.२०५), कशीबशी (पृ.२०५), सहजसाध्य (पृ. २१२), खरीखुरी (पृ.२१०).

अशा प्रकारे विविधतेने नटलेला सानियांचा हा कथासंग्रह आहे. विविधप्रकारचे वाक्प्रचार, प्रसंगी म्हणींचा वापर, जोडशब्द, इंग्रजी शब्द, हिंदी शब्द, यामुळे या कथा संग्रहाला एक वेगळाच दर्जा प्राप्त झालेला आहे. असे छोटे-छोटे अभ्यस्त शब्द वापरल्यामुळे कथा हलकी फुलकी व वाचायला सोपी वाटते.

**१२ ) ''दिशा घराच्या'' कथासंग्रहातील वाक्प्रचार :-**

**१ ) 'पुन्हा एकदा जन्म' :-**

खांदे उडवणे (पृ.८), गळयात गळा घालणे (पृ.९), व्यत्यय येणे (पृ.१०), घरोबा करणे(पृ.१४), ताळयावर येणे (पृ.१५), कीव येणे (पृ.१५), चलबिचल होणे (पृ.१८), समेट घडवणे (पृ.१८), फाटे फोडणे (पृ.१९), गळयात बांधणे (पृ.२०),

फारकत घेणे (पृ.२२), दुखणी विकत घेणे (पृ.२४), बुचकाळयात पडणे (पृ. २६), अवाक होणे (पृ.२६), चपराक देणे (पृ.२७), घर बाटवणे (पृ.२८), उमेद सोडणे, तरुन नेणे (पृ.३०), मधल्यामध्ये भाजून काढणे (पृ.३१), काथ्याकुट करणे,हुरहूर वाटणे (पृ.३२), दम सुटणे, निभावून नेणे, उत्तेजित होणे, विकोपाला जाणे (पृ.३५), दुवा देणे (पृ.३६), पाय खिळणे (पृ.३७), संग करणे (पृ.३७), ममत्व वाटणे (पृ.३९), हेवा करणे (पृ.४०), आवाज जड होणे (पृ.४१).

२ ) त्यानंतर ...

हताश होणे, नवल वाटणे (पृ.४३), भान हरपणे, झोप उडणे (पृ.४४),गुदमरुन जाणे (पृ.४६), काकुळतीला येणे(पृ.४७), कटाक्ष टाकणे (पृ.४८), लाथ मारणे, कपाळाला हात लावणे (पृ.४९), ताबा असणे (पृ.५०), 'आ' वासणे, डोळे विस्फारणे (पृ. ५२), हात टेकणे (पृ.५४), बोट ठेवणे (पृ.५६), थक्क होणे (पृ.५६), षटकर्णी होणे (पृ.५७), खापर फोडणे (पृ.५८), उरावर बसणे (पृ.५९), तावातावाने बोलणे (पृ.६०), पड खाणे, स्तिमित होणे (पृ.६१), अपेक्षाभंग करणे (पृ. ६३), उबग येणे (पृ.६३), हतबुद्ध होणे (पृ.६४), डगमगून जाणे, गहिवरून येणे (पृ.६५), खस्ता खाणे (पृ.६८), थरकाप उडणे (पृ.७५), घराला कळा येणे (पृ.७६), खल करणे (पृ.७९), हवालदिल होणे, हातावर तुरी देणे (पृ. ८०), हाव धरणे (पृ.८१), जीव टाकणे, प्राणहून प्रिय असणे (पृ.८२), जीव तुटणे (पृ.८३), बळी पडणे (पृ.८४), आटोकाट प्रयत्न करणे, तोंड देणे (पृ.८८), सूड घेणे (पृ.९०), अचंबा वाटणे, स्वत:ची पोळी पिकवणे, कोंदणात बसवणे (पृ.९३), काळाचा महिमा असणे (पृ.९४), निक्षून सांगणे, माणूस जोखणे (पृ.९६), पाठ फिरवणे (पृ.९७), कीव येणे (पृ.९८), बिथरुन जाणे, आडवळणाने बोलणे (पृ.१००), चाल करुन येणे (पृ.१०१), खांदे उडवणे (पृ.१०२), ताडून बघणे (पृ.१०४), घर खायला उठणे, खिळून जाणे (पृ.१०५), सौजन्य दाखवणे , अहंमहमिका असणे (पृ.१०७), पाय ओढणे, मुभा असणे (पृ.१०८), शिरशिरी येणे (पृ.१०९), ओढ वाटणे (पृ.११०), खल घालणे (पृ.१११), ढाल पुढे करणे, हदरुन जाणे, नजरेआड करणे, खिसा गरम असणे (पृ.११३), फटकारुन लावणे, दहशत वाटणे (पृ.११५), हात झटकणे (पृ.११६), तोंड देणे (पृ.११७), हात चोळणे (पृ.११८),

कटाक्ष टाकणे (पृ.११८), तडा जाणे (पृ.१२०), तरुन जाणे (पृ.१२१), आशा कोळपणे (पृ.१२१), आपटी खाणे (पृ.१२२), उत्कट होणे (पृ.१२३), नादी लागणे (पृ.१२४).

**३ ) 'दारं उघडावीत ....'**

धापा टाकणे, गोत्यात येणे (पृ.१२६), मुठ उंचावणे, बंडल मारणे, शेपूट पायात घालणे, (पृ.१२९), रमून जाणे, गृहीत धरणे (पृ.१३१), भडीमार करणे (पृ.१३२), नाव दुमदुमणे, मजल मारणे (पृ.१३३), तोंडावर फेकणे (पृ.१३४), गुणगुण करणे, चाहूल नसणे(पृ.१३७), गल्लत करणे (पृ.१३९),हात धुऊन मागे लागणे (पृ.१४०), दाद देणे, नाव मिळवणे (पृ.१४०), बोट नाचवणे (पृ.१४१), रस वाटणे (पृ.१४४), पथारी मांडणे, पैज लावणे (पृ.१५०), फोलपणा लक्षात येणे, गाठीला असणे(पृ.१५१), जल्लोष करणे, कडकी असणे (पृ.१५२), तसदी घेणे, डोक खुपसणे, पाठ करणे (पृ.१५३), जीव घाबरा होणे (पृ.१५५), कपाळ बडवणे, आकांत करणे (पृ.१५६), सहमत होणे (पृ.१५७), चकवून जाणे, स्वत:ला गहाण ठेवणे (पृ.१५८), लोभ असणे, प्रलय येणे (पृ.१५९), व्यग्र असणे, काखोटीला मारणे (पृ.१६०), आवेशाने पहाणे (पृ.१६१), फितवून घेणे (पृ.१६३), टेंभा मिरवणे (पृ.१६४), त्रागा करणे (पृ.१६७).

**४ ) 'दिशा घराच्या :-'**

नाक उडवणे (पृ.१७७), जीवात जीव नसणे (पृ.१७८), हातखंडा असणे (पृ.१७८), उडवून लावणे, आवेश उतरणे (पृ.१७९),खटाटोप करणे (पृ.१८०), डोक्यात राख घालणे (पृ.१८१), गरम होणे (पृ.१८३), तालावर नाचणे, ढसाढसा रडणे(पृ.१८७), गहजब घालणे (पृ.१८८), बाजू घेणे, हात देणे, डावलणे (पृ.१८९), कब्जा घेणे , हातभार लावणे (पृ.१९०), गळून गेल्यासाखे वाटणे (पृ.१९१), उमाळून येणे, एकच सूर धरणे (पृ.१९५), जीव खाली वर होणे (पृ.१९६), स्तंभित होणे (पृ.१९७), पारा चढणे (पृ.१९८), थयथयाट करणे (पृ.२००), हिरमोड करणे (पृ.२०१), 'आ' वासणे, जीव असणे (पृ.२०२), तडीस नेणे, अवाक होणे (पृ.२०३), पाढा वाचणे(पृ.२०४), बेत आखणे, विचका होणे, आकस असणे, कीव येणे (पृ.२०५), चाल करणे, मुठी आवळणे (पृ. २०८), खनपटीला बसणे (पृ.२०९), खांदे उडवणे

(पृ.२१०), जीव असणे, चकीत होणे (पृ.२१२) इ. वाक्प्रचार या कथासंग्रहात आलेले दिसून येतात.

**१३ ) ''दिशा घराच्या'' कथासंग्रहातील इंग्रजी शब्दांचा वापर :-**

सानियांना असे वाटते की "आपण कुठलीही भाषा बोलत असू ती शुद्ध असली पाहिजे यावर आपणच कटाक्ष ठेवला पाहिजे. अर्थात शुद्ध म्हणजे कृत्रिम नाही. कित्येक जण शुद्ध बोलण्याच्या अट्टाहासापायी कृत्रिम बोलतात. तसंही नसावं. मराठी ही आपली मातृभाषा आहे पण इंग्लिश व्यवहारभाषा आहे. त्यामुळे दोन्हीवर उत्तम प्रभुत्व असणं आवश्यकच."[८]

त्यांच्या कथेत इंग्रजी भाषेचा वापर जास्तीत जास्त दिसून येतो.त्यांच्या कथेतील नायिका उच्चशिक्षित आहेत. त्यामुळे ते सहाजिकच आहे. इंग्रजी शब्दांनी भरलेल्या परिपूर्ण अशा या दीर्घकथा आहेत.

**१ ) 'पुन्हा एकदा जन्म':-**

क्लिनिक, बिल्डींग, गेट,(पृ.५), ट्रान्झिस्टर, शेल्फस,लोकल, लॉ (पृ.६), हॉटेल, कुकर (पृ.७), डायनिंग टेबल, बॅटरी, हॉस्पिटल(पृ.८), टेबललॅम्प, मिडटर्म, टेस्ट (पृ.१०), ऑफिस, स्कूटर,पार्क, बसस्टॉप (पृ.१२), कन्सल्टिंग प्रॅक्टीस (पृ.१४), फ्लॅट, बाथरुम, ऑपरेशन (पृ.१७), होस्टेल, मेडिकल कॉलेज, डॉक्टर, ग्रॅज्युएट (पृ.१८), स्टेशन, कॅसेट (पृ.२०), रिक्षा,हॉल (पृ.२३), प्लॉट (पृ.२४), कॅन्सर (पृ.२५), ऑफर (पृ.२६), रजिस्ट्रॉर (पृ.२९), स्टेटमेंट, मीटिंग,सॉरी,इनसबॉर्डिनेशन, मेमो (पृ.३१), नोटस, बॅग, पार्टीशन, बेसिन (पृ.३३),पॉश (पृ.३५), ऑफिस (पृ.३६), स्टुल (पृ.३८).

**२ ) 'त्यानंतर ...':-**

फर्निचर (पृ.४२), टी.व्ही. (पृ.४३),बँक, सोफा, कव्हर्स (पृ.४४), फॉरेन (पृ.४५), आफ्टरशेव्ह, टाय (पृ.४६), माय गॉड! व्हॉट नॉन्सेन्स, रिसीव्हर, ओके, हॅलो (पृ.४७), किचन, एक्सप्लेन माय डीअर, प्लीज, फिक्सड डिपॉझीट (पृ.४८), यु आर डेस्ड, ट्रेन, कॉम्प्युटर,ॲम आय जोकिंग, आय मीन (पृ.४९), यू हॅव फेल्ड हीम, पार्टी, शॉक, डेकोरेशन(पृ.५१), प्लॅन (पृ.५२), सिन्सिअर (पृ.५४),सॅंडविचेस (पृ.५५), बेल (पृ.५६), नर्सरी (पृ.५७), आर्मी, पोस्टींग (पृ.६०), हॉट द हेल यू आर डुइंग हिअर,

गेट आऊट!, बेड (पृ.६१), प्रिन्सीपल्स (पृ.६२), क्लास, चेक्स, प्राव्हिडंट फंड, ग्रॅज्युइटी, बिझी, मिडल ईस्ट (पृ.६३), लायब्ररी, सेल्सलाइन, मशीन, पार्टस (पृ.६४), स्पेअर पार्टस वर्क्स, (पृ.६६), रेडिओ, पॅक (पृ.६७), अॅडमिशन, नेव्ही (पृ.६९), मास्टर (पृ.७१), फुटपाथ , युनिव्हर्सिटी, आर्ट गॅलरीज, रेकॉर्डस, टायपिस्ट, क्लार्क (पृ.७२), केक, प्रोफेशनल, इंजिनिअरिंग, ज्युनिअर, बेडरुम (पृ.७४), रेडिमेड, गॅस सिलिंडर, पॅसेज, पाईप, बल्ब, रुटिन, बॅग, कप, किचन (पृ.७५), सॉरी(पृ.७६), अॅन्ड मीट माय फ्रेंन्ड, क्यू, द लिटल वन (पृ.७७), स्टेजेस, कॉमिक्स, स्ट्रीप, टेलिफोन(पृ.७९), सेक्स, अटॅचमेंट, नर्व्हस (पृ.८०), मार्केट, रिसर्च, फिल्म इंन्स्टिटयूट (पृ.८३), कॅलिडीओस्कोप, वॉचमन, सिम्बॉल (पृ.८४),होस्टेल, कॉलेज, बेड(पृ.८५), पँट, शर्ट (पृ.८६), पोस्ट, स्टेशन, मनीऑर्डर, प्लेट्स, ब्रीफकेस (पृ.८७), रिलॅक्स, ग्लास (पृ.८८), अॅक्सेप्ट, वुई आर जस्ट फ्रेंन्डस, फोटोग्राफर, अ गुड रिस्पेक्टेबल फॅमिली, (पृ.८९), आय एम सरप्राईड!, डु यु नो व्हेअर यू आर गोइंग? को-ऑपरेटिव्ह सोसायटी, सोशल लाईफ (पृ.९०), कॉन्शस, रिस्पेक्टेबल (पृ.९१), ट्रान्झिशन, पीरिअड, करिअर, प्रमोशन्स, रिच्युअल, प्रेग्नंट, ट्रंककॉल(पृ.९२), ट्रीप (पृ.९३), एजन्सी सेशन, बीच (पृ.९४), मॅच्युअर (पृ.९६), इंटरेस्ट (पृ.९७), लिफ्ट, ट्रॅक्स, लॉरी, सर्कल, पार्क, पार्टी(पृ.९९), टी.व्ही. स्क्रीन, पेपर वेट, टेबल लँम्प, हॉल, शॉवर (पृ.१००), स्टुडिओ, पर्स, मार्केट(पृ.१०१), होस्टेल, हॉस्पिटल, टॅक्सी (पृ.१०२), प्लॅटफॉर्म, आय लव्ह यू ... मोअर दॅन हिम.. (पृ.१०५),मॅच्युअर, लव्ह, आय लव्ह यू .. आय लव्ह माय फ्रेंण्ड .. आय लव्ह हिम ..आय लव्ह हर.. आय लव्ह माय नेशन.. आय लव्ह माय गॉड ..आय लव्ह ब्युटी.. आय लव्ह धिस बुक .. धिस कलर .. आय लव्ह बटरफ्लाय (पृ.१०६), आस लव्ह धिस .. दॅट...ट्रीप,प्लॅन,बस,ट्रेन,अपसेट वेटर, बोटिंग रिझर्व्हेशन्स, अॅडव्हान्स (पृ.१०७), ऑपरेशन (पृ.१०८), थिअरी, बिझी (पृ.१११), रुटिन, फिल्मस, युनिफॉर्म (पृ.११२), शॉक (पृ.११३), टॅब्लो, टॅक्सी, रोड, स्टुडिओ (पृ.११४), इंटरेस्ट, ऑफ लाईटस, सिग्नल, मॅट (पृ.११५), रेनकोट, स्टुल, ब्रेकफास्ट, लॉज (पृ.११६), रफ (पृ.११९), यु डिझर्व्ह इट, रेस्ट इज हिस्टरी... (पृ.१२०), सोकॉल्ड, एण्ड इज मोअर इंपॉर्टंट दॅन मीन्स (पृ.१२१), डायऱ्या, द ह्युमन होप.., लॉज (पृ.१२३).

३ ) 'दारं उघडवीत...' :-

ट्रे, हॉल, पॅसेज, (पृ.१२५), हॅलो,क्लब, बाय, पोर्च, गॅरेज, फियाट, हॉर्न, टेनिस रॅकेट,लास्टगेम, कमिशनर पोलीस (पृ.१२६), डॅम डॅम!, ड्रायव्हर, ट्रॅफिक पोलीस, वेटर, माय गॉड! इंटरव्हयू, कॉपीरायटर, एजन्सी, शट अप, आय एम हॅपी, ट्रीट, ऑर्डर्स (पृ.१२७),टेबल्स, इंटरेस्टिंग, कॉन्व्हेंट, सायन्स एक्झिबीशन (पृ.१२८),थिएटर, पेइंगगेस्ट, (पृ.१२९), सेंटिमेंटल, कॉलेज (पृ.१३०), ग्रीटिंगकार्डस, पॅडस, डायऱ्या, शेल्फ, काऊंटर (पृ.१३१),थॅंक्यू, बिल्डींग, बोर्डिंग स्कूल (पृ.१३२), फॉर, ड्रायव्हर, शेल्फ, पेन-पेन्सिली, बास्केट पार्क (पृ.१३३), क्लासिक स्टीरिओ-सिस्टीम, रेकॉडस, टेप कॅसेट,टि.व्ही., प्लॉट (पृ.१३४), टॉवेल, बाथरुम, हॅलो,प्लीज, (पृ.१३५), ब्लॉक, हॉल, गेट, डॉक्टर, स्टेज, पेशंटस (पृ.१३६),पेशंट, कॅमेरा (पृ.१३७),फोटो (पृ.१३८), ट्रक, स्कूटर, वेटर, चार्म्स, इंटरेस्ट, स्टेज, स्ट्रीटप्ले, मेकअप, सेटिंग, हाय!, हॉटेल (पृ.१३९), टेबल, ऑफर (पृ.१४०), शट अप, गुडबाय, पार्टी, ऑफिस, ऑफकोर्स, पॉश, पार्क(पृ.१४१), कम ऑन, थॅंक्स,अपसेट, आइस्क्रीम, लेक व्हयू स्पेशल, व्हेरी स्वीट ऑफ यू, जॉईन, ऍश ट्रे, (पृ.१४२), आर्किटेक्ट (पृ. १४३), स्टॉल, थिएटर्स, पोस्टर्स, सिनेमा, बसेस, मोपेडस, स्कुटर्स, ग्रुप्स, लेक्चर्स, (पृ.१४४), थिएटर्स, पर्स, प्लीज, पॅड,स्टोव्ह, ब्रेक फास्ट, पेइंग गेस्ट, बेसिन, डायरेक्ट, फिल्मस, डिव्हिजन, फिल्म सेन्सॉर बोर्ड सर्टिफिकेट, इंटरव्हॅल एअरकंडिशन, (पृ.१४५), ब्लॅंकेट, वार्डरोब, बाथरुम, युनिव्हसिटी, ॲडमिशन फॉर्मस, प्रास्पेक्टस फाईल, डॉलर्स, ड्राफ्टस, एन्ट्रन्स, एक्झॅम, (पृ.१४६), डिग्री, सेक्रेटरी (पृ.१४७),गेस्ट रुम, कन्व्हेशन, रिक्शा, कॉट (पृ.१४८), रोड, क्रॉसिंग, डेस्क, प्रिन्सिपॉल, पेपर, फोटो (पृ.१४९), गेम, चिअर अप, सेमी फायनल, प्रॅक्टिस, क्लब, कॅन्टीन, ऑर्डर, मूड, टेनिस, गेटलॉस्ट! (पृ.१५२), लिफ्ट, लॅब, डेमॉन्स्ट्रेटर, लाईन, ग्लास (पृ.१५३), प्रॉपर्टी, गेम, प्रॅक्टीस (पृ.१५४), आइस्क्रीम, गेट (पृ.१५५), हॉल, हॅलो (पृ.१५६), प्रिन्सीपॉल, फादर, व्हॅली स्कूल, ट्रंककॉल्स (पृ. १५७), बायबाय, टेबल, लायटर, थॅंक्स, मेन्युकार्ड, होटेल्स, नॅपकिन्स, कमर्शिअल ऑफिसेस, कॉम्प्लेक्सेस, (पृ.१५८), वेटर, बौल्स, लायब्ररी (पृ.१५९), सेक्रेटरी,

मॅनेजमेंट, लायटर, वेटर, प्लेट, फॅशनबेल (पृ.१६०), आय हेट इट, वेटर, आइस्क्रीम, डेझर्ट, फोल्डर, बील, पर्स, फुटपाथ, (पृ.१६१), ड्रम्स, ट्रंम्पेट, क्लिप्स, ड्रेसिंगटेबल, बॅग (पृ.१६२), पार्टी, हॉल,(पृ. १६३), फोटो, ट्रे, हॅंगर्स (पृ.१६४) फोटो (पृ. १६५), होपलेस, प्लॉटस, ही इज नॉट वर्थ इट (पृ.१६६), प्लीज, चॅरिटी शो, ब्लॅंकेट, स्टेशन, रिझर्वेशन, चार्ट, क्यु, सेकंद, क्लास (पृ.१७०), डायरी, पेन, बॅग, आलबम (पृ.१७१).

४ ) 'दिशा घराच्या' :-

कॅनव्हास, शूज, (पृ.१७३),कॉरिडॉर, मॅटस, काउंटर, स्पॉट, पॉइंट, सॅल्युट, बाल्कनी(पृ.१७४), सॉरी, बेल, बाथरुम, ओल्ड मॅन! लेक, बोटिंग(पृ.१७५), कॅमेरा, प्लीज, लेक फॅमिली (पृ.१७६), चार्म, बिझिनेस, हॅलो, ट्रीप (पृ.१७७), ऑफिस, बाय, गॅस, डस्टर, फर्स्टक्लास(पृ.१७८), रिंग, सोफा, पोस्ट ग्रॅज्युएशन, क्लासेस (पृ.१७९), हॉस्पिटल, ऑपरेशन (पृ.१८०), रुम, प्लीज (पृ.१८१), ऑपरेशन (पृ.१८२), डॉक्टर राऊंड, पेशंट, रेस्टॉरंट, फ्लॅट, आय मीन (पृ.१८३), बिल्डींग, फुटपाथ (पृ.१८४), ब्लॉक, गिअर, ट्रीप, बोटिंग, क्लास (पृ.१८५), शार्प, साईड, हॉल, सिनिअर (पृ.१८६), ब्लडप्रेशर, प्रेशर, रुटिन (पृ.१८७), स्टेशन, ऑफिस, पेग, नर्व्हस, ग्लास (पृ.१८८), फ्रेम्स, पेंटिग्ज (पृ.१९०), स्टॉप, बेल,पर्स, फर्निचर(पृ.१९१), सॉरी, लेक्चर्स, गाइडन्स, पी.एच.डी. (पृ.१९२) मॅनेजमेंट, गाइडन्स, डॉक्टर, प्लॅट, सिनेमा (पृ.१९३), ट्रीप, रेडीमेड(पृ.१९४), फर्निचर, अॅश, ट्रे, फ्रेम (पृ.१९५), फॅशन्स, बिझी, बीपी, शॉपिंग (पृ.१९६), एरिया, पॉलिश, सेक्स (पृ.१९७),मूड, सॉरी, ट्रेन (पृ.१९८), गुड नाइट, डायल, सॉरी, डिनर, राऊंड (पृ.१९९), ऑफिस, क्लास (पृ.२००), हॉटेल, मूड(पृ.२०१), हॉस्पिटल, प्लीज (पृ.२०२), टिपीकल, मूड(पृ.२०३), बॅलन्स, हॉल, नॉब (पृ.२०४), मीटिंग, आय पिटी यू (पृ.२०५), हॉल, सोफा, पार्टी, ऑफिस (पृ.२०६), टीपॉय (पृ. २०७), बिझी (पृ.२०८), मेनरोड, रुटिन (पृ.२०९), पीरियडस स्टेशन, टायपिस्ट, ऑर्डर, पेग (पृ.२११), ऑफिशिअल, कंपनी,कॉमन (पृ.२१२), बोअर, मॅच्युअर, लॉक (पृ.२१३), स्टिअरिंगव्हील, बेल (पृ.२१५).

**हिंदी शब्द :-**

सानियांनी आपल्या कथासंग्रहात हिंदी शब्दांचाही वापर केलेला दिसून येतो.ते शब्द पुढीलप्रमाणे–

'साला' (पृ.४९), 'डरो मत!' (पृ.१४०), 'अम्मा' (पृ.१४७), 'तोबा तोबा!' (पृ.१५४), 'शादी' (पृ.१६३).

**गुजराती शब्द :-**

या कथासंग्रहात 'तारका बेन' (पृ.१३०)हा एकच गुजराती शब्द आहे.

**म्हणी :**

या कथासंग्रहात दोनच म्हणींचा समावेश केला आहे. त्या पुढीलप्रमाणे –

बुडत्याला बाडीचा आधार (पृ.८७), एका दगडात दोन पक्षी (पृ. १०४).

**१५ ) सानिया यांच्या "दिशा घराच्या" कथासंग्रहाचे वेगळेपण :-**

सानिया यांच्या कथेची वैशिष्ट्य किंवा कथेचे वेगळेपण त्यांच्या कथा वाचताना क्षणीच लक्षात येतात. मराठी इंग्रजी मिश्रीत भाषेचा वापर त्यांनी प्रत्येक ठिकाणी केलेला दिसून येतो. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी गहिरा छाप कथेवर उमटलेला दिसून येतो. तसेच प्रत्येक कथेतील पात्रांच्या तोंडचे संवाद हे सहज, सुंदर विलोभनीयच वाटतात. कुठेही बोजड शब्दाचा मारा नाही, त्यामुळे कथा खूप वेगळी वाटते. त्यांच्या कथेला एक प्रकारचा दर्जा प्राप्त झाल्याचे दिसते. कारण मराठी, इंग्रजी भाषेवरचे प्रभुत्व हे एक महत्वाचे वैशिष्टय मानावे लागेल. परदेशी राहूनसुद्धा त्यांचे मराठी भाषेवरचे प्रभुत्व कमी झालेले नाही. हे त्यांच्या लेखनावरुन जाणवते. माणूस हा प्रेमाशिवाय जगू शकत नाही. अन्न, वस्त्र, निवारा याबरोबर मनुष्याला जगण्यासाठी प्रेमाची गरज असते. कुणी तरी आपल्याला समजावून घेणारे आवश्यक असते. हेच त्यांच्या कथेतून सांगितले आहे. प्रेम हा त्यांच्या कथेचा प्रमुख विषय मानल्यास ते वावगे ठरु नये.

सानिया या शहरी भागातील प्रामुख्याने स्त्री पुरुषांचे चित्र रेखाटतात. तेथील लोकांचे व्यवसाय, त्यांचे एकमेकाबद्दलचे प्रेम, प्रेमापायी निर्माण होणारी संकटे, त्यावर मात करण्याची जिद्द हे सर्व सानिया आपल्या कथेत रेखाटतात. त्यांनी इंग्रजी भाषेचा अधिक वापर केल्यामुळे कथेवर आधुनिकतेचा छाप पडलेला दिसून येतो. त्यांच्या

कथालेखनाचे अनुभवविश्व मानवी नात्यांशी संबंधित आहे. अनुभवाला जसेच्या तसे वाचकांसमोर सादर करताना निवेदन शैलीचा वापर केल्याचे दिसून येते. पावलोपावली वाक्प्रचार पेरत गेल्याने त्यांची भाषा शैली समजावून घेताना अजिबात अवघड वाटत नाही, तर कथेमध्ये एक प्रकारचा जिवंतपणा निर्माण करतात.

'दिशा घराच्या' हा एक दीर्घ कथासंग्रह आहे. याच्यामध्ये फक्त चारच कथा आहेत.या सर्वच कथांमधून माणसामाणसांच्या नात्यातील उकल सोडवण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. या नात्यातून बाहेर पडताना त्यांच्या वाटयाला येणाऱ्या एकाकीपणाचा त्यांनी स्वीकार देखील केल्याचे दिसून येते. पण हा एकाकीपणा सर्वसामान्य मानवी मनाऐवजी खास स्त्रीमनाचा एककीपणा असतो.

'मानवी नात्यांचा शोध' हे सानियांच्या लेखनाचे सूत्र आहे. आणि ते शोधण्याचा प्रयत्न आपल्या साहित्यातून केलेला आहे. वाचकाला विचार करायला लावणारी अशी त्यांची कथा आहे. वर्षानुवर्षे माणूस एकत्र राहूनही तो जेव्हा वेगळाच वागू लागतो तेव्हा त्याला आपण पूर्णपणे ओळखले नाही, याची जाणीव बोचत राहते. माणसे जवळ येतात, दूर जातात, पण या मधल्या काळामध्ये जे बंध निर्माण होतात ते बंध शोधण्याचा प्रयत्न आपल्या कथेतून सानियांनी केलेले आहे. लैंगिकतेचे जे तपशील आले आहेत ते रोजच्या जीवनातील उघड सत्य आहे.

सानियाच्या या चारही कथेतून त्यांच्या कथेचे केगळेपण सिद्ध होते. एक तर फ्लॅश बॅक पद्धतीचा वापर केल्याचे दिसते. कथा कधीच सलगपणे आल्याचे दिसत नाही. 'दिशा घराच्या' कथेमध्ये पत्रात्मक शैलीचा वापर केल्याचे दिसते, पण ते फारसे नाही तरीही कथेत पूर्णपणे जिवंतपणा वाटतो. कथा वाचून झाली तरी त्यातील पात्रे बराच काळ वाचकाच्या मनात रेंगाळतात. हेच त्यांच्या कथेचे वेगळेपण आहे.

**१६ ) लेखनाच्या मर्यादा :-**

'दिशा घराच्या' या कथासंग्रहात लेखिकेच्या लेखनाच्या काही मर्यादा जाणवतात. प्रत्येक ठिकाणी इंग्रजी भाषेचा वापर केला आहे. त्यामुळे कथा मराठी वाटतच नाही. याचा अर्थ असा नाही की सगळे शब्द मराठीतच असायला हवेत. पण जेव्हा आपण मराठी कथेचा विचार करतो त्यावेळी त्यात जास्तीत जास्त मराठी शब्द यायलाच हवेत.

कथेची नायिका स्वत:शीच जास्तीत जास्त रममाण होताना दिसते. स्वत:शीच संवाद करताना दिसते. कथा आकाराने दीर्घ असल्यामुळे ती पुन्हा पुन्हा वाचावी लागते. कथेत सलगपणा नसतो, त्यामुळे संदर्भ जुळून यायला वेळ लागतो. कथा दीर्घ असल्यामुळे मुख्य पात्राबरोबर इतर पात्रांचा परिचय आलेला आहे. त्यामुळे मुख्य कथानकाबरोबर उपकथानकही येते. काहीवेळा लिखाणात तोचतोचपणा जाणवतो. काहीवेळा त्यांची कथा दुर्बोध वाटते. 'त्यानंतर ...' कथेत मात्र नायिकेचा संवाद रसिकांचे, वाचकांचे लक्ष वेधून घेतो.

सानियांच्या बऱ्याच कथा चिंतनात्मक पातळीवर उतरतात. त्याचप्रमाणे त्यांच्या कथेच्या नायिका फक्त विचारच करताना दिसतात.पण कृती मात्र त्यांच्या हातून घडताना दिसून येत नाही. त्याचप्रमाणे नायिकांच्या दु:खामागील सामाजिक संदर्भ त्यांच्या कथेत व्यक्त होत नाहीत.

"सानियांच्या कथेत लहान मुलं किंवा ती वाढवताना होणारी बाईची ओढाताण ही फार फार तर एखाद्या निवेदनात येते. पंधरा ते सोळा वर्षाची मुलगी सुद्धा मैदानावर खेळायला जात नाहीत. तिच्या किंबहुना शारिरीक उर्जेचा अपव्यय होताना कुठेही दिसून येत नाही. माणसांचे जे बाहय किंवा सार्वजनिक जीवन स्वेच्छेने किंवा अनिच्छेने पण सक्ती म्हणून जगावे लागते. त्याचे तपशील सानिया कमीत कमी देते. जगण्याचा सारखा विचार करणे हेच येथे महत्वाचे असते. त्यामुळे समाजात नोकरीच्या जागी वावरताना स्त्रीला पदोपदी जी दुय्यम वागणूक मिळते, घरात नवरा आणि बाहेर वरिष्ठ यांची मर्जी सांभाळताना तिची जी ससेहोलपट होते, रोज शारिरीक, मानसिक पातळीवर जे धक्के खावे लागतात. आणि त्यातूनच संवेदना बोथट होऊन जातात तसे काहीही येथे घडत नाही."[९] असे प्रा. रेखा इनामदार-साने म्हणतात.

**समारोप :-**

'दिशा घराच्या' या कथासंग्रहात चारच दीर्घ कथा असून हा कथासंग्रह विविधतेने नटलेला आहे. ओघवत्या आणि आत्मनिवेदनपर भाषाशैलामुळे कथा अधिक आकर्षक झाली आहे. 'दिशा घराच्या' हा एक लोकप्रिय कथासंग्रह आहे. त्यांच्या प्रत्येक कथेचा आशय वेगळा आहे. वाचकांना त्यांच्या कथेत खेचून घेणारी, त्याला आत्मशोधन आणि

आत्मपरीक्षण करायला लावणारी सानियांची कथा आहे. शहरी भागातील स्त्रियांच्या वेदना, दु:खे सानिया आपल्यापुढे मांडतात. स्त्रियांकडे, साहित्याकडे किंवा संस्कृतीकडे नव्हे तर, जगाकडे बघण्याचा एक सुसंगत, सम्यक दृष्टीकोन देण्याचा सानिया यांचा प्रयत्न जाणवतो. पूर्वीच्या कथेतील असणाऱ्या स्त्रियांच्या वैचारीक पातळीपेक्षा सानिया यांच्या कथेतील स्त्रियांची असणारी वैचारीक पातळी उंचावलेली दिसून येते. 'स्त्रियांचे स्वत: संबंधीचे साहित्य' (अ लिटरेचर ऑफ देअर ओन) असे त्याला एलेन शोवॉल्टरने म्हणले आहे अशा स्वरूपाचे सानियांचे आजपर्यंतचे कथालेखन आहे असे म्हणावेसे वाटते.[१०] पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत असताना जसे पुरुषांना अधिकार मिळतात. तसे आपल्याला का मिळू नयेत असे प्रश्न विचारणाऱ्या स्त्रिया सानियांच्या कथेत दिसतात. घरातील माजघर सोडून सगळीकडे संचार करणाऱ्या स्त्रिया एका वेगळयाच मनोवृत्तीच्या आहेत असे मला वाटते.

पुढील प्रकरणात आपण 'सानियांच्या कथांचे स्वरुप व वाङ्.मयीन विशेष' अभ्यासणार आहोत.

**संदर्भ :-**


१) 'स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याचा मागोवा, इ.स.१९४७ ते २०००' प्रदक्षिणा खंड दुसरा, संपादक म.ना. अदवंत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, आवृत्ती दुसरी, १९९८, पृ.१४७.

२) 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', अंक २५९, सानिया, दिवाळी विशेषांक, 'त्यानंतर' बदल, ऑक्टोंबर/डिसेंबर १९९१, पृ. ११३.

३) 'मराठी कथा: उगम आणि विकास', इंदुमती शेवडे, समिप्त व सुधारीत आवृत्ती १९८८, (पुरवणी).

४) 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', अंक २५९, सानिया, दिवाळी विशेषांक, 'त्यानंतर' बदल, ऑक्टोंबर/डिसेंबर १९९१, पृ. ११४.

५) 'ललित'(मासिक), नीला उपाध्ये, "सानियाला जयवंत दळवी स्मृति-पुरस्कार प्रदान : मानवी नात्यांचा एक मनोहारी गोफ",आक्टोंबर १९९६, पृ. ५२.

६) 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', अंक २५९, सानिया, दिवाळी विशेषांक, 'त्यानंतर' बदल, ऑक्टोंबर/डिसेंबर १९९१, पृ. ११३.

७) 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', अंक २५९, सानिया, दिवाळी विशेषांक, 'त्यानंतर' बदल, ऑक्टोंबर/डिसेंबर १९९१, पृ. ११२.

८) 'चतुरा' (पुरवणी), शुभदा पटवर्धन, (इथंच टाका तंबू), ३ डिसेंबर २०००, पृ. १३.

९) 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', अंक २५८, प्रा. रेखा इनामदार-साने, स्त्रीवादी दृष्टीकोनातून सानिया यांची कथा, जुलै/सप्टेंबर १९९१, पृ. ७९.

१०)'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', अंक २५८, प्रा. रेखा इनामदार-साने, स्त्रीवादी दृष्टीकोनातून सानिया यांची कथा, जुलै/सप्टेंबर १९९१, पृ. ७८.


✵✵✵✵